
साप्ताहिक

# माणूस

30 जून ८४ / दोन रुपये

## पुढे काय?





साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे

अंक : पाचवा

¤

३० जून १९८४

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर

## सप्रेम नमस्कार, माणूस

¤ १२ मे १९८४ चा 'माणूस'चा अंक बरेच उशीरा माझ्या वाचण्यात आला. 'दूरदर्शन वरील ज्ञानदीप की अज्ञानदीप?' या शीर्षकाखालील प्रतिक्रिया व त्याला दिलेली आकाशानंद यांची यथोचित उत्तरे वाचली व ते वाचूनच 'मला भावलेला ज्ञानदीप' मी सांगणार आहे

मी एका ज्ञानदीपमंडळाची प्रमुख आहे. ज्या अर्थी साप्ताहिकाने ज्ञानदीपची दखल घेतली याचाच अर्थ तो कार्यक्रम निश्चितच मान्यता पावलेला आहे. ज्ञानदीपचे कार्यक्रम ठराविक साच्याचे, ठराविक विषयावर व ठराविक प्रेक्षकवर्गापुरतेच चौकटीत बसणारे असतात असे म्हटले जाते. कोणताही कार्यक्रम करताना त्याची चौकट, मर्यादा, विषयावरचे बंधन हे ठरवावेच लागते. दूरदर्शनवर होणारे किती तरी कार्यक्रम हे ठराविक साच्याचेच असतात व त्या त्या कार्यक्रमाचा प्रेक्षकवर्गही ठरलेलाच असतो. उदा. प्रतिभा–प्रतिमा, शब्दांच्या पलीकडे, हिंदी सिनेमावर होणारे कार्यक्रम, चेहरे–मुखवटे इ.

दुसरा मुद्दा म्हणजे ज्ञानदीपमधून जुने विचार, रूढी, त्याच त्याच विषयावर कार्यक्रम सादर केले जातात. कार्यक्रम रटाळ व कंटाळवाणे होतात. या दुसऱ्या विधानाशी मी सहमत आहे; परंतु सर्वच कार्यक्रम रटाळ होतात हे कोणीही मान्य करणार नाही. उद्बोधक व संस्कारक्षम असे कार्यक्रम निश्चितच होतात. काही जीवनमूल्ये ही शाश्वत असतात. काळ बदलला तरी चालू संदर्भातही ती उपयोगी ठरतात. उदा. राष्ट्रप्रेम, थोरांबद्दल आदर, सहानुभूती इ. आणि अशी शाश्वतमूल्ये आज आपल्यातून हद्दपार होत आहेत. ती जतन करणे, त्याचा समाजमानसापर्यंत प्रवाह नेऊन पोचविणे हाच ज्ञानदीपचा उद्देश आहे. त्यातून एखाद्याने जरी शाश्वतमूल्ये जोपासली तरी ती एक समाजसुधारणाच ठरेल. 'थेंबाथेंबाने तळे साचते–' त्याचाच समाजप्रबोधनात फार उपयोग होणार आहे.

सामान्यातील सामान्य माणसाला आपले मनोगत व्यक्त करायला ज्ञानदीप हे व्यासपीठ आहे. नवीनांना संधी देणे व त्यातूनच कलाकार, वक्ते निर्माण होतील. समाजात वावरताना धीटपणा येतो. कसबी कलाकारांसारखे ते कार्यक्रम होत नसतील; पण ज्ञानदीप हा एकच कार्यक्रम असा आहे की, अनेकांना त्यात सहभागी करून घेतो. त्यामुळे एकोपा, सहकार, समाजासाठी काही करण्याची जिद्द निर्माण होते.

ज्ञानदीपचे काही कार्यक्रम विचार करायला प्रवृत्त करतात. उदा. 'एक पायरीखाली ये', 'आजोबा येती घरा' इ. तसेच समाजासाठी, राष्ट्रासाठी ज्यांनी देह झिजवला अशा थोर व्यक्तींवरही कार्यक्रम वरचेवर सादर होतात. उदाहरणार्थ, सावरकरांच्या गोष्टी, सानेगुरुजींवर सादर केलेला कार्यक्रम. विद्यार्थ्यांसाठी केलेला कार्यक्रमही फारच छान होता.

'व्यक्ती तितक्या प्रकृती' या न्यायाने विचार केला तर कुठल्याही कार्यक्रमाचे १०० टक्के यश विचारात घेतले जातच नाही. हाच कार्यक्रम असा आहे की, अगदी लहानापासून म्हाताऱ्यापर्यंत एकत्र बसून पाहाता येतो. हेच या कार्यक्रमाचे यश आहे.

तेव्हा उगीच 'ज्ञानदीप' या कार्यक्रमावर चर्चा करून ऊहापोह करून सर्वमान्य झालेल्या कार्यक्रमाचे पाय मागे खेचणे चांगले नव्हे. समाजाला चांगली जीवनमूल्ये जोपासायला लावणे हाच उदात्त हेतू या मागे आहे.

सौ. स्मिता अ. तळेकर

२१ जून १९८४ डोंबिवली

◻ आपला १६ जूनचा साप्ताहिक माणूस वाचला. 'गारांचा पाऊस' या सदराखाली 'कामसू आई' हा शोभा भागवत लिखित लेख मला खूप आवडला. आजच्या वर्तमान युगात तरुण युवा पिढीची ही एक समस्या होऊन बसली आहे माझ्या मते याला जबाबदार पालकवर्ग व मुलावरील त्यांचे संस्कार.

आजच्या काळाला अशा लेखनमाला व लेखकांची निकडीची गरज आहे. ह्याची कितपत अंमलबजावणी पालकवर्ग करतो ?

१८ जून ८४ — रवि गो. जाजू, अकोलनेर

◻ मी आपल्या साप्ताहिकाचा जुना वाचक आहे; परंतु माझे हे आपणास पहिलेच पत्र आहे. आपल्या साप्ताहिकाच्या (दि. १६–६–८४) अंकात श्री. अभय गोखले यांचा लेख वाचला. तो मला फार आवडला. सुशिक्षित मुसलमानांच्या व्यथाच त्यांनी यात प्रगट केल्या आहेत त्यांना त्याबद्दल त्रिवार धन्यवाद. मध्यंतरी मला आवडता 'माणूस' एकीकडे झुकतोय की काय अशी शंका येत होती; पण या लेखाने ती खोटी ठरली. असो.

सद्य:परिस्थितीत अभय गोखले यांच्या प्रमाणे सडेतोड विचारसरणी दोन्ही धर्मातील सुशिक्षितांनी ठेवली पाहिजे व धार्मिक पुडांना व गुंडांना बाजूस सारले पाहिजे. धर्माचे राजकारण करणाऱ्या हलकट पुढाऱ्यांना गचांडी दिली पाहिजे. श्री. अभय गोखले भेटले तर या पत्राद्वारे मी त्यांना झुकून 'कुर्निसात' केलाय हे सांगा. बस्स ! एवढेच

१६ जून ८४ — इसहाक शेख, सोलापूर

टीप: मध्यंतरी मी पाकिस्तानविषयी १-२ लेख इतरत्र वाचले. मला व्यक्तिशः या देशाविषयी फारसे महत्त्व नाही; परंतु या लेखावरून तेथील लोकाना भारताविषयी कुतूहल, आदर, प्रेम असल्याचे निदर्शनास आले.आपण एखादा 'पाकिस्तान विशेषांक' काढावा असे मला वाटते. म्हणजे आपल्या इतक्या जवळ असणाऱ्या या शेजाऱ्याविषयी 'खरी' माहिती 'माणूस'द्वारे मराठी वाचकाना होईल. ◻

# लष्कर आणि लोकशाही

श्री. ग. मा.

पंजाबातील लष्करी कारवाईचे सर्वत्र स्वागत होत असले तरी बहुसंख्य शीखसमाज या कारवाईमुळे दुखावला गेलेला आहे यात काही शंका नाही. सर्वसामान्य शीख ट्रकवाला, दुकानदार हा विषय निघाला की, मौन पाळतो वा उडवाउडवीची, रागाची उत्तरे देतो. खुशवंतसिंगांसारखा पद्मविभूषित पत्रकार आपला राग लिखाणातून किंवा मिळालेली सरकारी पदवी परत करून व्यक्त करतो. खुशवंतसिंगांचा मतलबी धरसोडपणा सोडून द्या; बंगलादेशचे युद्ध जिंकणारे ले. ज. आरोरा यांचे काय ? इंग्रजी वृत्तपत्रातून आपला असंतोष पत्रे किंवा लेख लिहून व्यक्त करणाऱ्या शेकडो शीख बुद्धिमंतांचे काय ? सैन्यदलातही चलबिचल, खळबळ उडाली. सुमारे दोन हजार शिखांनी बंड केले. हे बंड, हे अमृतसरच्या दिशेने निघणे भाबडेपणाचे होते हे खरे; पण बंडखोरांची दोन हजार ही संख्याही तशी दुर्लक्ष करण्यासारखी नाही. मुंबईत पाच हजार शिखांनी लष्करी कारवाईच्या निषेधार्थ उग्र निदर्शने केली. जम्मू–काश्मिरात तर शिखांमधील असंतोष उग्र स्वरुपात व्यक्त झाला. तेथेही लष्कराला पाचारण करावे लागले. दिल्लीत ही वेळ आली नाही; पण बंदोबस्त कमी असता तर दिल्लीतही असतोष उफाळून आलाच असता. लंडन, टोरँटो येथे निदर्शने झाली, निषेध म्हणून धार्मिक प्रार्थनांचे कार्यक्रम तर ठिकठिकाणी घेण्यात आले. पाच जूनला लष्कर सुवर्णमंदिरात गेले. महिना होत आला, अजून लष्कर तेथून बाहेर पडू शकलेले नाही. खेडोपाडी अद्याप अतिरेक्यांचा शोध जारी आहे. अधूनमधून खूनखराबी चालूच आहे. पंजाबातील खेड्यापाड्यांपासून लंडन-टोरँटोतील शिखांपर्यंत सर्वांनाच हा धक्का जोरदार बसलेला आहे व यापुढेही लष्कराच्याच मदतीने हा प्रश्न सोडवण्याचा दृष्टिकोन ठेवला तर दुखावलेले शीख लोकमत अधिकच अतिरेकी होण्याचा, भारतविरोधी होण्याचा सभव आहे. लष्करी कारवाईसमोर एक पेच नेहमी असतो. सुरुवातीला लष्कराचे सर्वजण स्वागत करतात; पण लष्कराचा मुक्काम वाढला की, सर्वसामान्य नागरिक लष्कराच्या जाचाला, कडक निर्बंधांना कंटाळतो, हळूहळू लष्करविरोधी होतो. पंजाबात लष्करी किंवा निमलष्करी दले जास्तकाळ राहिली किंवा ती ठेवणे भाग पडले तर हा पुढचा परिणामही अटळ आहे. काश्मिरात लष्कर गेली तीस–पस्तीस वर्षे आहे. नागालँड–मिझोरॅम बहुताश लष्कराच्याच ताब्यात असते. या ठिकाणी प्रथम लष्करविरोधी भावना निर्माण झाली व नंतर लष्कर भारतसरकारचे म्हणून दिल्लीविरोध, भारतविरोधही ओघानेच आला. या दोन्ही ठिकाणी सुरुवातीला लष्कराचे स्वागतच झाले; पण हळूहळू या स्वागताचे रूपांतर विरोधात झाले व आता तर या भागातील सर्वसामान्य माणूस भारताचा द्वेषच करताना

दिसतो. पंजाबातही यापेक्षा वेगळे काही घडेल असे नाही. निवडणुका समजा लगेच घेतल्या गेल्या तर बहुसंख्य शीख इंदिरा-विरोधी मतदान करतील. म्हणूनच लष्करी राजवटी निवडणुका बहुधा टाळत असतात. इंदिरा गांधीचा आणीबाणीनंतरचा अनुभवही असाच आहे. आणीबाणीचे सुरुवातीला चांगल्या चांगल्या लोकांनी स्वागत केले. मग लोकमत आणीबाणी-विरोधी होऊ लागले. या बदलाचा इंदिरा गांधीना अंदाजच आला नाही. त्यांनी निवडणुका घोषित करण्याची चूक केली. चूक अंगलट आली, त्यांना सत्ता सोडावी लागली. अशी चूक इंदिरा गांधी पुन्हा करणे शक्य नाही. पंजाबपुरता तरी लोकशाहीचा अध्याय तूर्त समाप्त आहे. शीख माणूस जेवढा 'लवकर संतापतो तेवढा शांतही लवकर होतो असे म्हणतात. शिवाय सध्या इंदिरा गांधीचा healing touch चा –उपशामक स्पर्शाचा प्रयोग सुरू आहे. याचा परिणाम होऊन दुखावलेले शीख लोकमत थोडेफार इंदिरानुकूल झाले तरच पंजाबात लोकशाही प्रक्रियेची–वातावरणाची काही आशा संभवते. शीखपथासाठी आत्माहुतीची शपथ घेतलेले एक लाख तरी ग्रामीण युवक असावेत असा लेखी पुरावा आहे. विलगतावादी राजकारणात सामील झालेल्या माजी सैनिकाची संख्या जवळपास आठ–दहा हजार आहे. प्रत्यक्ष दहशतवाद्यांची कमीत कमी दोन हजार कुटुंबे आहेत असे म्हणतात. अकाली आंदोलनात किमान एकदा तरी तुरुंगात जाऊन आलेल्यांची संख्या लाखाच्या वर आहे. निरनिराळ्या पोलीसदलात असलेल्या व आतून शिखिस्तान – खलिस्तान चळवळीला सहाय्य करणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. सैन्याला सुवर्णमंदिरात सापडलेली सर्व शस्त्रास्त्रे काही परदेशांतून आलेली नाहीत. आपल्याच लष्करी केंद्रातून चोरून नेलेली शस्त्रसामग्रीही खूप आहे. गुप्तचरसंघटनेत, सरकारी नोकरीत असणारे व अकाली आंदोलनाबद्दल आतून सहानुभूती बाळगणारे लोक अपवादात्मक नाहीत. ही संख्याही बरीच असल्यामुळे तर सुवर्णमंदिरात एवढा शस्त्रसाठा जमू शकला, मंदिरात प्रत्यक्ष शस्त्रनिर्मितीही करणे अतिरेक्यांना शक्य झाले. असे सर्वत्र अतिरेक्यांचे जाळे पसरले असताना पंजाबातून लष्कर लवकर बाहेर पडेल अशी शक्यता कमी. पडलेच तर ते दाखवण्या – सांगण्यापुरते असेल. यापुढचा काळ तरी पंजाबमधील परिस्थिती आणीबाणीसदृशच राहण्याची शक्यता अधिक.

### कोणते मार्ग ?

इतरत्रही अशी परिस्थिती निर्माण होऊ पाहात आहे. इंदिरा काँग्रेसच्या सरचिटणीस श्रीमती राजेंद्रकुमारी वाजपेयी यांनी गौहाटी येथे पत्रकारांशी बोलताना नुकताच इशारा दिला की, 'ज्या राज्यामध्ये विविध प्रश्नांवर आंदोलने सुरू आहेत त्यांनी पंजाबचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवावे.' (केसरी, १८ जून) हा इशारा कसला? सगळ्या विरोधी पक्षोपपक्षांना, संस्था-संघटनांना दिलेली ही एक तंबीच आहे. यापुढे आंदोलने खपवून घेतली जाणार नाहीत, आंदोलने दडपली जातील असाच या इशाऱ्याचा–तंबीचा अर्थ आहे. आसामचा प्रश्न गांधीमार्गाने, शांततेने सोडवण्याचा प्रयत्न झाला. गेली चार वर्षे आसामच्या विद्यार्थ्यांनी–जनतेने कौतुकास्पद संयम पाळला आहे. गांधीजींनाही अभिमान वाटला असता असे नवेनवे शांततापूर्ण-अहिंसक आंदोलन–मार्ग हुडकून, चळवळ लोकशाही चौकटीच्या बाहेर जाणार नाही हे पाहिले आहे; पण दिल्ली हलायला, दाद द्यायलाच तयार नाही ! मुंबईच्या गिरणीकामगारांनी दोन वर्षे संप चालवला. दिल्ली थंडगारच ! पंजाबने हिंसकमार्ग पत्करला. दिल्ली थोडीफार हलली; पण शेवटी सैन्य पाठवून याही आंदोलनाचा बीमोड केला गेला. लोकांनी मग आपल्यावरील अन्याय दूर करून घेण्यासाठी, आपले प्रश्न सोडवण्यासाठी कोणत्या मार्गांचा अवलंब करायचा ? हिंसक-अहिंसक अशा कोणत्याच चळवळीचा यापुढे उपयोग होणार नाही का ? सत्याग्रह–उपोषणे हे जुने गांधीमार्ग तर सध्या केविलवाणेच भासतात. सरकारवर या मार्गांचा काहीच परिणाम होत नाही. घेराव, रस्ता–रोकोंनाही सरकार सध्या दाद देत नाही. अकालींनी अतिरेकी मार्ग वापरले. देशातून-परदेशातून शस्त्रास्त्रे जमवली. माणसे मारली. याहून वरचढ अतिरेक म्हणजे अमानुषपणाच ! सुरुवातीलाच अकालींच्या आंदोलनाकडे लक्ष पुरवले असते तर हे आंदोलनही शेवटी या टोकाला गेले नसते. चंदीगड पंजाबला द्यावे असा निवाडा झाला होता; का ते वेळच्या वेळी दिले गेले नाही ? हरियाणाला दुसरी राजधानी बांधून देणे अवघड नव्हते. आसाममध्ये नवी राजधानी बांधली जात आहे. गुजराथने नवी राजधानी बांधली. चंदीगड पंजाबला देऊन, हरियाणासाठी नवी राजधानी बांधली असती तर अकाली आंदोलकांचा जोर बराच कमी झाला असता. खलिस्तानचा, पंजाबी सुभ्याचा, शिखिस्तानचा विचार १९४० सालापासून डोके वर काढत

होता हे खरे आहे; पण १९८० पर्यंत या विचारामागे तशी राष्ट्रविघातक ताकद नव्हती. १९७९ मध्ये शिरोमणी गुरुद्वार प्रबंधक समितीच्या निवडणुका झाल्या. अकाली दलाने ९५ टक्के जागा जिकल्या. भिद्रानवाले यांनी उभे केलेले सर्वच्या सर्व म्हणजे ३२ उमेदवार पराभूत झाले. या पराभूतात अमरिकसिंग यांचाही समावेश होता. 'अतिरेक्यांविरुद्ध हा कौल आहे. हे अतिरेकीच पंजाबात जातीय तणाव निर्माण करीत आहेत,' अशी या विजयानंतर अकालीदलाने प्रतिक्रियाही व्यक्त केली. यानंतर १९८१ मध्ये ज्येष्ठ पत्रकार लाला जगतनारायण यांच्या खुनाच्या सदर्भात भिद्रानवाले यांना अटक झाली. पंतप्रधानांच्या आदेशानुसार त्यांना लगेच म्हणजे आठ–दहा दिवसांतच सोडून देण्यात आले. त्यानंतरही बरेच दिवस भिंद्रानवाले सुवर्णमंदिराच्या बाहेरच होते. गुरु नानकनिवासात त्यांचा मुक्काम होता. तिथूनच ते आपली चळवळ चालवत होते. केव्हाही त्यांना अटक करून चळवळीचा बीमोड करता आला असता. सुवर्णमंदिराचा त्यांना आश्रय घेऊ देण्याची वेळ यायलाच नको होती. मध्यममार्गी शीख नेतृत्वाशी वाटाघाटी करून पंजाबचा प्रश्न सोडवा असे अनेक विरोधी पक्षनेते सांगत होते, प्रमुख वृत्तपत्रांतून तशा सूचना अग्रलेखा–लेखांद्वारे वरचेवर केल्या जात होत्या; पण दिल्लीने कोणाचेही ऐकले नाही, आपलाच हेका चालवून भिंद्रानवालांचा भस्मासुर वाढू दिला. शेवटी बळाचा वापर केलाच. तोच जर वेळच्या वेळी केला गेला असता तर थोडक्यावर काम भागले असते. शिखांच्या भावना आजच्यापेक्षा कमी दुखावल्या गेल्या असत्या व जवानांची हानीही एवढी झाली नसती. ८० ते १०० जवान या कारवाईत बळी गेले! गोव्याची किंवा हैद्राबादची कारवाई करतानाही एवढी किंमत आपणास मोजावी लागली नव्हती. बँका लुटल्या गेल्या, सुमारे ४००–५०० माणसाचे मुडदे पडले, दिल्लीतल्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची नावे खूनयादीमध्ये दाखल झाली तेव्हा कुठे दिल्लीला जाग आली! आंदोलन शांततेने, लोकशाही चौकटीत चालू आहे तोवर तिकडे लक्ष द्यायचे नाही असा दिल्लीचा–नव्या दिल्लीचा–खाक्याच आहे! टोकाला गेले की, कोणतेही आंदोलन सैन्यबळाचा वापर करून चिरडता येते हेही दिल्ली जाणून आहे. अकालीच्या बाबतीत परिस्थिती थोडी अधिक नाजूक होती. शिखांचेच सैन्य आणि शिखांचेच आंदोलन; पण दिल्ली याही धर्मसंकटातून सहीसलामत बाहेर पडली. शिवाय कौतुकाचा वर अहेरही. पंजाबातील लष्करी कारवाईचे 'अटळ' व 'अपरिहार्य' म्हणून सर्वत्र स्वागत होत आहे आणि ते सद्य:स्थितीत योग्यही आहे; पण काळ सोकावतो त्याचे काय? घाव पंजाबवर पडला आहे; पण जखम देशातील लोकशाही प्रक्रियेला–वातावरणाला झाली आहे. ही जखम भरून येणार की अधिकच चिघळत जाणार?

## आर्थिक गुलामगिरी

याचा अर्थ ऊठसूट आंदोलने करावीत, जनजीवन विस्कळित करावे, अराजक, अंदाधुदी माजवावी असा नाही; पण देशाचा ज्यात कवडीचाही फायदा नाही असा एशियाडसारखा प्रचंड खर्चाचा व उधळपट्टीचा तमाशा राज्यकर्त्यांनी दिल्लीत पुन्हा भरवला तर आंदोलन आवश्यक आहे की नाही? आसाम प्रश्नावर लोकमत जागृत करावयाचे की नाही? कच्छमध्ये पाकिस्तानची घुसखोरी वाढत आहे. 'धर्मयुग' सारखी कोणत्याही विशिष्ट पक्षाला, विचारसरणीला न वाहिलेली व्यावसायिक वृत्तपत्रे यावर लेख छापत आहेत. हा प्रश्न राष्ट्रीय महत्त्वाचा मानायचा की नाही? मुबईत सुमारे लाखभर पाकिस्तानी नागरिक विनापरवाना झोपडपट्ट्यातून वगैरे राहत आहेत अशी माहिती भिवंडी दंगलीनंतर उजेडात आली होती. या नागरिकांना हुडकून पाकिस्तानात परत पाठवले नाही तर त्यांचे अस्तित्व धोकादायक ठरू शकेल की नाही? मागाहून 'पाकिस्तानचा हात' होता असे ओरडत राहण्यात काय अर्थ आहे? ही मंडळी नक्कीच मुबईचा पाऊस पाहायला आलेली नाहीत. त्यांच्या काही तरी कारवाया सुरूच असणार. साखर–रॉकेल मिळाले नाही तर आपण मंत्रालयावर मोर्चे नेतो–ते आवश्यकही आहे; पण कासिमरातील किंवा मुबईतील बेकायदा घुसखोराकडे होणारे सरकारी दुर्लक्ष हाही तितकाच महत्त्वाचा प्रश्न नाही का? अशा दुर्लक्षामुळेच भिवंडी पेटते, सुवर्णमंदिरात शस्त्रास्त्राचे साठे जमत राहतात व भडकाभडकी होऊन देशाची सुरक्षितता व एकात्मता यांना तडे जातात. झालेला आर्थिक विकास काही क्षणात बेचिराख होतो. परकीय हस्तक देशात ठिकठिकाणी पेरून देश दुबळा व खिळखिळा करण्याचे प्रयत्न पाकिस्तान–चीन म्हणा किंवा अमेरिका–रशिया म्हणा, सतत करीत राहणारच. भारत समर्थ व एकात्म होऊन आशियातील एक मोठी शक्ती म्हणून उभा राहणे यापैकी कुणालाच

नको आहे. खलिस्तान चळवळीमागे परकीय हात आहेत असे राज्यकर्ते पुन्हा-पुन्हा सांगत आहेत. हे परकीय हात यापुढे अधिकच पसरणार आहेत. कारण सारे आर्थिक क्षेत्रच आपण परकीयांच्या ताब्यात द्यायला निघालेले आहोत. बहुराष्ट्रीय कंपन्यांना हल्ली अगदी मुक्तद्वार लाभलेले आहे. नुकताच दिल्ली येथे बोटक्लब मैदानावर मजूरसंघटनांचा एक मोठा मेळावा झाला. यात बहुसंख्य मजूरनेत्यांनी आपल्या वाढत्या आर्थिक गुलामगिरीबद्दल घोर चिंता व्यक्त केली. भा. म. संघाचे श्री. दत्तोपंत ठेंगडी यांनी तर शेतकरी, मजूर व ग्राहक यांनी एकत्र येऊन या गुलामगिरीविरुद्ध एक प्रचंड आंदोलन उभे करण्याची वेळ येऊन ठेपली आहे असे या मेळाव्यात सांगितले. (पहा : अहमदाबादहून प्रसिद्ध होणारे गुजराथी 'साधना' साप्ताहिक, ९ जून १९८४) खरोखर असे एकत्रित महाआंदोलन उभे राहिले तर हवेच आहे; पण ते उभे राहू लागले की, इंदिरा कॉंग्रेसच्या सरचिटणीस वाजपेयी तंबी देणार व आंदोलन मोडून काढले जाणार !

### सैन्याची जागा

जसा पंजाबचा प्रश्न हा देशाचा प्रश्न म्हणून न सोडवता, त्यात पक्षीय राजकारण आणून कॉंग्रेसने-इंदिरा गांधींनी तो पेटता ठेवला, योग्य वेळी कृती केली नाही व त्यामुळे शेवटी सुवर्णमंदिरात सैन्य पाठवावे लागले, तसेच यापुढे प्रत्येक महत्त्वाच्या प्रश्नाचे होणार आहे. प्रश्न चिघळत राहणार, शांततापूर्ण मार्ग निरुपयोगी व निष्प्रभ ठरतात अशी जनतेची, राजकीय पक्षोपपक्षांची-गटांची भावना दृढावत जाणार, हे गट-पक्षोपपक्ष अतिरेकवादाकडे नाइलाजाने ढकलले जाणार व शेवटी सैन्याच्या जोरावर प्रश्न सोडवणे 'अपरिहार्य' ठरत राहणार ! सैन्य सरहद्दीवर आहे, राजकारणापासून अलिप्त आहे, परकीय शत्रूशी मुकाबला करत आहे तोवर ते देशाला भूषणास्पद ठरते; पण ही शक्ती देशातर्गत सुव्यवस्थेसाठी वरचेवर वापरावी लागली तर यात नाही सैन्याचा गौरव, नाही देशाची स्थिरता. सैन्य हवे, ते मजबूतही हवे; पण सैन्याची जागा कुठली ? भिवंडीतही ते बोलवावे लागते, सुवर्णमंदिरातही ते पाठवावे लागते. मग राज्यकर्ते करतात तरी काय ?

यापूर्वीही दर वेळा राज्यकर्त्यांनी शेवटपर्यंत दुर्लक्ष केलेले आहे. भारत स्वतंत्र झाला आणि लगेचच काश्मिरवर टोळीवाल्यांचे-पाकिस्तानचे आक्रमण झाले. टोळीवाल्यांचे-पाकिस्तानचे सैन्य श्रीनगरच्या सीमेवर येऊन धडकले. दरबारातले दिवे गेले, श्रीनगर अंधारात बुडाले तेव्हा आपण जागे झालो, घातपाताचा आपल्याला संशय आला व पळापळ करून कसेबसे श्रीनगर-काश्मिर आपण वाचवू शकलो. सैन्याने गौरवास्पद कामगिरी केली, राजकारणी कमी पडले. चीनच्या आक्रमणाप्रसंगी हाच अनुभव. चीनच्या तयारीचा आपल्याला शेवटपर्यंत अंदाजच नाही, आपली तयारी तर शून्य. रस्ते नाहीत, सैनिकांना कपडे व गरजेच्या वस्तूही नाहीत ही स्थिती. सैन्य लढणार तरी कसे ? नामुष्की व पराभव अटळ होता. सुवर्णमंदिरात कारवाईसाठी सैन्य गेले तेव्हा तेथील प्रतिकाराची तयारी पाहून सर्वांना धक्काच बसला म्हणे ! धान्याच्या ट्रक्समधून शस्त्रास्त्रे आत गेली म्हणे ! अरे, जाऊ कशी दिली ? हे तर शिवाजीच्या वरताण काम झाले ! शिवाजीचे फक्त पेटारे तर अतिरेक्यांचे ट्रक्स ! पंजाबात लष्करी कारवाईपूर्वी राष्ट्रपती राजवट होती नं ? त्याहीपूर्वी कॉंग्रेसचेच मंत्रिमंडळ तेथे होते नं ? मग सुवर्णमंदिरात काय काय साठवले जात आहे याचा शेवटपर्यंत पत्ता लागू नये ? सुवर्णमदिरात भुयारे खणली जात होती आणि राजीव गांधी 'भिंद्रानवाले हे केवळ धार्मिक नेते आहेत' असे मत व्यक्त करीत होते ! ही बेफिकीरी, अज्ञान की दुर्लक्ष ? उशीरा का होईना कारवाई झाली हे चांगलेच झाले; याबद्दल इंदिरा गांधींचे, सैन्याचे आभार जरूर मानले जावेत; पण या टोकाच्या परिस्थितीला जबाबदार कोण, लष्कराला या धर्मसंकटात कोणी टाकले, हे असेच वरचेवर घडत राहणार का हेही प्रश्न महत्त्वाचे आहेत. थोडी स्थिरस्थावर झाल्यावर या व यासंबंधित इतर प्रश्नांचाही नीट मागोवा घेतला गेला पाहिजे. नाही तर पंजाबच्या लहानमोठ्या पुनरावृत्त्याही 'अटळ' आणि 'अपरिहार्य' ठरत राहतील, कोणीही त्या थोपवू-थांबवू शकणार नाही, लोकशाही वाचवण्याची एकेक संधी हातची जात राहील. मागाहून हळहळ-पश्चात्ताप व्यक्त करण्यात काय अर्थ आहे ? □

### राजकीय चर्चांना पंजाबात बंदी

**चंडीगढ : पंजाबमधील शासकीय कार्यालये व शाळा-महाविद्यालये यांमधून राजकीय चर्चा करण्यास बंदी घालण्यात आल्याचे रविवारी राज्यातील सर्व जिल्हा मुख्यालयांना कळविण्यात आले आहे.**

**जो कोणी अशी चर्चा करताना सापडेल त्याच्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल, असेही कळविण्यात आले असून शासकीय कचेऱ्यांमधील राजकीय चर्चेला खातेप्रमुखच जबाबदार समजला जाईल, असेही या आदेशात म्हटले आहे.**

**—केसरी, २५ जून ८४**

# मुंबापुरी

## ☐ डंपीची कैफियत

राष्ट्रीय संजय विचारमंचाचे उपाध्यक्ष अकबर अहमद ऊर्फ डंपी याची गेल्या आठवड्यात मुंबई मराठी पत्रकार संघात पत्रकारांशी बातचीत झाली. ते नुकतेच भिवंडीला भेट देऊन आले असल्याने आल्या-आल्याच त्यानी दंगलीची न्यायालयीन चौकशी व्हायला पाहिजे अशी मागणी केली आपण इतक्या उशीरा भिवंडीला भेट कशी काय दिलीत असे विचारल्यावर ते म्हणाले की, उत्तर प्रदेशात श्रीपत मिश्रानी त्यांच्या वर खून, मारामारी, दरोडा अशा विविध गुन्ह्यापायी सतरा दावे लावले आहेत. त्यामुळे त्याना राज्याबाहेर पडणे मुश्किल झाले आहे.

एके काळी या देशाचे आशास्थान असलेले थोर नेते संजय गांधी याचे अकबर अहमद हे जवळचे मित्र. त्यांच्याप्रमाणेच तेही डून स्कूलमधून बाहेर पडले. आजकाल पार्ले टिळक विद्यालयातून ज्याप्रमाणे एस. एस.सी. बोर्डात पहिले येणारे विद्यार्थी बाहेर पडतात तसे ह्या डून स्कूलमध्ये राजकीय पुढारी निर्माण होतात ! पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्यां-प्रमाणेच या राजकीय पुढाऱ्यांचे पुढे काय होते ह्याचा आम्ही अभ्यास केलेला नाही.

डपी हे नैनितालजवळचे मोठे जमीनदार आहेत. त्याच्या सख्ख्या भावाला गावातले लोक डपी म्हणत म्हणून आपले नाव डपी पडले असे त्यांनी आम्हाला सांगितले. डून स्कूलमधून बाहेर पडल्यावर त्यांनी लखनौला बी ए. केले आणि मग लडनला जाऊन सी. ए. चा अभ्यास केला.

लडनला नऊ वर्षे राहून ते १९७७ साली भारतात परतले आणि सजय गाधीबरोबर त्यांनी त्याचा राजकीय प्रवास सुरू केला. एकोणिसशे ऐंशीच्या निवडणूकीत ते कॉंग्रेस आयच्या तिकिटावर निवडूनही आले. विश्वनाथ प्रताप सिंह आणि श्रीपत मिश्रा ह्या दोघानाही मुख्यमंत्री पदावर नियुक्त करण्यात आपला सिंहाचा वाटा आहे असा त्यांचा दावा आहे. संजय गाधी यांच्या मृत्यूनंतर मात्र त्यांच्या प्रगतीसूर्याला राजीव गांधी यांचे ग्रहण लागले. त्यांची पक्षातून हकालपट्टी होण्यापूर्वी वसतदादानीच त्यांच्यावर कारणे दाखवा नोटीस बजावली होती. कॉंग्रेस आयमधून बाहेर पडल्यावर लोक विचारमंच काढतात, ही मात्र चिंता करण्यासारखी गोष्ट आहे. ह्या विचार-मंचाने उत्तर प्रदेशातील मलिहाबाद येथील विधानसभेची जागा बायइलेक्शनमध्ये जिंकल्याने येत्या लोकसभा निवडणुकात आपण उत्तरप्रदेशातील सर्व जागा जिंकू अशी त्याना खात्री वाटू लागली आहे.

आपले नाव डपी पडल्यामळे आपला फार तोटा होतो. इंदिरा गाधीना मात्र त्यांच्या नावाचा फायदा होतो असे त्याना वाटते. 'पंडित नेहरूंची मुलगी म्हणून त्या नावाचा फायदा आणि पुन्हा ज्या पारशी गृहस्थाशी त्यांचा विवाह झाला त्याचे नाव फिरोज गांधी म्हणून गाधी नावाचाही फायदा इंदिरा गाधीना मिळतो' अशी त्याची तक्रार आहे.

'त्यांच्या पतीचे नाव जर फिरोज बाटलीवाला असते तर निवडणुकीत त्यानी काय 'व्होट फॉर मिसेस बाटलीवाला' अशी घोषणा केली असती ?' असा प्रश्न त्यानी उपस्थित केला.

पण याचबरोबर या विचार मंचाच्या अध्यक्षा मनेका गांधी याचेही नाव मिसेस बाटलीवाला झाले असते त्याचे काय ?

## ☐ खेळखंडोबा

नगरविकासखात्यातील रामराव आदिक आणि चंद्रकांत त्रिपाठी ह्या दोन दानवांचे निर्दालन झाल्यापासून मुंबापुरीवर गोब्राह्मण प्रतिपालक क्षत्रियकुलावतस श्री. द. म. सुखथनकर ह्याचे राज्य चालू आहे. सुरुवातीस काही काळ नगरसेवकानी समांतर महापालिका चालविण्याचा खटाटोप केला; पण सुखथनकरानी थोडक्या अवधीतच त्याना आपल्या आधिपत्याखाली आणले.

तरीही गेल्या दोन महिन्यात या शहराच्या सुखसोयीत सुखथनकरानी काही भर टाकली नाही; पण बी. इ. एस्. टी. च्या भाडेवाढीस मात्र मंजुरी दिली. त्यामुळे बी. इ. एस् टी. चे केरकर आता टॉपगिअरमध्ये आहेत. या भाडेवाढीला विरोध करण्यासाठी विरोधी पक्षाच्या नेत्यांनी 'बस-रोको' आंदोलन सुरू केले. त्याला अपेक्षेइतका प्रतिसाद लाभला नाही.

वांद्र्याला सकाळी नऊ वाजता बसेस अडविल्या जाणार होत्या. आम्ही भल्या पहाटे नऊ वाजता वांद्र्याला पोहोचलो तेव्हा पोलिसही येऊन ठेपले होते. निदर्शक मात्र अकरा वाजता आले. तब्बल दोन तास खेळ उशिरा सुरू झाल्याने आमचा फार हिरमोड झाला. मुंबापुरीत वीस ते पंचवीस ठिकाणी बसेस पाचपाच दहा दहा मिनिटे अडविल्या गेल्या आणि नतर पोलिसानी निदर्शकांना अटक केली.' संध्याकाळपर्यंत सर्वांची सुटका झाली. भाडेवाढ मात्र चालूच आहे.

## ☐ बदल ! बदल !

पोलीस आयुक्त रिबेरो यानी एका फटक्यानिशी जवळजवळ दीड–दोनशे पोलिसांच्या बदल्या केल्याचं कळलं. म्हणून चौकशी केली तेव्हा या सगळ्या बदल्या 'रूटिन' असल्याच कळलं.

मंत्रालयातही अशाच काही रूटिन बदल्या वसतदादांनी केल्या आहेत. या सगळ्या बदला–बदलीने आम्ही साप्रत चक्रावून गेलो आहोत. त्यात पुन्हा भर म्हणून की काय, अशाच काही अकटो–विकटो बदलाबदलीचे किस्से कानावर येताहेत.

उदाहरणार्थ, आपल्या हिंदी सिनेमातल्या रेखाबाईंनी सध्या योगाभ्यासाकडे जोरदार लक्ष द्यायला सुरुवात केली आहे. योगावरची त्याची एक कॅसेटही अलीकडेच प्रसिद्ध झालीये. 'माइण्ड अँड बॉडी टेम्पल' की काहीसं नाव आहे या कॅसेटच.

रेखाने योगविद्येकडे मोहरा वळवलाय अन तिथे तिचे निर्माते ध्यानस्थ होण्याच्या बेतात आहेत रेखाला आता चित्रपट फार कमी मिळतात अन ती अख्खा वेळ योगाभ्यासच करते असं देवयानी चौबळ खुशाल म्हणोत. या चौबळकाकीचं काय हो जातं असं लिहायला ? आतले लोक सांगतात की, रेखाचा 'उत्सव' हा पिक्चर म्हणजे निव्वळ नयनोत्सव आहे. थोडक्यात काय, रेखाला नवा बदल चग्गलाच मानवलाय म्हणायचा !

आमचे विजयराव तेंडुलकरही खूप बदलत चाललेत. नाही – मी दाढी आणि पद्मभूषण विषयी नाही म्हणत ! परवा तर तेंडुलकरानी कहर केला ! अहो, अंधेरीला की जुहूला कुठेस स्वामी चिन्मयानदाच 'प्राचीन भारतीय संस्कृती आणि अध्यात्म' या किंवा अशाच कोणत्याशा विषयावर आख्यान होतं. प्रमुख पाहुणे म्हणून विजयराव !

आता तेंडुलकरच असे बहकले तर महाराष्ट्रातल्या वैचारिक परंपरेचं, सास्कृतिक सवितांचं काय होणार या चिंतेन आमचे काही मित्र विव्हल झाले आहेत. तेंडुलकरांना पुन्हा काही विचारायचीही सोय नाही. ते खुद्द सागतात की, मी बेईमान आहे. तेंडुलकरांचा हा बदल मान्य होण कठीण आहे. यावर ग्रथालीन एक परिसंवाद करावा. गं. बा. सरदार, दिनकर साक्रीकर, नलिनी पंडित आणि ब्रह्मचारी विश्वनाथजी भाग घेतील. मीनव्हाइल, कुमार केतकर पेन्सिलीला टोक काढताहेत. पहा, ते 'इलस्ट्रेटेड विकली'त तेंडुलकरावर एल्गार पुकारतील !

इतर अनेक बदल आस्ते आस्ते यत्र, तत्र, सर्वत्र घडतायेत; पण त्यासबधी पुन्हा केव्हा तरी सविस्तर.

—विष्णु जयदेव

# निर्णय

आज दहावीचा निकाल,
आयुष्याच्या एका नव्या टप्प्याची सुरुवात
सकाळी उठल्यावर पेपर उघडला–
पेपरात गुणवत्ता–यादीत आलेल्या
विद्यार्थ्यांचे हसरे फोटो होते
त्याना किती मार्क, किती टक्के
मिळाले याची अनुक्रमे यादी होती.
या गुणवत्ता–यादीत आलेल्या
विद्यार्थी–विद्यार्थिनीच्या मुलाखती होत्या
त्या वाचल्या
क्षणभर सुन्न झालो
विचारात पडलो
अर्थात मी विचारात का पडलो ?
हा प्रश्न निर्माण होणारच
पण–
पण त्याचे कारणही तसेच होते.
या गुणवत्ता–यादीत आलेल्या
सर्वच्या सर्व
म्हणजे A to Z
सर्वांना डॉक्टर अथवा इंजिनियर
व्हायचे होते !
कुणालाही प्रोफेसर, वकील, बँकमॅनेजर
I. A. S, शास्त्रज्ञ किंवा कॅप्टन अगर मेजर
व्हायची इच्छा नव्हती.
प्रत्येकाला अगर प्रत्येकीला
फक्त दोनच व्यवसाय माहिती
दिसत होते.
समाजामध्ये हुशारी, ज्ञान,
कौशल्य, धाडस
हे फक्त
या दोनच व्यवसायांत लागते अथवा असते
अशी अत्यंत चुकीची धारणा
या विद्यार्थ्यांची दिसत होती.
या विद्यार्थ्यांच्या मुलाखती
पाहिल्या असता
आणखी एक गोष्ट नजरेसमोर
आली.
ती अशी
की बोर्डात आलेल्या
जवळजवळ सर्वच
विद्यार्थ्यांचे आईवडील हे
उच्च शिक्षित–उच्च स्थानावर असलेले
असे आहेत.
असे असताना
या सर्वांना आपली मुलं
फक्त डॉक्टर अथवा इंजिनियरच
व्हावीत असे का वाटते ?
केवळ संपत्ती व कीर्ती
ही दोनच कारण आहेत का ?
पण समाजातील इतर कोणत्याही
व्यावसायिकाला त्याने त्याचा व्यवसाय
कष्टाने, निष्ठेने व प्रामाणिकपणे
केल्यास
वरील दोन्हीही गोष्टी
सहज प्राप्त होऊ शकतात.
अर्थात
त्याचं प्रमाण कमी–जास्त असेल;
पण
सर्वांना अशी संधी मिळू शकते.
हाताची पाची बोटं
सारखी नसतात
हे निश्चित
पण त्यातील प्रत्येकाला
स्वत:चे असे स्वतंत्र
अस्तित्व असतेच.
स्वतंत्र स्थान असते,
आणि प्रत्येक जण आपापल्या जागी
श्रेष्ठ असतो.
अगदी लहान म्हणजे
दोन–अडीच वर्षांच्या मुलाला
तुम्ही विचारलंत् की
तू कोण होणार ?
तर ते मूल आपल्या
बोबड्या शब्दात सागतं
की डाक्तल किंवा इंजिनिअल
म्हणजे
ते मूल इतकं लहान असताना
सुद्धा त्याच्यावर सतत
हेच बिंबवलं जात असतं
की त्यानं डॉक्टर अथवा इंजिनियरच
व्हायचं.
साधारणपणे पंधरा-सोळा वर्षांच्या
मुलाच्यामध्ये
व्यवसाय निवडण्याचा निर्णय
घेण्याची कुवत, ताकद नसते.
त्याना या व्यवसायाबद्दल
आकर्षण वाटत असतं
ते केवळ त्यांच्या भोवती
निर्माण झालेल्या प्रसिद्धीच्या वलयामुळे
आजच्या परिस्थितीत, बहुसंख्य
मुलाचे शिक्षण, व्यवसाय याबाबत
निर्णय घेतले जातात
ते त्याच्या पालकाच्याकडून,
शिक्षकाच्याकडून, त्याच्या
नातेवाइकाच्याकडून.
या सर्वांत त्या मुलांच्या
मनाचा, व्यक्तिगत आवडी-निवडीचा
अंगातल्या कलांचा, गुणाचा,
त्याच्यामध्ये असलेल्या
साहसी वृत्तीचा
कोणीही विचार करत नाही.
आणि मग कित्येकदा
आपल्या मनाविरुद्ध
शिक्षण घेणाऱ्या मुलांना
पुढील आयुष्यात
त्यांचा स्वत:चा व्यवसाय
करत असताना
Job Satisfaction
कितपत मिळत ?
त्याना पैसा मिळतो
पण मिळालेल्या
पैशाचा उपभोग
कसा घ्यावा, उपयोग कसा, कुठे
करावा हे त्याना कोणी
समजावून सांगितलं आहे का ?
आपण मिळवलेल्या संपत्तीमध्ये
समाजाचाही काही वाटा आहे
हे त्यांना कोणी समजावून
सांगितलं आहे का ?
हे सर्व प्रश्न निर्माण होण्यास
जबाबदार कोण ?
म्हणूनच हा निर्णय
हा आयुष्याचा निर्णय
ठरत असल्याने,
अत्यंत शांतपणे, संयमाने
व परिस्थितीचा पूर्ण विचार
करूनच घेतला जावा
एवढीच माफक अपेक्षा !
□

## दहावीनंतरची कॉलेजहवा

माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल लागला. निकालानंतर मुलांची व त्याच्या पालकांची, मुलाच्या अॅडमिशनसाठी धावपळ सुरू झाली.

काही वर्षांपूर्वीपर्यंत मुलाला ६०

टक्क्याच्या वर मार्क मिळाले, म्हणजे फर्स्ट क्लास मिळाला की त्याचे किती कौतुक व्हायच; पण आज परिस्थिती कमालीची बदलली आहे.

माध्यमिक शालात परीक्षेच्या निकालानंतर पुण्यातील निरनिराळ्या नामवंत महाविद्यालयातून फेरफटका मारला. या फेरफटक्यात जे दिसलं, जे अनुभवलं ते सागण्याचा हा प्रयत्न.

पुण्यातील प्रत्येक महाविद्यालयासमोरील प्रचंड वाहनांची गर्दी ही आतमध्ये झालेल्या गर्दीची कल्पना देण्यास पुरेशी होती. महाविद्यालयाचे आवार, आजूबाजूचा परिसर, फुटपाथ हे सर्व वाहनानी भरून गेलेले होते. रस्त्यावर वाहने इतक्या प्रचंड प्रमाणावर लावण्यात आली होती की, दोन दिवस रस्त्यावरची वाहतूक पूर्णपणे विस्कळित झाली होती. महाविद्यालयाचे आवार हे जणू जत्रेसमान वाटत होते. महाविद्यालयाच्या आवारात अकरावीसाठी प्रवेश–अर्ज देण्याचे काम सकाळपासून सुरू होते. अक्षरशः शेकडो मुलं व त्याचे पालक हे अर्जासाठी रांगेत ताटकळत उभे होते. कित्येक जण तर सकाळी सहापासून येऊन नबर धरून उभे होते अनेक ठिकाणी शास्त्र, वाणिज्य व कलाशाखासाठी स्वतत्रपणे प्रवेशअर्ज देण्याचे काम चालू होते. शास्त्र व वाणिज्य प्रवेशअर्जासाठी जरी मोठमोठ्या रांगा असल्या तरी कलाशाखेच्या अर्जासाठी मात्र कोठेही मोठाल्या रांगा आढळल्या नाहीत. तेथे अर्ज लगेच मिळत होते.

सपूर्णपणे भरलेला प्रवेशअर्ज स्वीकारण्यासाठी निराळी व्यवस्था केलेली होती. प्रत्येक शाखेचे प्रवेशअर्ज स्वीकारण्यासाठी निरनिराळे काऊंटर केलेले होते; पण बहुतेक ठिकाणी ही व्यवस्था पण अपुरी पडली. कारण अर्ज स्वीकारणाऱ्या व्यक्ती या एक किंवा दोन होत्या व प्रत्यक्षात प्रवेशअर्ज शेकड्याने येत होते. प्रत्येक विद्यार्थ्याबरोबर त्याचे कमीत कमी एक किंवा दोन पालक आल्यामुळे तर गर्दी प्रचंडच दिसत होती; परतु शेवटी वरिष्ठ अधिकाऱ्यानी, शेकडा ८५% वर गुण मिळालेल्या विद्यार्थ्याच्यासाठी वेगळी व्यवस्था केल्यावर परिस्थिती नियंत्रणाखाली आली.

कित्येक महाविद्यालयांनी प्रवेशअर्जच मुळी किमान ६०% वर गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच दिले. त्या ठिकाणी उपस्थित पालकाचा तेथे असलेल्या व्यक्तीशी वादविवाद चाललेला दिसत होता. प्रवेशअर्ज कोणालाही द्यायला तुमची काय हरकत आहे ? तेवढेच कॉलेजचे उत्पन्न तरी वाढेल असा संवाद कानांवर येत होता. त्याचप्रमाणे जेव्हा कॉलेजने ८०%, ८५% वर मार्क असणाऱ्यानाच शास्त्रशाखेकडे प्रवेश दिला जाईल असे जाहीर केले तेव्हा अनेक पालक तावातावाने भाडू लागले की जर ८०% ला प्रवेशअर्ज द्यायचा होता तर ६०% ला प्रवेशअर्ज दिला तरी कशासाठी ? आमचा वेळ, पैसा, श्रम वाया घालवण्यासाठी ?

पुण्यातील सर परशुराम भाऊ (स. प.) महाविद्यालयाचे उपप्राचार्य व्ही. एम. दाते यांना ज्या वेळी प्रवेशासबंधी विचारल त्या वेळी ते म्हणाले, शास्त्रशाखेच्या उपलब्ध जागाच्या पाचपट प्रवेशअर्ज महाविद्यालयाकडे आले. वाणिज्य शाखेचेही पाचपट अर्ज खपले. मात्र कलाशाखेच्या उपलब्ध जागापेक्षा फक्त दुप्पट अर्जच खपले. महाविद्यालयाने सुरुवातीला उपलब्ध जागासाठी शास्त्रशाखेकडे ८८% वर गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला. मात्र नंतर तो ८५% पर्यंत खाली आणला. एकूण जागापैकी ३४% जागा या ओ. बी. सी. बी सी. वगैरेंसाठी राखीव आहेत. वाणिज्यशाखेकडे ७५ ते ७७% गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. मात्र कलाशाखेकडे हे प्रमाण ५५ ते ६०% इतके कमी झालेले आहे. शास्त्रशाखेकडे महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स व स्कूटरमेकॅनिक्स हे विशेष विषय शिकवले जातात. या विषयासाठी अनेकजण मागणी करतात, पण प्रवेश फक्त २५–२५ विद्यार्थ्यांनाच दिला जातो. महाविद्यालयामध्ये यंदाच्या शालात परीक्षेत पहिल्या पन्नासात आलेल्या बारा विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

यानंतर गरवारे कॉमर्स या महाविद्यालयाचे रजिस्ट्रार श्री. जोगळेकर यांची गाठ घेतली. त्यानी सांगितलं की, महाविद्यालयातील उपलब्ध जागेच्या जवळजवळ तिप्पट प्रवेश–अर्ज महाविद्यालयाकडे आले. एकूण २०० जागांपैकी १६० जागा महाविद्यालयातर्फे भरल्या जाणार असून उरलेल्या ४० जागा शिक्षणखात्याच्या उपसंचालकातर्फे भरण्यात येणाऱ्या जागांसाठी राखीव आहेत. ज्या वेळी त्याना विचारलं की, बोर्डाच्या मेरिट–लिस्टपैकी कोणी महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे का ? त्या वेळी ते म्हणाले की. सर्व मेरिटलिस्टवाले जातात सायन्सकडे. आमच्याकडे येतो कोण ?

पुण्यातील सर्वांत जुन्या अशा फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेशासंबंधी चौकशी केली असता तेथील रजिस्ट्रार श्री. रानडे यानी माझ्यापुढे टाइप केलेले कागदच ठेवले. त्यावर जवळजवळ सर्व माहिती होती. त्यांनी सागितले की, ज्या लोकाना प्रवेशअर्ज हवे होते त्या सर्वांना आम्ही प्रवेशअर्ज दिले. त्यासाठी आम्ही कोणतीही टक्क्याची अट घातली नव्हती. येथेही ३४% जागा या राखीव होत्या. शास्त्रशाखेकडे सुरुवातीला ८४% पर्यंतच प्रवेश दिला. नंतर मात्र ८२% पर्यंत खाली आला. कलाशाखेकडे मात्र हे प्रमाण ५५ ते ६०% असे होते. मेरिटलिस्टपैकी तीन विद्यार्थ्यांनी येथे प्रवेश घेतला आहे. महाविद्यालयातील टेक्निकल या विषयासाठी ५० जागा आहेत.

येथून जवळच असलेल्या मॉडर्न कॉलेजचे प्राचार्य एस. वाय. गभीर याची गाठ घेतली. ते म्हणाले की, शास्त्र व वाणिज्य शाखेच्या उपलब्ध जागाच्या सहापट अर्ज खपले व कलाशाखेच्या जागेपेक्षा तिप्पट अर्ज खपले. त्यांना इतके अर्ज येण्याचे कारण विचारले असता ते म्हणाले की, अनेक विद्यार्थी दोन्ही तिन्ही प्रवेशअर्ज भरून देतात त्यामुळे ही सख्या विनाकारण वाढते प्रवेशअर्जासाठी त्यानी टक्क्यांची अट घातली नव्हती. कॉलेजने निकालाच्या अगोदरपासूनच प्रवेशअर्जाची विक्री सुरू केल्याने मागून होणारी अनावश्यक गर्दी टाळली गेली. हे महाविद्यालय रेल्वेस्टेशनपासून व एस्टीस्टँडपासून जवळच असल्याने बाहेरगावचे अनेक विद्यार्थी याच कॉलेजात प्रवेश घेण्याची धडपड करतात. महाविद्यालयाने शास्त्रशाखेकडे ७५ टक्के, वाणिज्यशाखेकडे ७० टक्के व कलाशाखेकडे ५० टक्के गुणांना प्रवेश दिला.

बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. वैद्य यांना जेव्हा अकरावीच्या प्रवेशासंबंधी विचारलं तेव्हा ते म्हणाले, त्यांच्या महाविद्यालयाने ७० टक्के वर गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच प्रवेशअर्ज दिले. उपलब्ध जागेच्या तिप्पट प्रवेशअर्ज आले. महाविद्यालयाने ७५ टक्के गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच कॉलेजात प्रवेश दिला.

सर्वसाधारणपणे सर्वच महाविद्यालयांच्या प्राचार्यांशी बोलताना एक गोष्ट जाणवली की, सर्वच प्राचार्यांना ज्युनिअर कॉलेज वेगळे असावे असेच वाटते, त्यामुळे ऑफिसस्टाफ व शिक्षकाच्यावरही अनावश्यक ताण पडतो. यामुळें सीनियर कॉलेजकडे धड लक्ष पुरवता येत नाही व ज्युनियर कॉलेजकडेही धड लक्ष देता येत नाही.

७०–७२ टक्के असणाऱ्या पण कुठेही प्रवेश न मिळालेल्या मुलाचे पालक ठिकठिकाणी महाविद्यालयाच्या स्टाफशी तावातावाने विचारत होते की, आमच्या मुलांनी कोठे जायचे ? त्यानी ॲडमिशन तरी कोठे घ्यायची ? त्यावर तो ऑफिसस्टाफ गप्प बसत होता. ते तरी काय करणार होते ? ते नियमाचे बांधिल होते.

शेवटी प्रश्न एवढाच उरतो की, ही परिस्थिती निर्माण होण्यात दोष कोणाचा ? बदललेल्या शिक्षणव्यवस्थेचा का ढासळणाऱ्या शिक्षणाच्या दर्जाचा ?

— राजेंद्र सखदेव

# अनवट

## ☐ तुरुंगाचा देश

इराण–इराक युद्ध आता चार वर्षं झाली तरी चालच आहे. या वेळी परस्परांच्या नागरी लोकसंख्येवर हल्ले करायचे नाहीत हा संकेत पाळला गेला नाही. इराकनेच प्रथम विषारी वायू इराणी नागरी भागात वापरला. नंतर साद–प्रतिसाद चालू राहिले. गेल्याच आठवड्यात हल्ले नागरी वस्तीवर नसावेत असा करार झाला; पण प. आशियामध्ये करार पाळण्याची पद्धतच नाही...परत हल्ले सुरू झाले.

या सर्व अवधीत खुद्द इराणमध्ये खोमेनीच्या धर्मशाहीत काय चालले त्याच्याकडे फारसे लक्षच दिले गेले नाही. तशी कोणतीच माहिती तिथून बाहेर येत नाही. मात्र धर्मशाहीच्या जुलुमापासून सुटका व्हावी म्हणून बाहेरच्या देशात गेलेल्या डाव्या विचाराच्या इराणी तरुणांनी मुजाहिदीन–ए –खल्क ही संघटना काढली. तिच्यामार्फत 'इराण लिबरेशन' हे अनियतकालिक नियमितपणे निघते, साधारणतः सात दिवसातून एकदा निघणाऱ्या या वृत्तपत्रात खोमेनीच्या धर्मवेड्या व युद्धखोर धोरणावर भरपूर टीका असते. इराणमधली तुरुंगातील, चळवळीतील दुर्मिळ माहिती मोठ्या कष्टाने व हिकमतीने ही मंडळी गोळा करतात.

इराणमधील तेहरानचा एविन तुरुंग हा अत्याचार ब्रेनवॉशिंग यासाठी कुख्यात आहे. कैद्यांना पलंगांना पालथे बांधले जाऊन रक्तबंबाळ होईपर्यंत फटके दिले जातात. (स्त्रियांनासुद्धा) हे येथील वैशिष्ट्य ! या तुरुंगातून सुटलेला व परदेशात गेलेला हुसेन दादखा याने 'इराण लिबरेशन'मध्ये याचे तपशीलवार वर्णन दिले आहे तिथे असे ३२३ तुरुंग असून १२०२ राजकीय कैद्यांचा छळ होतो आहे.

## ☐ जून महिन्याची आठवण

अ–लोकशाहीवाद्यांना मध्येच आपली लेजिटिमसी (अधिमान्यता) सिद्ध करण्याची गरज वाटते. इंदिराबाईंना आणीबाणीत, (क्षियाना वारंवार) असेच वाटले. खोमेनीलासुद्धा पाच वर्षांनंतर निवडणुका घ्याव्या वाटल्या. मुजाहिदीने खल्कच्या मते या वर्षीच्या १५ एप्रिलला झालेल्या या निवडणुका म्हणजे एक फार्स होता. यामध्यें एकही विरोधी उमेदवार उभा नव्हता !

१९७९ मध्ये खोमेनीच्या राजवटीत पहिली सासदीय (मजलीस) निवडणूक झाली. खोमेनीच्या गणंगानी बळजबरी केली. मुजाहिदांचा एकच प्रतिनिधी मजालीसमध्ये जाऊ शकला. १९८१ च्या निवडणुकामध्ये राजकीय पक्षानी परत प्रचार सुरू केला. मुजाहिदीनने इतर पक्षांबरोबर समझोता करून आपले १४० उमेदवार उभे केले.

२० जून १९८१ नंतर खोमेनी राजवटीने मुजाहिदांना टिपून काढण्यास सुरुवात केली. १४० पैकी ५४ उमेदवारांना ठार मारण्यात आले. अनेक जण अटकेत आहेत. ठार मारलेल्यांत अश्रफ रबीई, अलिया बझरगान शादमानी, अफशार यांच्यासारख्या स्त्री उमेदवारही होत्या.

मुजाहिदीन ही डावी कम्युनिस्ट संघटना आहे. त्यामुळे युद्ध, राष्ट्रीयता यासंबंधी त्यांचे विचार वेगळेच असणार. इराण–इराक युद्धाला त्यांचा विरोध आहे. खोमेनीने हे युद्ध सुरू केले असे त्यांचे म्हणणे. खोमेनीला तर ते शिव्या घालतातच; पण खोमेनीचा वारसदार व इतर पदाधिकाऱ्यांचा उल्लेख 'द मुल्ला हू विल प्रॉबेबली सक्सीड खोमेनी' 'मुल्ला...प्रेसिडेंट ऑफ हायकोर्ट' असा होतो ! कुर्दिस्तानला स्वायत्तता द्यावी अशीही त्यांची मागणी आहे.

धर्माच्या नावावर उभे राहिलेले राष्ट्र ही संकल्पना टिकाऊ नसते–ती खरोखरच काही काळच टिकणारी गुंगी असते हे पाकिस्तान, बांगलादेश, इराण, पॅलेस्टिनी संघटना, अरब जग यांच्या उदाहरणांवरून स्पष्ट होते.

## ☐ विद्यापीठ–राजकारण

विद्यापीठातील राजकारण ही काही मराठवाडा व नागपूर विद्यापीठांचीच मक्तेदारी नाही. मद्रास, कलकत्ता, उत्तरप्रदेश, तिरुपती, आंध्र इत्यादी अनेक युनिव्हर्सिट्या या प्रवाहात सध्या डुबताहेत. कलकत्ता विद्यापीठासंबंधीचा वाद जरा उच्च म्हणजे त्याला थोडी वैचारिक लेव्हल होती. परत 'केंद्र–राज्य' या सनातन वादाची डूब होतीच. आपल्याकडे ती कॉंट्रव्हर्सी' नाही. आपले अजून गावठी राजकारणच आहे !

नुकताच गाजत असलेला तिरुपतीच्या श्रीवेंकटेश्वर विद्यापीठाचा मामला थोडा आपल्याकडील मराठवाडा विद्यापीठाप्रमाणे–म्हणजे रजिस्ट्रार आणि कुलगुरु यांच्यातील वादाचा. त्यातही गंमत म्हणजे सिंडिकेटने नेमलेले कुलसचिव (रजिस्ट्रार) सी. सुब्बाराजू व पदावरचे कुलसचिव डॉ. के. सी. रेड्डी दोघानीही कुलसचिवाचे काम एकदम मनावर घेतले ! अर्थात त्यात सुब्बाराजू विजयी झालेच. आंध्राचे राज्यपाल रामलाल यांनी नेमलेले कुलगुरु जी. एन. रेड्डी एन. टी. रामारावांना नको होते; पण

पृष्ठ ३२ वर

# कितीही झाले तरी हिंदू व शीख भाऊ भाऊ आहेत !

अभय गोखले

पंजाबमध्ये अमृतसर येथील सुवर्णमंदिरात भिंद्रनवाले व त्यांचे हस्तक याचा बंदोबस्त करण्यासाठी सरकारला नाइलाजाने लष्करी कारवाई करावी लागली व त्यात भिंद्रनवाले, शीख स्टुडंट्स फेडरेशनचे अध्यक्ष अमरिकसिंग व निवृत्त अधिकारी मेजर शुभेगसिंग हे ठार झाले. अमरिकसिंग हे भिंद्रनवाल्यांच्या अगदी जवळचे समजले जात, तर बांगलादेश मुक्तिसंग्रामात शौर्य गाजवलेले; परंतु नंतर काही कारणास्तव लष्करातून काढून टाकलेले शुभेगसिंग हे नंतर भिंद्रनवाल्याना जाऊन मिळाले होते व एकंदर अतिरेक्यांच्या कारवायांमागे व त्याना सैनिकी प्रशिक्षण देण्यात शुभेगसिंग याचा सर्वांत मोठा सहभाग होता.

सुवर्णमंदिरात लष्कर घुसवण्याचा निर्णय इंदिरा गांधींनी सुखासुखी घेतलेला नव्हता; परंतु अतिरेक्याच्या कारवायांना एवढा ऊत आला होता व भिंद्रनवाले व त्याचे सहकारी इतके बेताल बनले होते की, इंदिरा गांधीना हा निर्णय खेदाने घ्यायला लागला. पंजाबमध्ये कायदा व सुव्यवस्था नावाची चीज अस्तित्वात राहिलेली नव्हती. अतिरेकी आपल्या मर्जीनुसार शेकडो निरपराध लोकाचे खून पाडून पळून जात होते व सुवर्णमंदिराचा आश्रय घेत होते. खून, दरोडे, जाळपोळ, लूटमार याना ऊत आला होता. ज्या निरपराध लोकाचे खून होत होते त्यातील बहुसंख्य लोक हिंदू होते. अशा परिस्थितीत अतिरेक्याना असेच रान मोकळे सोडले असते, तर त्याची प्रतिक्रिया संपूर्ण भारतातील हिंदूमध्ये उमटली असती व भारतभर हिंदू व शीख याच्यात संघर्ष निर्माण होऊन अराजक माजले असते. तेव्हा सुवर्णमंदिरात लष्कर घुसवण्याचा निर्णय यातनाकारक असला तरी अटळ होता. सुवर्णमंदिर हा गुन्हेगार, दरोडेखोर, खुनी याचा सुरक्षित अड्डा बनला होता. अशा परिस्थितीत सुवर्णमंदिराचे पावित्र्यच नष्ट झाले होते. सुवर्णमंदिरात लष्कर घुसवून अतिरेक्यांचा नायनाट केल्याने आता अकालीचे पवित्र स्थान सुवर्णमंदिर पावन झाले आहे !

आकाशवाणीवरून गुरुवाणी प्रक्षेपित करणे, संपूर्ण अमृतसर शहर पवित्र शहर म्हणून घोषित करणे अशासारख्या अकालीच्या धार्मिक मागण्या सरकारने मंजूर केल्यावर अकालीचे आदोलन आटोक्यात येईल असे वाटत होते; परंतु एकदा सूत्रे भिंद्रनवाले व त्यांच्या साथीदाराच्या हातात गेल्यावर मग रोजच्या रोज नवीन मागण्या वाढतच गेल्या. पंजाबला चंदीगढ देणे ही मागणी योग्य होती; परंतु त्या बदल्यात हरयाणाला अबोहर व फाजिल्का हा भाग देण्यात यावा याबाबतीत अकालीनी आडमुठेपणाची भूमिका घेतली. रावी, बियास, सतलज या नद्याच्या पाण्याचा सर्व वाटा पंजाबला मिळावा, फार तर थोडाफार हिस्सा हरयाणाला देण्यात यावा; परंतु राजस्थानला पाण्याचा एक थेंबही देण्यात येऊ नये ही अकालीची मागणी अव्यवहार्य होती. पंजाबला अधिकाधिक स्वायत्तता मिळावी ही मागणी अकालीकडून करण्यात आली; परंतु राज्याना स्वायत्तता देण्याच्या बाबतीत त्यावर विचार करण्यासाठी केंद्र सरकारने सरकारिया कमिशनची नेमणूक केलेली आहेच. हरयाणाप्रमाणे हिमाचलप्रदेश व राजस्थानच्या काही भागावर अकालीनी सांगितलेला दावा हास्यास्पदच म्हणावयास हवा शेवटी अकालीनी घटनेचे २५ वे कलम बदलण्याची मागणी केली अकालीकरिता (शिखासाठी) वेगळा पर्सनल लॉ असावा अशी मागणी भिंद्रनवाले फार पूर्वीपासून करीत होते, ती मागणी आता अधिकृतपणे करण्यात आली. अकालीच्या धार्मिक मागण्या सरकारने ताबडतोब मंजूर केल्या. कारण त्यात इतरांचे हितसंबंध गुतलेले नव्हते; परंतु त्याच्या राजकीय मागण्याच्या बाबतीत इतर राज्ये व इतर जमातीचे हितसंबंध गुतले असल्याने त्यावर तडकाफडकी निर्णय घेणे केंद्रसरकारला शक्यच नव्हते. अकाली, केंद्रसरकार, विरोधी पक्ष याच्यात पंजाबची समस्या सोडविण्यासाठी चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या; परंतु चंदीगढ पंजाबला देण्याच्या बाबीशिवाय कोणत्याच प्रश्नावर त्याचे एकमत होईना. इकडे अतिरेक्यांच्या कारवायाना जोर चढला. लोंगोवाल, तोहरा, बादल, बर्नाला या मवाळ अकालीकडून आंदोलनाची सूत्रे भिंद्रनवाल्याकडे गेली हे भिंद्रनवाले पूर्वी कोणी नव्हते. १९७८ मध्ये अकाली व निरंकारी याच्यात मोठा संघर्ष होऊन त्यात बरेच अकाली मारले गेले. या संघर्षात भिंद्रनवाल्यानी लक्षात रहाण्याजोगी भूमिका बठवली होती. या संघर्षानंतरच भिंद्रनवाले प्रकाशात आले व संत बनले. त्याना अकालीमधील उत्साही अतिरेक्याचा पाठिंबा मिळू लागला. श्री. झैलसिंग पंजाबचे मुख्यमंत्री असताना भिंद्रनवाल्याचे अकालीवरील प्रभुत्व पाहून त्यानी अकालीदलाला शह देण्याकरीता भिंद्रनवाल्याचा उपयोग करून घेतला. अर्थातच भिंद्रनवाल्याचे कार्यक्षेत्र वाढले. भिंद्रनवाल्याचे भूत कॉंग्रेसवाल्यांनी उभे केले व मग ते त्याच्याच मानगुटीस बसले व शेवटी त्या भुताचा नायनाट करावा लागला. १९७८ च्या निरंकारी-अकाली संघर्षानंतर पंजाबभर अनेक निरंकाऱ्याचे खून पाडण्यात आले. निरंकारीचे गुरु बाबा गुरुबचनसिंग याची हत्या करण्यात आली. दुसरीकडे हिंद समाचार ग्रुपचे संपादक लाला जगत नारायण याचा खून करण्यात आला. त्यासंबंधात संशयित म्हणून भिंद्रनवल्याना अटक करण्यात आली; परंतु चौक मेटता येथे भिंद्रनवाले याच्या अटकेच्या निषेधार्थ अतिरेकी, अकाली व पोलीस याच्यात मोठा संघर्ष होऊन बरेच अतिरेकी मारले गेले. नंतर हा संघर्ष चिघळू नये म्हणून भिंद्रनवाल्याची सुटका करण्यात आली. त्या वेळेस भिंद्रनवाल्याची सुटका

करण्याचा निर्णय सरकारला फार भोवला, अजून भोवतोय व यापुढेही भोवत राहील ! त्या वेळेस भिंद्रनवाल्याना अडकवून ठेवले असते तर आताचा प्रसंग कदाचित आला नसता व बहुसंख्य अकालीमध्ये प्रिय नसलेले भिंद्रनवाले महात्माही बनले नसते.

## मृत्यूला कुर्बानीची झालर

कित्येक जाणकाराच्या मते सुवर्णमंदिरात लष्कर घुसवण्याची कारवाई इंदिराजींनी याअगोदर करावयास हवी होती; परंतु त्याच्याशी सहमत होता येत नाही. कारण लष्करी कारवाईची योग्य वेळ कोणीच सांगू शकले नसते. शिवाय इंदिराजींनी त्याना पुरेपूर वेळ दिला होता. सुवर्णमंदिरात लष्कर पाठवल्यावर त्याचे काय परिणाम होतील याबाबत अंदाज घ्यावयासही सरकारला वेळ हवा होता. याबाबत एवढेच सांगता येईल की, सुवर्णमंदिरात लष्करी कारवाई करण्याच्या योग्य वेळेपेक्षा ती कारवाई टाळणे याला केंद्र सरकारने जास्त महत्त्व दिले. शेवटी सर्व उपाय थकले तेव्हा पंजाबमधील अराजक इतरत्र पसरू नये म्हणूनच लष्करी कारवाई करण्यात आली व त्याअगोदरही अतिरेक्याना वारंवार शरण येण्याचे इशारे बाहेरून देण्यात आले. थोडे अतिरेकी शरणही आले; परंतु त्याची संख्या नगण्य होती. सुवर्णमंदिरातून लष्कारावर गोळ्यांचा वर्षाव करण्यात आला. तेव्हा मग लष्कराने कठोर कारवाई करून अनेक अतिरेक्यांना यमसदनास पाठविले. यामध्ये लष्कराचीही बरीच हानी झाली; परंतु त्याला कारण म्हणजे सुवर्णमंदिरातील अनेक पवित्र वास्तूना शक्यतो धक्का पोहोचू नये या सद्भावनेतूनच लष्कराने दक्षता घेतली व अतिरेक्यांच्या गोळ्या अंगावर झेलल्या. सुवर्णमंदिरातील लष्करी कारवाईत एकंदर तीनशे अतिरेकी ठार झाल्याचे अधिकृतरीत्या सांगण्यात येते. प्रत्यक्षात हा आकडा बराच मोठा असण्याची शक्यता आहे. लष्कराने रविवारी सुवर्णमंदिर सर्व बाजूनी बंद केले तेव्हा अंदाजे १५०० अतिरेकी आत असावेत. लष्कराच्या त्याना शरण येण्याच्या इशाऱ्यानुसार तीनशेच्या आसपास ते शरण आले. प्रत्यक्ष लष्कर आत घुसल्यावर अंदाजे हजारहून अधिक अतिरेकी आत असावेत. त्यामुळेच लष्करी कारवाईत ठार झालेल्या अतिरेक्याची संख्या तीनशेहून बरीच अधिक असणार.

सुवर्णमंदिरातील लष्करी कारवाई पूर्ण झाल्यावर मंदिरात सापडलेला शस्त्रास्त्राचा प्रचंड साठा पाहिला तर डोळे फिरून जातात. या शस्त्रास्त्रामध्ये चिनी, पाकिस्तानी, स्वीडिश बनावटीची निरनिराळी शस्त्रे सापडली. यावरून अकाली अतिरेक्याना या देशाकडून भरघोस मदत व चिथावणी मिळत होती असा निष्कर्ष काढला तर तो गैर ठरू नये. अतिरेकी ठार झाले याचे कोणालाच सोयरसुतक असण्याचे कारण नाही; परंतु भिंद्रनवाले, अमरिकसींग, शुभेगसिंग याच्या मत्यूला काही लोकाकडून कुर्बानीची झालर लावण्यात येत आहे ती निषेधार्ह आहे. या तिघांच्या व इतर अतिरेक्यांच्या मृत्यूमुळे बहुसंख्य अकालीच्या मनात त्यांच्याबद्दल आदर निर्माण झाला आहे. सुवर्णमंदिरातील लष्करी कारवाईच्या निषेधार्थ भारतभर शिखांनी उग्र निदर्शने केली ह्यात इंदिरा गांधीविरोधी व भिंद्रनवाल्यांच्या बाजूने घोषणा देण्यात आल्या. त्याची गंभीर दखल सरकारने घ्यावयास हवी. भिंद्रनवाले व त्याचे अतिरेकी साथीदार लष्करी कारवाईत ठार झाले असले तरी ते त्यांच्या कर्माने मेले आहेत. त्यांच्याबद्दल शिखांना सहानुभूती वाटण्याचे कारणच काय ? भिंद्रनवाल्यांचे अतिरेकी साथीदार असंख्य निष्पाप नागरिकाचे खून पाडत होते त्याबद्दल त्यांना शासन होणे योग्यच होते भिंद्रनवाले अकालतख्त येथे वास्तव्य करून आपल्या बेताल वक्तव्यानी शीख अतिरेकी, शीख पोलीस व सैनिक याना चिथावणी देत होते. सुवर्णमंदिराचे पावित्र्य त्यानी व त्यांच्या साथीदारानी नष्ट केले होते. सुवर्णमंदिर परिसरात सिगारेट व दारू विकण्यास बंदी आहे. संपूर्ण अमृतसर शहर पवित्र शहर म्हणून घोषित करण्याची शिखांची मागणी होती आणि लष्करी कारवाई पूर्ण झाल्यावर सुवर्णमंदिरातील, अतिरेकी वास्तव्य करीत असलेल्या जागेत शस्त्रास्त्राच्या प्रचंड साठ्यांबरोबर दारूच्या बाटल्याही सापडल्या ! यावरून पवित्र सुवर्णमंदिरास अतिरेक्यानी काय अवकळा आणली होती व ते किती अपवित्र केले होते याची कल्पना येते. तेव्हा अशा पापी अतिरेक्याना ठार केल्याबद्दल व त्यांचा नायनाट केल्याबद्दल खरे तर शिखांनी लष्करास धन्यवादच द्यावयास हवेत. शिवाय लष्करी कारवाई करताना मंदिरातील निरनिराळ्या भागाची कमीत कमी हानी होण्याची दक्षता लष्कराने घेतली होती.

सुवर्णमंदिरातील लष्करी कारवाईनंतर काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. सुवर्णमंदिरात जो शस्त्रास्त्रांचा प्रचंड साठा सापडला तो काही एकदम झाला नाही. मग ही गोष्ट भारतीय गुप्तहेर खात्याच्या लक्षात कशी आली नाही ? ही गोष्ट सहजपणे दुर्लक्षिण्यासारखी नाही. आपल्याच एखाद्या राज्यात एखाद्या मंदिरात एवढ्या मोठ्या प्रमाणावर परदेशातून शस्त्रास्त्राची आवक होत असताना ही अतिशय महत्त्वाची गोष्ट सी. बी. आयच्या नजरेतून पूर्णपणे नव्हे तरी अंशतः सुटावी याला काय म्हणावे ? आता सांगण्यात येते की, सुवर्णमंदिरात मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे येत असल्याची सरकारला माहिती होती; परंतु ती इतकी अत्याधुनिक असतील याची कल्पना नव्हती. मग असा प्रश्न उपस्थित होतो की, ही माहिती सरकारला असताना त्यावर कारवाई का करण्यात आली नाही ? व सरकारला अर्धवट माहिती कशी काय पुरवण्यात आली ? पंजाब पोलीस, सीमा सुरक्षादल वगैरेंना कित्येक दिवस सुवर्णमंदिरपरिसरात तैनात करण्यात आले आहे, त्यांच्या नजरेतून शस्त्रास्त्रांची आवक कशी काय सुटली ? पंजाबमध्ये दिवसाढवळ्या खून, दरोडेखोरी होत असताना त्यातील क्वचितच कोणी पकडला गेला यावरून पंजाब पोलिसात बहुसंख्य असलेल्या शीख पोलिसांची, त्यापैकी काही जणाची तरी अतिरेक्यांना सहानुभूती होती असा निष्कर्ष यावरून निघू शकतो.

## नवी डोकेदुखी

भिंद्रनवाल्याचा शेवट कसा झाला याबद्दल निरनिराळ्या आख्यायिका सांगितल्या जातात. त्यामध्ये त्यांनी आत्मसमर्पण केले, ते लष्कराकडून मारले गेले, बब्बर खालसाच्या लोकांनी त्याना ठार मारले असे निरनिराळे तर्क केले जातात. अर्थात ते लष्कराकडून मारले गेले असल्याचीच जास्त शक्यता आहे. भिंद्रनवाले नावाचा भस्मासुर मारला गेला; परंतु त्यामुळे ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्या थोड्याच गाडल्या जाणार आहेत ? लष्करी कारवाई

तर अटळच होती. भिंद्रनवाले व त्याचे सहकारी लष्करास शरण येणे शक्य नव्हते तेव्हा त्याचा शेवटही अटळच होता काहींच्या मते लष्कराने मंदिरात न घुसता आतील लोकांचा अन्नपुरवठा बंद करून त्याना उपासमारीमुळे शरण येणे भाग पाडावयास हवे होते; परंतु सुवर्णमंदिरातील एकंदर तयारी पहाता तेथे कित्येक दिवस पुरेल इतका धान्याचा साठा केलेला असणार. यातून काहीच साधले नसते व लष्कराची पकड ढिली झाली असती व काळाचा अपव्यय मात्र झाला असता. सरकारच्या कारवाईचा जगभरच्या सर्व शिखानी एकमुखी निषेध केला असला तरी भारतातील सामान्य जनतेने सरकारला याबद्दल दुवाच दिला आहे. राजकारण बाजूला ठेवून हा निर्णय सरकारला घ्यावा लागला, त्याला भाजप, जनता, लोकदल, कम्युनिस्ट यांनी पाठिंबा दिला. स्वामीसारख्या जनता-नेत्याने भिंद्रनवाले प्रेमळ होते म्हणून एक मोठा विनोद केला व तो नेहमीप्रमाणे कोणीच गांभीर्याने घेतला नाही. चंद्रशेखर यानीही लष्कराच्या कारवाईवर टीका करून आपला असमंजसपणा दाखवून दिला. *असा नेता जनता पक्षाध्यक्ष असताना त्या पक्षाचे काय विशाद* कल्याण होणार ?

लष्करी कारवाईच्या निषेधार्थ काही राज्यांतून शीख सैनिकानी बंड केले, ही गोष्ट फारच गंभीर आहे. यावरून अतिरेक्याचे हात कुठवर पोचले आहेत हे स्पष्ट होते. त्यांच्याच चिथावणीवरून शीख सैनिकानी बंड केले. पंजाबमध्ये लष्कराने जाळे पसरले असले तरी बरेच अतिरेकी पंजाबात व इतरत्र दबा धरून बसले आहेत व सुवर्णमंदिरातील, लष्कराची कारवाई झाल्यावरही अतिरेक्याचे घातपाताचे उद्योग पंजाबात व इतरत्र अजूनही चालू आहेत. *लष्कराच्या छावणीतून पळून गेलेल्या शीख बंडखोर सैनिकाना* जबरदस्त शिक्षा देऊन दहशत बसवणे आवश्यक आहे. कारण लष्करात शीख सैनिकाची बरीच संख्या असल्याने बंडाचे लोण आणखी पसरू शकेल. यातील बहुतेक शीख सैनिकानी अफवावर विश्वास ठेवून लष्करी छावणीतून पलायन केले असेल; परंतु या गोष्टी लष्कराच्या शिस्तीत बसत नाहीत. भारतीय लष्कर हे नेहमीच राजकारणापासून दूर राहिलय व याचा भारतीयांना अतिशय अभिमान वाटतो. सुवर्णमंदिरातील लष्करी कारवाईत बरेच अतिरेकी, भिंद्रनवाले, अमरिकसिंग, शुभेगसिंग मारले गेल्यावर आता पंजाबमधील अकालींचे आंदोलन व हिंसाचार आटोक्यात येईल या भ्रमात आपण न राहिलेले बरे. सध्या पंजाबमध्ये लष्कर आहे तरी अतिरेक्याच्या छुप्या कारवाया लहान प्रमाणात चालूच आहेत. एकदा लष्कर काढून घेतले की, मगच एकूण परिस्थितीची योग्य कल्पना येईल. लष्कर फार काळ पंजाबमध्ये ठेवता येणे शक्य नाही. लष्करी कारवाईबद्दल पंजाब पोलिसांतील शिखांच्या भावना किती तीव्र आहेत याचाही कानोसा घ्यावा लागेल. कारण लष्कर काढून घेतले की, कायदा व सुव्यवस्था राखण्याची कामगिरी प्रामुख्याने त्याच्यावरच पडणार आहे. अकाली अतिरेकी सुवर्णमंदिरातील लष्करी कारवाईचा बदला घेण्याचा जरूर प्रयत्न करतील व त्यातून आणखी एक भिंद्रनवाले निर्माण होणारच नाहीत अशी खात्री देता येणार नाही. लष्करी कारवाईबद्दल जगातील सर्वत्र शिखांच्या भावना तीव्र असल्या तरी त्या कालांतराने सौम्य होतील; परंतु सूड उगवण्यास टपून बसलेल्या अतिरेक्यांबद्दल खबरदारी घ्यावयास हवी.

सुवर्णमंदिरातील लष्करी कारवाईच्या वेळेस लोंगोवाल व तोहरा हे अकालीनेते शरण आल्याने सर्वसामान्य शीख व्यक्तीस त्याचा राग आला आहे. अर्थात स्वदेशाच्या लष्कराविरुद्ध न लढता त्यांनी शरण येणे पत्करले याबद्दल अभिमानच वाटावयास हवा; परंतु सध्या तरी रागावलेल्या सर्वसामान्य शिखास अतिरेकी व भिंद्रनवाले यांच्याबद्दल जिव्हाळा वाटत आहे. *अकालीदलातील मवाळ समजल्या* जाणाऱ्या बादल, लोंगोवाल, तोहरा, बर्नाला यांची लोकप्रियता सध्या तरी कमी झालेली दिसते. अतिरेकी व भिंद्रनवाले याच्या मृत्यूस कुर्बानीची झालर देण्यात आल्याने सध्या तरी अकाली दलातील मवाळाना फारशी कोणी किंमत देत नाही. लष्कराची अतिरेक्याविरुद्धची मोहीम ही शिखांविरुद्ध आहे असा अकारण गैरसमज करून घेतल्याने कानाकोपऱ्यांतील शीख सरकारवर आग पाखडत आहेत. सुवर्णमंदिरातील लष्करी कारवाई किती अटळ बनली होती याचा धर्माच्या पलीकडे जाऊन विचार करण्यास कोणी फारसे *उत्सुक दिसत नाही व त्यातूनच राष्ट्रपती झैलसिंग हे शीख* असल्याने त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी वेडगळ मागणी होत आहे.

लष्करी कारवाईचे दूरगामी परिणाम काय होतील हे आताच सांगता येणार नाही; परंतु भारतातील बहुसंख्य मुस्लिमाप्रमाणे शिखांच्याच अलगतेची भावना वाढीस लागू शकेल व तिला तेच जबाबदार असतील ! हिंदूबद्दल त्याना फारसे प्रेम रहाणार नाही व आपल्याला पक्षपाती वागणूक दिली जात आहे असा त्यांचा समज होण्याची शक्यता आहे. हिंदू-मुस्लिम या दीर्घकालीन समस्येप्रमाणे *हिंदू-शीख अशी आणखी एक डोकेदुखी निर्माण होऊ शकेल.* मात्र इंदिरा कॉंग्रेसने शासनकर्ता पक्ष म्हणून लष्करी कारवाईची जी भूमिका घेतली तीमध्ये मताच्या राजकारणाचा भाग नव्हता हे बरे झाले. भिंद्रनवाल्याचे भूत शासनकर्त्या पक्षानेच निर्माण केले व त्यानीच ते गाडले आणि हिशोब पुरा केला, याचा फायदा कदाचित त्याना पंजाबात मिळणार नाही; परंतु कधी तरी अशी वेळ येते की, राजकारण बाजूला ठेवून निर्णय घ्यावे लागतात. इंदिराजीनी पंजाबात तेच केले आहे. हिंदू व शीख आतापर्यंत एकमेकाचे सख्खे भाऊ या नात्याने सर्व ठिकाणी वावरले आहेत. लष्करी कारवाईने *त्यांच्या या नात्यात वाईटपणा* येण्याचे काही कारण नाही. आता समंजस शीख नेतृत्वाने आपल्या बांधवास शांत करून त्याना परिस्थितीची नीट कल्पना देणे जरुरीचे आहे. सामान्य हिंदूच्या मनात शिखाबद्दल कोणतेही किल्मिष नाही. सुवर्णमंदिरातील लष्करी कारवाईबद्दल हिंदूनाही यातना होत आहेत. कारण कितीही झाले तरी हिंदू व शीख भाऊ-भाऊ आहेत व आपल्या रागावलेल्या भावाची समजूत आपणच घालावयास हवी!



# एलेनी

मूळ लेखक : निकोलस गेग

अनुवाद : सुधा नरवणे

भाग : पाच

'माणूस'च्या २ जून अंकात 'एलेनी' या सत्यकथेचा पहिला भाग प्रसिद्ध झाला. त्यानंतरच्या ९, १६ आणि २३ जून अंकात अनुक्रमे दुसरा, तिसरा आणि चौथा हे तीन भाग क्रमशः प्रसिद्ध झाले. चालू अंकात या कथेचा शेवटचा भाग दिला आहे.

'एलेनी' ही सत्यकथा आहे अमेरिकेतील प्रसिद्ध पत्रकार आणि लेखक निकोलस गेग यांच्या आईची.

ग्रीसमधलं लिया हे एलेनीचं गाव.

दुसऱ्या महायुद्धात जर्मनांनी ग्रीसवर आक्रमण केलं. त्याचे परिणाम डोंगराच्या कुशीत वसलेल्या या छोट्या गावापर्यंत पोचले.

ग्रीक जनतेनं जर्मन फौजांना हुसकून लावलं; पण नंतर सुरू झालं यादवी युद्ध. या युद्धानं एलेनीसारख्या कित्येक निरपराध लोकांचं जीवन उध्वस्त केलं.

महायुद्धानं एलेनीची नवऱ्यापासून ताटातूट होते; पण खचून न जाता आपल्या पाच मुलांच्या पाठीमागे ती खंबीरपणे उभी राहाते. कम्युनिस्ट क्रांतिकारकांच्या अत्याचारांना निकराची झुंज देत आपल्या मुलांची सुटका करू पहाते.

पळून जाण्याचं धाडस तिला करावंच लागणार होतं; पण कसं? क्रांतिसैनिकांची नजर चुकवून लिया गावातली माणसं पळाली. या पलायनाची संपूर्ण चौकशी करण्यासाठी पक्षश्रेष्ठींनी 'काटिस' हे टोपणनाव घेतलं.

एलेनी त्यांच्या कैदेत होती.

ते तिला मारहाण करताना विचारत–'तूच त्यांची म्होरकी होतीस ना?'

एलेनी सर्व धैर्यानिशी सर्व आरोप नाकारत होती–हे बळ तिच्यात कुठून आलं?

इथपर्यंतचा कथाभाग आपण मागील अंकात वाचला.

इथून पुढे सुरू होते एक सूडकथा!

निकोला–एलेनीचा एकुलता एक मुलगा सूडभावनेने पेटून उठतो...आईच्या मृत्यूचा शोध हा एकच ध्यास घेतो...हा ध्यास सफल होतो का???

या पाचव्या आणि अखेरच्या भागात ही ग्रीक क्रांतिकथा समाप्त होत आहे.

एलेनीला परत तुरुंगात नेलं जात असताना तिला एक महिला क्रांतिसैनिक दिसली. ती होती मिलिया इरुस्रॉयनिस... पूर्णपणे कम्युनिस्ट बनलेली... त्या विचारसरणीच्या पूर्ण आहारी गेलेली... एलेनीला आठवलं, ती एकदा शेतावर काम करायला जात असताना मिलियाचं भाषण तिच्या कानांवर आलं होतं. मायक्रोफोन हातात घेऊन, बेंबीच्या देठापासून ओरडत–आरडत मिलिया म्हणत होती, 'बंधूभगिनींनो, या लोकशाही सेनेन माझ्या जीवनाला अर्थ प्राप्त करून दिला आहे. ही सेना हेच माझं सर्वस्व आहे. मी आई मानीत नाही, भाऊ नाही, बहीण नाही. क्रांतिसेना हेच माझं कुटुंब... !'

वास्तविक मिलियाची आई हयात होती, एवढंच नव्हे तर आपली जन्मदात्री तुरुंगात डांबली गेली आहे हेही तिला माहीत होतं.

एलेनीच्या डोक्यात क्षणार्धात प्रकाश पडला. आपल्या पलायनाच्या पहिल्या दोन अयशस्वी प्रयत्नाची माहिती हिच्याशिवाय दुसऱ्या कुणाला असणार ? आणि ती माहिती क्रांतिसेनेच्या अधिकाऱ्यांना सांगायला हिच्या-पेक्षा दुसरं कोण अधिक उत्सुक असणार ?

घोड्यावर बसलेली मिलिया एलेनीच्या जवळून गेली. तिच्या खांद्यावर बदूक लटकत होती. दोघींची दृष्टादृष्ट झाल्यावर एलेनीला कळून चुकलं आता आपली धडगत नाही !

यापुढं एलेनीचा पद्धतशीरपणे छळ व्हायला लागला. जे काही थोडबहुत धैर्य तिच्याजवळ उरलं होतं, ते ओरबाडून काढ-ण्याचे प्रयत्न चालू झाले.

... ताकी कोटिस नावाच्या एका क्रांति-सैनिकाला आठवतय... चाळिशीची एक स्त्री–तपकिरी भुरे केस... सारखं कुणी ना कुणी तिला प्रश्न विचारतंय... एक दिवस प्रश्न विचारून विचारून तिला अगदी हैराण केलं. मागच्या आवारात नेलं... इतकी मारहाण केली की, अखेर तिनं कबुलीजबाब दिला...

ती म्हणाली, 'होय !... मीच आखला पळून जाण्याचा बेत... ल्यूकस झियारसची मदत घेतली. दोनदा हुकला आमचा बेत... परतावं लागलं आम्हाला... '

का फसले प्रयत्न ? कसे फसले ? कोण–कोण होतं बरोबर ? पुढ कोण होतं ? मागं कोण ? ...प्रश्न, प्रश्न, प्रश्न ! संपेचना हे पर्व...

या प्रसंगानंतर आठ दिवसांनी कॉटिरिस तळघरात आल. लिया गावातल्या कैद्यांच्या नावाची यादी त्यानं वाचून दाखवली. त्या सगळ्यांना हातकड्या घातल्या. एकात एक अडकवून त्याना एकत्र बांधलं आणि म्हणाला, 'आज तुमचं भविष्य जनतेच्या न्यायालयाकरवी ठरवलं जाईल. तुमच्यावर खटला भरलाय. खटल्याची सुनावणी सर्व गावकऱ्यासमोर होईल. तुम्हाला तुमच निरपराधित्व सिद्ध करण्याची संधी मिळतेय. केवढं भाग्य तुमचं...! '

गावाच्या वरच्या अंगाला डोंगराचा एक सुळका खाली घळीत येऊन विसावला होता. घळीच्या बाजूला लक्षावधी वर्षं थेंबथेंब पाणी ठिबकून एक गुफा तयार झाली होती... अगदी एखाद्या खोलीसारखी... या जागेत न्यायाधिशांच्या खुर्च्या-टेबलं ठेवण्यात आली होती. सर्व गावकऱ्याना इथ जमण्याचा आदेश मिळाला. खटले सुरू झाले. २१ ऑगस्ट. आज फक्त एकाच कैद्याची कैफियत ऐकायची उरली होती आणि ती म्हणजे एलेनी ! तिच्यावरचा मुख्य आरोप म्हणजे मुलाना क्रांतिसेनेच्या हवाली न करता गुप्त-पणे दूर पाठवण्याचा.... एकदा नव्हे तर दोनदा कट करण्याचा... दोनदा बेत फसला तरी तिसऱ्यादा तिनं तेच केलं आणि इतर बायकाना चिथावलं. या तिच्या कृत्यामुळं क्रांतिसेनेच्या ध्येयधोरणांची अवज्ञा झाली. हा द्रोह होता.

काटिसनं एका खेडुत स्त्रीचं निवेदन वाचून दाखवलं... 'एलेनी फॅसिस्ट म्हणून प्रसिद्ध होती. तिन प्रथमपासूनच आपली मुल क्रांतिसेनेच्या ताब्यात द्यायला विरोध केला.' वाचताना थाबून काटिसनं विचारलं, 'काय ग, खरं आहे का हे? '

एलेनी स्तब्ध.

मग तो गरजला, 'का ग बये ? आता का वाचा बसली ? कुठं गेला तुझा तो शूर-पणा–पलायनाचा बेत आखताना मोठा पराक्रम दाखवलास. आता दाखव थोड शौर्य !'

एलेनीचे डोळे अश्रूंनी काठोकाठ भरले. तिनं नुसतीच मान हलवली. ती काहीच बोलेना म्हणून अवघडून जाऊन काटिस पुढं म्हणाला, 'तुझं हे कृत्य देशद्रोही आहे. आपली मुलं आणि इतर जणांच्या पला-यनाच्या कटाची सूत्रधार तूच होतीस... आमच्यापाशी एक साक्षीदार आहे तुझ्या तोंडावर हे सांगायला आमचा साक्षीदार कचरणार नाही ... मिलिया इरुस्रॉनियास–ये पुढ सांग बर... '

ती जाडजूड मिलिया विजयी मुद्रेनं पुढं आली... पलायनाचे ते पहिले दोन प्रयत्न.. बाळाचं रडण... नंतर धुकं... सगळं काही, सर्व काही बारीकसारीक गोष्टीसह इत्थंभूत सांगितल... मिलिया म्हणाली, 'ल्यूकस माझ्या आईला आणि बहिणीला देखील चिथावत होता; पण मला या बेताचा सुगावा लागला... मी त्याना म्हटलं... कुठं पळताहात ? लौकरच संपूर्ण ग्रीस कम्यु-निस्टांच्या लाल निशाणाखाली येईल तेव्हा कळेल !' मिलियानं आपल्या बंदुकीचा दस्ता जमिनीवर आपटला... 'या बदुकीची शपथ घेऊन मी सांगते की, माझ्या बोलण्याचा परिणाम होऊन माझ्या आईनं आणि बहि-णीनं पळून जाण्याचा विचार सोडून दिला..'

मिलियाच वक्तव्य ऐकून काटिसला जोर चढला. एलेनीकडं वळून तो म्हणाला, 'एक-दरीत तू पहिल्यापासूनच क्रांतिसेनेच्याविरुद्ध आहेस अस दिसतंय्– चिथावण्या देत होतीस–'

एलेनीचा चेहरा पांढराफटक पडला. तरीही शांतपणे प्रत्येक शब्द तोलूनमापून घेत ती म्हणाली, 'मी चिथावण्या दिल्या हे खरं नाही. एक तरी आई मला दाखवा की, जिला पढवलं... आपली मुल क्रांतिसेनेच्या ताब्यात देऊ नको म्हणून–'

काटिसनं गावकऱ्यांच्या समुदायावरून नजर फिरवली... बोला... द्या या प्रश्नाचं उत्तर... सांगा कुणाकुणाला चिथावलं या अमेरिकावाजिण्या बाईनं... उठा... सांगा लौकर! –'

वाळलेलं पान पडलं तरी आवाज येईल अशी शांतता... कुणीच काही बोलेना... काटिसचा क्रोध उसळून आला. भडकून तो एलेनीला म्हणाला, 'मुद्दाम सांगावं लागत नाही कुणी कुणाला... स्वतःची मुलं क्रांति-सेनेच्या ताब्यात द्यायला नकार देणं हे पुरेसं होतं. तेवढ उदाहरण इतरांना मिळालं... तू देशद्रोही आहेस ! – ' जनसमुदायाकडे वळून

कादिस म्हणाला, 'कोर्ट आता या पुराव्याचा विचार करील आणि निर्णय देईल... त्याआधी कुणाला काही बोलायचंय् का ?'

...सगळे लोक खाली माना घालून डोळ्याच्या कोपऱ्यातून एकमेकाकडं पाहू लागले. खाकरू–खोकू लागले; पण कुणी बोलेना. अखेर एक मनुष्य उठला. ग्रेगरी झाम्ब्होस. तो स्पष्ट शब्दात ठाम आवाजात म्हणाला, 'एलेनीनं असल काही केलेल नाही. कुणाच्या नखालासुद्धा धक्का लावलेला नाही– ती सर्वांशी मिळून–मिसळून वागत होती. स्वतःजवळचं इतरांना देत होती !'

'बस् ! बस् झालं ! पुरे कर– बैस खाली! –'

ग्रेगरीच्या बोलण्यानं धीर येऊन आणखी चौघं गावकरी एलेनीच्या बचावासाठी उभे राहिले. त्यांपैकी एक जण तर कट्टर कम्युनिस्ट होता. ते चौघं फक्त एलेनीच्याच नव्हे तर इतर आरोपीच्या बाजून बोलायला लागले. गावकऱ्यांची साक्ष काढण्यात, त्यांचा कौल मागण्यात आपली चूक झाली हे कादिसच्या तेव्हाच लक्षात आलं. 'पुरे... कळलं काय ते ! आता कोर्टाचं काम संपलंय् कोर्ट आता विचार करील अन् निकाल देईल–'

तिघं न्यायाधीश उठले आणि एका मोठ्या झाडाच्या बुंध्यामागं जाऊन खलबत करू लागले. निर्णय घ्यायला त्यांनी फार वेळ लावला नाही. ते टेबलापाशी आले.

कैद्यांची अंग ताठरली. दोघा न्यायाधिशाच्यामध्ये उभं राहून निकाल वाचून दाखवला. एलेनीसह पाच जणांवरचे आरोप शाबीत झाले होते... 'त्यांना दोषी ठरवण्यात आलं आहे... आणि हे कोर्ट त्यांना देहांताची शिक्षा ठोठावत आहे! ...'

क्रांतिसेनेच्या श्रेष्ठींना लौकरच कळून चुकलं की या पाचजणांना मृत्युदंडाची शिक्षा फर्मावून आपण आपली लोकप्रियता गमावली आहे... आता या आरोपींची आणखी काही काळी कृत्यं उजेडात आणून त्यांना जनतेच्या मनातून उतरवलं पाहिजे विशेषत: एलेनी... तिच्याबद्दल जनमानसात आदर आहे तो नाहीसा व्हायलाच पाहिजे !

कादिसनं आपल्या अधिकाऱ्यांना बोलावलं. कैद्यांच्या छळाला पुनः सुरुवात झाली, त्यांना जास्ती करून 'फालंगा' पद्धतीचा खोडा द्यायला प्रारंभ झाला. विशेषत: एलेनीचा सर्वांत जास्त छळ झाला. हा खोडा द्यायला तिघा जणाची गरज असते. कैद्याचे बूट–मोजे काढायचे, त्याला जमिनीवर आडवं व्हायला लावायचं... बंदुकीच्या दस्त्याजवळच्या पट्ट्यात त्याचे पाय अडकवायचे . पट्टा असा पिरगळायचा की, घोटा पिळून निघतो. दोघंजण बंदूक घट्ट धरतात आणि तिसरा पायाच्या तळव्यावर धातूच्या किंवा लाकडाच्या दांडक्यानं प्रहार करतो...

या प्रकाराचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे कैद्याच्या अंगावर खाणाखुणा राहत नाहीत; पण एलेनीच्या बाबतीत काही तरी घोटाळा होऊन तिच्या पायांवर चांगल्याच खुणा राहिल्या. तिचे पाय सुजून दुप्पट झाले. शिवाय पायावर काळेनिळे वळ उठले. तिला चालता येईना आणि तोंडून शब्दही फुटेना.. हा खोडा आणखी किती वेळा दिला गेला कुणास ठाऊक !

अखेर एलेनी मोडून पडली. तिनं आपल्यावरच्या प्रत्यक आरोपाची कबुली दिली.

¤

२८ ऑगस्ट' रोजी तेरा कैद्यांना त्या तुरुंगातून बाहेर काढण्यात आलं... त्या तेरा जणात लिया गावातले पाचजण... त्या पाचात एलेनी...

त्यांना सांगण्यात आलं की, तुम्हाला तुरुंगात नेताहेत... इथून पायी ३ तासांचा रस्ता आहे ... तो रस्ता अवघड चढाचा होता. ते सारेजण अनवाणी होते. शिवाय मारामुळं पाय सुजलेले... काळेनिळे पडलेले. त्यांची तशीच वरात निघाली. त्यांच्याबरोबर सशस्त्र क्रांतिसैनिक...

सावकाश एकेक पाऊल ओढीत ती वरात वाटचाल करीत होती. सिओलीच्या झऱ्याजवळ येऊन ते ठेपले... एलेनी रोज इथंच पाणी भरायला यायची. आता सुद्धा अकरा वर्षांचा बोलिस झऱ्यावर पाणी भरत होता. बंदुका घेतलेल्या क्रांतिसैनिकांना पाहून त्याची घाबरगुंडी उडाली... तो वाटेतून दूर झाला... हा बोलिस आपल्या फोटिनीचा मित्र... एलेनीनं त्याला तात्काळ ओळखलं, 'बोलिस, थोडं पाणी दे रे– ' तिनं विनवलं. त्यांच्याबरोबरच्या एका सैनिकानं नकारार्थी ... हलवली .

ती वरात थोडा वेळ तिथं थांबली.

नंतरच्या काळात बोलिसला हा प्रसंग लख्ख आठवला मी अनेकांच्या मुलाखती घेतल्या. त्यात बोलिसचीही घेतली... त्यानं सांगितलं, 'मी एलेनी–मावशीशी एक अक्षरही बोलू शकलो नाही. पाण्याच्या घागरीसाठी तिनं हात पुढं केला... तिचे हात काळेनिळे झाले होते. ती अतिशय रोड दिसली. चेहरा पांढराफटक... अस वाटल– स्मशानातलं भूतच बाहेर आलंय... तिनं माझ्याकडं विलक्षण आर्त नजरेनं पाहिलं... फोटनी– माझी लाडकी फोटनी... कुठं असेल ती... एवढं म्हणून मावशी रडायला लागली होती. तिचं रडणं ऐकून एका क्रांतिसैनिकानं तिच्या हातातली घागर हिसकावली आणि माझ्या हातात आपटली. जरबेनं म्हणाला, 'हूं चला पुढं ! –'

बंदीजन कष्टाने वाट चालू लागले. लिया गावातल्या काही बायका क्रांतिसैनिकांनी पाठवलेल्या कामावरूनच परत येत होत्या. त्यांनीही या मंडळींना पाहिलं. त्यात जॉजिना व्हेनेटिस ही जहांबाज बाई होती. कैद्यांची वरात एका टेकडीआड गेलेली पाहताच तीही त्यांच्यामागून गेली. त्या टेकडीपलीकडे एक मोकळं पठार होतं. तिथं खड्डे खणून अनेक प्रेताची विल्हेवाट लावल्याचे स्पष्ट पुरावे दिसत होते. या बंदीजनांना क्षणार्धात आपलं भवितव्य कळून चुकलं. टेकडीच्या दुसऱ्या बाजूकडून आणखी पंचवीस–तीस क्रांतिसैनिक आले आणि त्यांनी या कैद्यांभोवती कडं घातलं.

जॉजिना आडून आडून पाहत होती. आणखी नीट दिसावं म्हणून ती चढण चढून पलीकडे जाणार तोच एका आर्त किंकाळीनं ती जागच्या जागी पाषाणासारखी उभी राहिली. त्या विलक्षण किंकाळीचा आवाज ती पुढं आयुष्यभर विसरू शकली नाही.

त्या किंकाळीत ब्रह्मांडाची वेदना, पराकोटीच्या यातना होत्या. त्या भयंकर विलक्षण आवाजातून दोनच शब्द बाहेर पडले.

'माझ्या बाळांनो... !'

पाठोपाठ बंदुकीच्या सणासण गोळ्या! ...

¤

१२ सप्टेंबर रोजी लिया गावातल्या रहिवाश्यांना दुसरीकडं जायला सांगण्यात

आलं. ते अश्राप लोक हाताला येईल ते सामान घेऊन, डोंगर चढून अल्बानियाच्या दिशेनं निघाले. क्रांतिसैनिकांना आशा वाटत होती की, मुरगाना पहाडात आपली सरशी होईल आणि तिथं आपण ग्रीक स्टॅलिनग्राड उभारू शकू; पण सहाच दिवसांनी सरकारी फौजा लिया गावात शिरल्या. त्यांच्यापाठोपाठ वर्षभरापूर्वी पळून गेलेले काही गावकरीही आले. त्यात होते एलेनीचे वडील किस्तो हैदौस– त्या सामुदायिक स्मशानभूमीकडे त्यांना नेण्यात आलं. पोटातली वेदनेची कळ दावत त्यांनी एलेनीचा निष्प्राण देह ओळखला... ओळख पटली ती तिच्या तपकिरी भुऱ्या केसांवरून...



दोन दिवसांनी ते आयगोमेनित्सा या गावी गेले. समुद्रकिनाऱ्यावरच्या या गावात निर्वासितांच्या छावणीत एलेनीची मुलं दिवस कंठीत होती. ओल्गा आणि कांता त्या इमारतीच्या गच्चीत उभ्या होत्या. दूरवरून त्यांनी आपल्या आजोबांना येताना पाहिलं. खांदे ओघळलेले... एकेक पाऊल कष्टाने ओढत ते चालत होते.

एक गोष्ट दोघींच्याही ताबडतोब लक्षात आली ती म्हणजे आजोबांची वाढलेली दाढी ! अशी दाढी म्हणजे सुतक !

दोघींनीही अजाणताच एकमेकींचे हात हातात घेतले. घशातला आवंढा गिळत ओल्गा म्हणाली, 'आजोबांना कदाचित वस्तरा मिळाला नसेल–' ते दारात येऊन पोहोचताच दोघी झपाट्यानं पुढं आल्या– 'ममा–ममा कुठंय ? काय झालं तिचं ?–'

किस्तोनं नातींकडे थकलेल्या दुःखित नजरेनं पाहिलं–

'–त्यांनी ग्लायकेरियाला अल्बानियात नेलंय–ती ठीक आहे.–'

'पण ममा ? ममा कुठंय ?'

वृद्ध किस्तोच्या तोंडून शब्द फुटेना– '–ग्लायकेरिया जिवंत आहे. तिला त्यांनी काही केलं नाही.–'

एलेनीच्या मुली काय समजायचं ते समजल्या !!

¤

ख्रिस्तोसला आपल्या बायकोच्या हत्येची बातमी कळली तेव्हा तो अमेरिकेत मॅसेच्युसेट्स शहरात एका खोलीत एकटाच राहत होता. नंतर त्यानं मुलांना सांगितलं, '–मला ती बातमी कळली तेव्हा मी क्रोधानं वेडापिसा झालो.–काय ? माझ्या एलेनीला – प्राणप्रिय एलेनीला गोळ्या घातल्या – ठार मारलं ? का ? कशासाठी ?–'

त्यानं मुलांना पत्र लिहायला घेतलं. त्याला कळेना, कोणत्या शब्दात मुलांची समजूत घालावी ? कसं सांत्वन करायचं त्यांचं ? आणि मी ? माझं सांत्वन कुणी करायचं ? ख्रिस्तोसनं पत्रातून मुलांना विचारलं, 'तुम्हाला आजोबापाशी अथेन्समध्ये राह्यचं का इकडे माझ्याकडे यायचंय.–'

सर्व मुलांनी एकमुखानं आपली इच्छा कळवली. आम्हाला तिकडे यायचंय– '–ममीची इच्छा हीच होती ना ?–'

१९४९ साली २१ मार्च रोजी एलेनीची मुलं अमेरिकेत वडिलांकडे पोहोचली !

¤

२५ वर्षांनंतर या प्रसंगाचं वर्णन करताना ख्रिस्तोसनं सांगितलं, '–मी धक्क्यावर उभा होतो–जहाजाची वाट पाहत–मी ओल्गाला ताबडतोब ओळखलं. तिच्याकडे पाहून मी हात हलवला. कुणी तरी निकोलाला उंच उचललं. माझ्याकडे बोट दाखवून काही तरी सांगितलं. मी माझ्या मुलाला प्रथमच पाहत होतो. माझे डोळे अश्रूंनी तुडुंब भरले. मुलगा भेटतोय; पण त्याची आई–? तिचा चिरविरह मी कसा सहन करू ? हृदयात दुःखाचे कढावर कढ येऊ लागले.'

त्याच वर्षी ऑगस्ट महिन्यात तार आली की, ग्लायकेरिया आता सरकारी सैन्याच्या ताब्यात आहे. महिला क्रांतिसेनेची आणि सरकारी सैन्याची चकमक झाल्यावर ती सरकारी सैन्याला शरण गेली. त्यांनी तिची सर्व विचारपूस केली आणि तिला वडिलांकडे अमेरिकेत पाठवलं.

१९५० च्या फेब्रुवारी महिन्यात पाचही भावंडं एकत्र आली. रात्रभर ती बोलत बसली. आईच्या मृत्यूचं भळभळतं दुःख आणि इतरांच्या पुनर्भेटीचा आनंद– ताटातूट झाल्यापासूनच्या पावणेदोन वर्षांतल्या कितीक आठवणी निघाल्या–कित्येक प्रसंगांची उजळणी – या सर्वांत एलेनी नव्हती; पण ज्या ध्येयासाठी तिनं बलिदान केलं ते ध्येय साध्य झालं होतं. लढाई आणि क्रांतीच्या दहा वर्षांच्या काळात तिनं जी धडपड केली, जे कष्ट काढले आणि अखेर प्राणांचं मोल दिलं त्या सगळ्याचं अखेर चीज झालं !–

तिची मुलं सुखरूप राहिली. सुरक्षितपणे अमेरिकेत पोहोचली. जो देश पाहण्यासाठी ती आसुसली होती तो न पाहताच तिला हे जग सोडून जावं लागलं; पण तिची मुलं तिथं पोहोचली !

¤

१९६३ साली पदवी घेतल्यानंतर मी प्रथम लिया गावी गेलो. मग मेगाली आजो वारली तेव्हा गेलो. नंतर न्यूयॉर्क टाइम्सचा वार्ताहर म्हणून अथेन्समध्ये राह्यला लागलो.

ग्रीसमध्ये पत्रकार म्हणून काम करीत असता वारंवार माझे पाय लिया गावाकडे वळत. ते गाव आता जवळजवळ बसलंच होतं. तिथं आता मूठभर म्हातारी माणसं

उरली. तरुणपिढी कामधंद्याच्या शोधात महानगराकडे गेली होती.—

मी या गावाचं पुनरुज्जीवन करण्याचा चंग बांधला. कशासाठी करत होतो मी हे? थोडं अंतर्मुख होऊन आत्मपरीक्षण केल्यावर मला जाणवलं की माझ्या आईचं स्मारक करावसं मला वाटत होतं...असं स्मारक की जे बळानं, शस्त्रानं उध्वस्त करता येणार नाही...अग्नीनं जाळता येणार नाही. तिथ मी असे प्रकल्प उभारणार होतो की, ज्यामुळं तिची स्मृती चिरंतन राहिली असती आणि ज्यांनी तिला मृत्यूच्या जबड्यात ढकललं त्यांच्या पापाचं कायमचं प्रतीकही राहिलं असतं. ज्यांनी तिचा आणि तिच्या मुलाचा नाश करण्याचा घाट घातला होता, त्यांच्या अपयशाची निशाणीही राहिली असती...

ग्रीस देशाबद्दल मला जो जिव्हाळा वाटत होता त्यात माझ्या बहिणी मात्र मुळीच सहभागी होत नव्हत्या. ज्या देशात आपल्या परमप्रिय मातेची हत्या झाली त्या देशाचं नावसुद्धा त्यांना ऐकायचं नव्हतं. जिथं इतक दुःख सोसलं, यातना सोसल्या त्या देशाचा वारासुद्धा त्यांना नको होता...

मात्र मामीच्या हत्येचा सूड घेण्याबाबत माझं आणि माझ्या बहिणींचं एकमत व्हायचं. त्या म्हणायच्या, 'आज ना उद्या परमेश्वर त्या राक्षसांना शिक्षा करील—'

...परमेश्वर केव्हा शिक्षा करील तो करू दे...मला मात्र थांबायला वेळ नव्हता. देवाघरच्या न्यायावर माझा विश्वास नव्हता. माझ्या बहिणींप्रमाणं सर्व भार देवावर टाकून स्वस्थ बसणं मला जमत नव्हतं.

आम्ही अमेरिकेत पोचलो तेव्हा मी फक्त नऊ वर्षांचा होतो; पण तेव्हासुद्धा अतर्यामी मला कुठं तरी वाटत होतं...एक दिवस मी ममीच्या खुनाचा बदला घेईन!—]

१९७७ साली वार्ताहर म्हणून मी ग्रीसमध्ये आलो तो ममीच्या मारेकऱ्यांचा शोध घ्यायचा निश्चय करूनच! पण त्या वेळच्या पश्चिम आशियातील उलथापालथीच्या वातावरणामुळं मला बराच काळ ग्रीसबाहेर काढावा लागला. ममीच्या मारेकऱ्यांपैकी एकजण नैसर्गिक मरणानं संपला हे कळल्यावर मला चुटपुट लागली. आता सूड घेण्याची मनोकामना पूर्ण करायची असेल तर घाई केली पाहिजे याबद्दल माझ्या मनात संदेह राहिला नाही. मी आणखी चालढकल केली तर सगळेजण आपापल्या नियतीनुसार काळाच्या पडद्याआड जातील. मग माझ्या ध्येयसिद्धीचं काय? आता या कामासाठी स्वतःला वाहून घेतल पाहिजे. त्यासाठी नोकरी सोडायचीच!

माझ्या आईच्या आयुष्याच्या नाट्यमय अंताचा एक प्रमुख सूत्रधार कगर्टस अद्यापी हयात आहे हे आढळून आल्यावर माझा विचार पक्का झाला. नोकरी सोडण्याचा निर्णय मी चुटकीसरशी घेऊ शकलो.

ग्रीसमध्ये येताना स्वतःचं सामान म्हणून मी पुष्कळ वस्तू आणल्या. एका व्हॅक्यूम क्लीनरमध्ये दडवून मी एक हॅंडगनही आणली. या हॅंडगनचा मी नेमका कसा उपयोग करणार याची मला स्वत.लाही कल्पना नव्हती; पण कगर्टसच्या पुढं समोरासमोर उभं ठाकताना बंदूक, पिस्तूल काही तरी जवळ असावं असं मला वाटलं.

१९७७ साली मला ग्रीसमध्ये पुष्कळ फरक पडलेला आढळून आला. १९७४ मध्ये ग्रीसमधल्या कम्युनिस्ट पक्षाला कायदेशीर मान्यता मिळाली होतीच. यादवी युद्धाच्या काळात केलेल्या गुन्ह्यांना माफी देण्यात आली होती. त्यामुळे अज्ञातवासातले कम्युनिस्ट उजळ माथ्यानं वावरायला लागले होते. युद्धाच्या हकिकती स्वतःच्या दृष्टिकोनातून सांगत होते. क्रांतिकारक म्हणजे लोकमान्य नेते असा प्रचार त्यांनी आरंभला. त्याची प्रतिमा उंचावण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालू होता.

१९८२ साली मी टाइम्स वृत्तपत्राचं काम सोडून दिलं आणि माझा सर्व वेळ मी माझ्या आईच्या मृत्यूच्या हकिकतीचे दुवे गोळा करण्यात घालवू लागलो. तिच्या जीवनाच्या दुःखद उत्तरार्धाचा इतिहास केवळ स्वतःसाठी आणि माझ्या बहिणींसाठी लिहायचा असं जरी प्रथम मी ठरवलं होतं तरी आता हा इतिहास ग्रीसमधल्या युद्धोत्तर पिढीलाही कळणं आवश्यक आहे असं मला प्रकर्षानं वाटलं. यातून नवी पिढी काही तरी शिकेल अशा आशेनं मी हे सारं लिहायचं ठरवलं.


मी या प्रयत्नात चारशेहून अधिक व्यक्तींच्या गाठीभेटी घेतल्या. त्यांना बोलतं केलं. त्यांच्या लक्षात येणार नाही अशा तऱ्हेनं त्यांच्या मुलाखती घेतल्या. मुंगी आणि मधमाशी यांचा आदर्श डोळ्यांपुढं ठेवून कणाकणानं, थेंबाथेंबानं माहिती गोळा केली. लिया गावातले जुन्या पिढीतले लोक, यादवी युद्धात परस्परविरुद्ध लोक, त्या वेळी लहान मुलं असलेले, आता प्रौढ झालेले लोक... सर्वांना भेटलो. माहिती गोळा करण्याच्या वेडानं पछाडला जाऊन मी ग्रीसभर प्रवास केला. एवढंच नव्हे तर थोडीशी माहिती कळण्याचा संभव आहे असं कळताच इंग्लंड, कॅनडा, पोलंड, हंगेरी, चेकोस्लोव्हाकिया या देशांनाही भेटी दिल्या. तुटलेले दुवे, ओघळलेले मणी एकत्र केले. एक एकसंध आकृती मला तयार करायची होती. निर्धार, परिश्रम, चिकाटी...सर्व शक्ती मी पणाला लावल्या!

माझ्या प्रिय आईच्या जीवनाच्या अखेरच्या चित्तरकथेच शेवटचं प्रकरण लिहिताना, मी स्वतःला हरवून गेलो. माझं ईप्सित मला गवसलं असं मला वाटलं. आता केवळ स्मृतिरूप झालेली माझी आई वास्तवात कशी होती हे मला पूर्णार्थानं कळलं. केवळ बालपणींच्या आठवणीवरून चितारलेलं चित्र असं त्याचं स्वरूप राहिलं नाही. आईच्या व्यक्तिचित्राला आता एक वेगळंच परिमाण लाभलं होतं.

लढाईमुळं तिच्या प्राणप्रिय मुलांना धोका होईपर्यंत माझी आई म्हणजे एक साधीसुधी खेडवळ बाई होती. ती ज्या वातावरणात वाढली, जे संस्कार तिला लाभले, त्याचा अटळ परिणाम म्हणून तीही सामान्य माणसाप्रमाणं भाबडी बनली. पूर्वग्रह, भीती, संशय, तर्ककुतर्क, शकुनापशकुन, लोकभ्रम या सर्वांचा तिच्यावर इतरांप्रमाणेच परिणाम होई.

पण जेव्हा तिला दिसून आलं की, आपलं कुटुंब संकटात आहे, तेव्हा तिला एक वेगळाच द्रष्टेपणा प्राप्त झाला आणि एक वेगळीच शक्ती लाभली. तिच्या आयुष्यातला तो निर्णायक क्षण होता ... या टप्प्याशी आल्यावर माझ्याही आयुष्यातला निर्णायक क्षण येऊन ठेपला.

तिच्या मृत्यूचं कोडं मला उलगडत गेलं. मला सापडलेला एकेक तुकडा आपापल्या जागी फिट्ट बसला...असं वाटलं की, निय-




तीनं कार्टिसला मुद्दामच दीर्घायुष्य दिलं. माझी सत्त्वपरीक्षा घेण्यासाठीच जणू त्याला जिवंत ठेवलं. माझ्या आईच्या मृत्यूला जबाबदार असणारे बाकीचे सगळे निजधामी गेले होते. त्यापैकी जे काही हयात होते, त्यांची या प्रकरणातली भूमिका केवळ आज्ञा–पालनाची होती याची मला गावकऱ्यांच्या बोलण्यावरून खात्री पटली होती. ते लोक क्रांतिसैनिकांच्या हातातली बाहुली होती. अशा मेणचट माणसांना शिक्षा ती काय करायची? त्यांच्याबद्दल तिरस्कारापेक्षा दुसरी काही भावना माझ्या मनात उत्पन्न होईना.

पण कार्टिस! सबंध चित्रात तो एकटाच ठळक उठून दिसत होता आणि मी त्याच्याकडे खेचला जात होतो.

त्याचं खरं नाव अचिलियास ल्याकास असं होतं. आता तो कॉनिस्टा गावी राहात होता. मी विमानानं यानिनाला गेलो आणि तिथून एक मोटार भाड्यानं घेऊन त्याच्या घरी जायला निघालो.

ल्याकासचं घर म्हणजे एक नवी दुमजली इमारत होती. मी घरापाशी गाडी उभी केली. मोटारीतून उतरून दाराजवळची घंटा वाजवली.

पन्नाशीतल्या एका स्थूलकाय स्त्रीनं दार उघडलं. ही नक्कीच त्याची बायको असणार! तिनं मला दिवाणखान्यात बसवलं. रंगमंचावरच्या एखाद्या नटाप्रमाणं ल्याकास दिवाणखान्यात आला माझ्या कल्पनेपेक्षा तो जास्त उंच होता. इतकं उकडत होतं तरी त्यानं राखी रंगाचा लोकरीचा सूट घातला होता. या वेळी तो ७८ वर्षांचा असावा. तरी त्याचे बाहू पीळदार दिसले आणि दृष्टीही तीक्ष्ण वाटली. माथ्यावरचे पांढरे केस, लष्करी सैनिकांप्रमाणं बारीक कापलेले होते.

'काय काम आहे आपलं माझ्याकडे?' त्याच्या बोलण्यातली अदब मला खोटी–खोटी वाटली.

'...मी एक पुस्तक लिहितोय...'डाग' या भूतपूर्व लष्करी संघटनेविषयी मला माहिती हवीय आपल्याकडून...'

'हे पाहा, आम्ही त्या वेळी जे कार्य केलं, त्याची माहिती हेडक्वार्टरकडे पाठवली...'

'काही खटले...'

'हो! हो! त्या खटल्यांचो प्रकर सुद्धा हेडक्वार्टरकडे पाठवली... बस् एवढंच. तेवढीच जबाबदारी होती आमची.'

मी एकेका शब्दावर जोर देत सावकाश बोलू लागलो. 'असं नाहीय ते! लिया गावात मुलकी नागरिकांवर एक खटला भरण्यात आला होता. त्याची सुनावणी तुमच्यापुढं झाली असं मला विश्वसनीयरीत्या कळलंय– त्याची माहिती हवीय मला...!

'छे! छे! मुळीच नाही. मी कुठलाही खटला चालवला नाही. उगीच काय काही तरी...'

'नाही कसं? त्या सुनावणीच्या वेळी तीनशे ग्रामस्थ हजर होते. त्या सर्वांना तुमची आठवण आहे...'

आता तो अस्वस्थ झालेला दिसला.

'त्यांची काही तरी चूक होत असेल...'

'मी अनेक क्रांतिसैनिकांना भेटलोय... ठरवून गाठीभेटी घेतल्या. त्यांनी मला सांगितले की, तुम्ही कार्टिस या टोपणनावानं ओळखले जात...'

'छे– मुळीच नाही. कार्टिस-बिटिस काही माहिती नाही मला... आणि महत्त्वाची एक गोष्ट म्हणजे गुन्हे शाबीत होणं न होणं, नंतर शिक्षा फर्माविणं हे सगळं हेडक्वार्टरमध्ये ठरायचं– मघापासून तुम्हाला मी हेच सांगतोय–'

तो ताडकन् उठला. एकदम माझ्या अंगावर खेकसला, 'मी काय खोटं सांगतोय का?'

या माणसाबद्दलच्या घृणेनं माझी विचारशक्ती लोपली. तरीही स्वतःवर ताबा ठेवून मी शांतपणे म्हणालो, 'ल्याकास, माझं ऐका जरा. लिया गावातल्या पाच जणांवरच खटला चालवला गेला होता हे मला निश्चितपणे कळलं आहे. तीन पुरुष आणि दोन बायका... या खटल्याची सुनावणी गावाच्या वरच्या बाजूच्या घळीत केली गेली. माझी माहिती बिनचूक आहे...!'

'मला नाही माहीत कुठलाही खटला बिटला– अन् कसली घळबिळ...'

'मी तेव्हा आठ वर्षांचा होतो. क्रांतिसैनिकांनी माझ्या आईला पकडून नेलं... डोंगराच्या एका बाजूला नेलं आणि तिच्यावर गोळ्या झाडून तिला ठार मारलं हे त्रिवार सत्य आहे! अन् तुम्ही बहाणा करता तुम्हाला माहीत नाही असा?' मी ओरडलो. माझा आवाज नकळत चढला. तीव्र संतापानं माझ्या तोंडून शब्द धडपणे बाहेर पडेनात. तोतऱ्यासारखं बोलत मी म्हटलं, 'माझ्या आईचं नाव होतं एलेनी गात्झोयानिस...'

'मी ऐकलं सुद्धा नव्हतं हे नाव कधी.

तुम्ही म्हणता तसला खटला झालाच असला तर तो दुसऱ्या कुणी चालवला असेल— मला नाही माहीत !'

'नाही कसं ? तुम्ही तर तेव्हा न्यायाधीश होता !—'

'ए आगंतुक माणसा; कुणा बाईच्या मरणाबद्दल मला नको जबाबदार धरूस... माझ्या घरी येऊन माझा अपमान करतोस ?

'तुमचा अपमान होतोय ? मी नुसता अपमानच करतोय; पण तुम्ही— तुम्ही माझ्या आईला निष्कारण यमसदनाला पाठवून अपमानाच्या पलीकडचं काही तरी केलंत... पराकोटीचं पाप केलंत आणि आमचं बहुमोल काही तरी हिरावलंत.'

कार्टिसचा नरडीचा घोट घेण्याची प्रबळ इच्छा मला झाली; पण माझी तर्कबुद्धी जागृत होती. त्याला मारून पळून जायला एकच रस्ता होता. पळायला दुसरी वाट नव्हती. कार्टिसची बायको तिथंच बसून आमचं सारं बोलणं ऐकत होती. त्याचा खून केला तर याची एकमेव साक्षीदार म्हणून तिलाही मारून टाकावं लागलं असतं. आत कुठं तरी त्याची मुलगी आणि छोटी नातही होती. त्यांची खुडबुड मला ऐकू येत होती.

... त्या तिघींचे प्राण घेण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती...

...मग काय करायचं ? एकट्या कार्टिसचाच जीव घ्यावा; पण मग त्याची बायको आणि मुलगी पोलिसांना बोलावतील आणि मी कोनित्सातून बाहेर पडण्यापूर्वीच पोलीस मला पकडतील कार्टिसची आणि माझी बाचाबाची चालू असताना एकीकडे मी माझ्या मुलांचा विचार करीत होतो. मी याचा खून केला तर मला नक्कीच देहांतवासाची शिक्षा होईल— मग माझ्या मुलांचं काय ?

...क्षणार्धात दुसरं दृश्य माझ्या डोळ्यांपुढं आलं. माझे आजोबा एका प्रेतावरचं कापड बाजूला करून माझ्या आईची ओळख पटवून घेताहेत... त्वेषानं आणि सूडानं माझं रक्त उफाळायला लागलं. कृतीनं शब्दाची जागा घेतली...

मी कार्टिसच्या तोंडावर थुंकलो ! माझ्या थुंकीचे ओघळ त्याच्या चेहऱ्यावरून खाली त्याच्या ऐटबाज शर्टावर आले.

कुणाच्या तोंडावर थुंकणं हा ग्रीसमध्ये कमालीचा अपमान समजला जातो. कार्टिस रागानं काळानिळा पडला.

'तू थुंकतोस माझ्यावर ? तुला माहीत आहे का मी कोण आहे ते ?

तो आता मला मारणार असं वाटून मीही माझ्या पिस्तुलाला हात घातला.

— पण त्याची बायको पटदिशी उठली. तिनं बहुधा माझा हात खिशाकडे जाताना पाहिला असेल. माझ्या खिशात पिस्तुल असेल अशी अटकळ तिला आली असेल ती किंचाळली, 'आचिलिआस ! काय करतोस तू ! बैस तिथंच.—मुळीच हलू नकोस !'

त्याच्या हाताची मूठ सैल पडली. दोन्ही हात छातीवर घेऊन तो खुर्चीत कोसळला. माझी थुंकी त्याच्या तोंडावरून ओघळत होती.

मी उठलो आणि बाहेर पडलो. सूड घेण्याचा क्षण माझ्या हातात येऊन निसटला.

कार्टिसला गोळ्या घालूनच ठार करायला पाहिजे असं माझं ठाम मत होत. त्याच्या नजरेतली बेपर्वाई आणि उमटपणा यामुळं माझ्या अंगाची लाहीलाही झाली.

मी नव्यानं निर्धार केला. आजची वेळ टळली ती टळलीच; पण आता पुन: मोका मिळाला की मी मुळीच भावनेच्या आहारी जाणार नाही, भिणार नाही. त्याच्या कुटुंबाचा मुळीच विचार करणार नाही !

— पुन: चार महिन्यांनी संधी आली. उन्हाळ्यात कार्टिसनं आयगोमेनित्सा गावी समुद्रकिनारी राहायला जागा घेतली होती. तिथं तो काही दिवस राहणार होता. मी तिकडे गेलो आणि रोज त्याच्या घराभोवती घिरट्या घालत बसलो. एक दिवस संधी आली. त्याची बायको, मुलगी, जावई आणि दोन नातवडं बीचवर जाताना मी पाहिलं. मी माझी दाढी काढून टाकली होती. त्याची बायको माझ्या जवळून गेली तरी तिनं मला ओळखलं नाही.

त्याच्या दाराला आतून कुलूप होतं. मी स्वत:जवळ काही हत्यारं ठेवली होती. अलगद कुलूप उघडून मी आत गेलो. तो व्हरांड्यात एका खुर्चीत डोळे मिटून पडला होता. बहुतेक त्याला डुलकी लागली असावी.

त्याच्या असहायतेची मला मुळीच दया आली नाही. त्याच्या म्हातारपणाचा विचार करावासा वाटला नाही, काही नाही. फक्त तिरस्कार आणि घृणा या दोनच भावना माझ्या मनात थैमान घालत होत्या. माझ्या हातात पिस्तूल होतं खरं; पण त्या क्षणी तो इतका असहाय होता की, त्याच्या तोंडावर उशी दाबून त्याचा श्वास घुसमटून मी त्याची प्राणज्योत विझवू शकलो असतो. त्याच्या खुनाचा कोणताही पुरावा मागे न ठेवता मी निसटू शकलो असतो. त्याच्या घरची माणसं समुद्रावरून परतल्यावर त्यांना त्याचा निष्प्राण देह दिसला असता ! तो झोपेतच गेला अशी त्यांची समजूत झाली असती. कुणालाच माझा संशय आला नसता....

थोडा वेळ मी कार्टिसकडं टक लावून बघत बसलो. राक्षस, हैवान, नरपशु, यमदूत हाच तो !... यानंच माझ्या आईचा बळी घेतला. निष्पाप, निरागस लोकांचे प्राण हिरावून घेतले.

याचा गळा घोटलाच पाहिजे !

— हा विचार आला आणि गेला...

— त्याला तिथं तसाच सोडून मी मागं वळलो. दार लावून घेतलं आणि त्याच्या घराच्या पायऱ्या उतरलो:...

संपलं...सारं संपलं ! ! ही सूडकथा इथंच संपली. मला जाणवलं की या कथेचा इच्छित असा शेवट मी करू शकलो नाही !

कार्टिसला मारण्याची आदर्श संधी मला मिळाली आणि तरीही मी त्याला मारलं नाही. एवढा मोठा प्रवास मी केला, एवढे थोरले कष्टाचे डोंगर उपसले. ममीचे मारेकरी शोधायचे आणि त्यांना मारायचं या एकाच विचारानं तहानभूक विसरलो आणि तरीही वेळ येताच मला जाणवलं की मला आता तशी इच्छाच उरलेली नाही. दुष्कृत्याचा बदला दुष्कृत्यानं घेऊन मनाला समाधान वाटेल असं मला वाटेना.

आमच्या आईच्या निर्घृण खुनाची जखम अद्यापीही भळभळ वाहतेय— आणि तिच्या मारेकऱ्याबद्दलचा क्रोध दिसामाशी वाढतोय.

— तरीही मी कार्टिसला का मारलं नाही ? आयगोमेनित्साहून परतल्यापासून मी स्वत:लाच हा प्रश्न विचारतोय.

— माझ्या मुलांची आणि माझी कायमची ताटातूट होईल या विचारानं मला काही

अशी परावृत्त केलं. शिवाय माझ्या करणीनं सूडाचं एक चक्र सतत फिरत राहिलं असतं. मी कार्टिसची हत्या केली असती तर त्याच्या वंशजांनी माझ्या मुलांवर दात ठेवला असता. मग माझ्या कुटुंबियांनी त्याच्या कुटुंबाचा घात करायची प्रतिज्ञा केली असती. तऱ्हे-तऱ्हेचे व्यूह रचले गेले असते. सूडाचं हे दुष्ट-चक्र अनंत कालपर्यंत गिरगिरत राहिलं असतं. एकामागून एक भावी पिढ्या या चक्रात अडकून रक्तबंबाळ झाल्या असत्या !

या विचारानं मी मागं सरलो होतो.... याहीपेक्षा दुसऱ्याच एका विचारानं माझ्या अंतर्मनावर पगडा बसवला असेल...

...ममीच्या आयुष्याचा इतिहास जमवताना मला जे काय उमगलं, उमजलं त्यावरून मी तिच्या व्यक्तिमत्त्वाचं एक चित्र उभं केलं होतं. जीवनातल्या त्या अखेरच्या वर्षात तिच्या मनाची काय होरपळ झाली असेल ते मी समजू शकत होतो. तिचे शेवटचे शब्द माझ्या कानात घुमत होते. उद्या आपली हत्या होणार याचा अंदाज येऊनही ती, अँजेलिकी वोस्टारिसशी बोलली ते फक्त स्वतःच्या मुलांबद्दल. आपला कसा छळ होतोय् याबद्दल तिनं एक अक्षरही काढलं नव्हतं. तिला काळजी होती फक्त आम्हा मुलांची...आम्ही कुठं असू ? कसे असू ? पोचू का नाही अमेरिकेला ? या चिंतेनं ती हैराण झाली होती.

मारेकऱ्यांच्या गोळ्या छातीवर झेलताना सुद्धा तिनं त्यांना शिव्याशाप दिले नाहीत तर फक्त आठवण काढली आपल्या पाडसांची.. तोंडून बाहेर पडले फक्त प्रेममय शब्द...माझ्या बाळांनो !


तिनं शेवटच्या क्षणी आपली प्राणशक्ती कुणाचं तळपट इच्छिण्यात घालवली नाही. ती मरणाला धैर्यानं सामोरी गेली. आपलं कर्तव्य तिनं केलं. आपल्या प्रियजनांसाठी तिनं आपल्या प्राणांचं मोल दिलं.

कार्टिसला मारून मला सूड घेतल्याचं समाधान लाभलं असतं. अनेक वर्षं मनात बाळगलेली सूडाची धगधगती ज्वाला शमल्याचं समाधान मला हवं होतं, नाही असं नाही. तरीही मी माझे हात कार्टिसच्या रक्तानं रंगवू शकलो नाही ...

...याचं कारण ममीचं प्रेममय जीवन-प्रेम हा तिच्या जीवनाचा मूलस्रोत होता. तिनं तिच्या जीवनाद्वारे आम्हाला संदेश दिला प्रेमाचा. तिचं ते सर्वव्यापी प्रेम चराचर व्यापून राहिलंय असं मला अनेकदा वाटतं, अनेक वेळा अणुरेणूतून मला तिचं अस्तित्व जाणवतं. तिच्यापर्यंत पोचायचा मी प्रयत्न करतोय्... अतींद्रिय अवस्थेतल्या आईपर्यंत पोचण्यासाठी मला एक पूल बांधायचाय्... कार्टिसची हत्या करून मी पुलाचा पायाच उखडून टाकला असता आणि माझ्यातला तिचा अंशही नष्ट झाला असता !

तसं होणं मला नकोय्...माझ्यातला एलेनीचा अंश मला आमरण जपायचाय्! ...

## समाप्त

# आपली मुलं

मुलं व्हायची आणि ती आपोआप वाढायचीच अशा समजुतीचा काळ आता मागे गेला.

पालकांचे काम दिवसेंदिवस अधिकाधिक कौशल्याची मागणी करणार असं दिसतं आहे.

माझं मूल म्हणजे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. ते सगळं मी सांगेन तसं कसं वागेल ?

मुलांना चांगल्या–वाइटाचा विवेक शिकवणं, आत्मविश्वास देणं, निर्णयक्षमता देणं हे आपलं काम आहे. आणि 'देणं' असं तरी कसं म्हणावं ? ते त्यांना घेता यावं असं वातावरण निर्माण करणं हे आपलं खरं काम आहे.

मुलांचं निरीक्षण करणं, त्यांच्याशी संवाद साधणं, आपल्या मनातलं मोकळेपणानं सांगणं, त्यांच्या मनातलं समजून घेणं, काही विसरणं, काही आठवणीनं उल्लेख करणं, वरंचसं देणं आणि ग्रेसफुली घेणं अशी किती तरी कौशल्यं आपल्याला यायला हवीत.

मुलं वाढवण्याच्या निमित्तानं आपल्याला ही जाग यायला हवी. हे पुस्तक हसत–खेळत वाचताना सहजपणे अशी जाग यावी.

**राजहंसचे नवे प्रकाशन**

# आपली मुलं

**शोभा भागवत । किंमत २० रुपये**

## पुस्तके

# दत्ता भटांची स्मृतिचित्रे

'झाले मृगजळ आता जलमय' हे श्री. दत्ता भट यांचे आत्मचरित्र वाचले आणि एक चांगले पुस्तक वाचल्याचे समाधान मिळाले. वस्तुनिष्ठ सत्यनिवेदन आणि प्रांजळ आत्मकथन हे आत्मचरित्राचा दर्जा ठरविण्याचे निकष आहेत; परंतु हे लेखकाच्या समकालिनांचे आणि निकटवर्तीयांचे काम. येथे या पुस्तकाचा केवळ एक ललित-लेखनाकृती म्हणून विचार केला आहे.

या पुस्तकात श्री. दत्ता भट या व्यक्तीचा बेदरकार; परंतु भावनोत्कट, खरचटत परंतु हसत, यशापयशाच्या चढउतारावरून केलेला जीवनप्रवास आहे. या जीवनप्रवासात अनेक लहान–मोठ्या घटना आहेत, व्यक्ती आहेत, किती तरी छोटी–मोठी गावे आहेत, घरे आहेत. यामुळे पुस्तक वाचताना एका वेगळ्याच अनुभवविश्वात आपण फेरफटका मारून येतो. श्री. दत्ता भट यांच्या अनुभवविश्वाचे स्थूलमानाने दोन भाग पडतात. यातला एक भाग त्यांच्या कौटुंबिक जीवनाचा आहे तर दुसरा भाग कलेच्या असीम ओढीचा आहे. कौटुंबिक जीवनात वडिलांच्या छायेखाली घालविलेले हूड बालपण आहे. वडिलांचा वेदनामय मृत्यू आहे. अनाथ पोरकेपणाची तीव्र जाणीव आहे. लहान वयात आई, भावंडांची जबाबदारी पेलताना झालेली मनाची तडफड आहे. शरीराची धडपड आहे. विश्वासू माणसांनी केलेली फसवणूक आहे. मित्रांनी दिलेले प्रेम आहे. विवाहाचे सुख आहे. अपत्यजन्माचा आनंद आहे. आजारपणाच्या व्यथा आहेत. कोणत्याही मध्यमवर्गीय माणसाला परिचित असे हे अनुभवविश्व आहे म्हणून याबद्दल एक जिव्हाळा वाटतो. जवळीक वाटते, तर दुसरे कलाजीवनाचे अनुभवविश्व त्याच्या वेगळेपणामुळे वाचकाला आकर्षून घेते. या अनुभवविश्वात कित्येक सुप्रसिद्ध व्यक्तींची चित्रे आहेत. जबरदस्त योगायोग आहेत. उपाशीपोटी केलेली वणवण आहे. अलिशान हॉटेलमधील न्याहारी आहे. चित्रपटांचे स्टुडिओ आहेत. छायाचित्रीकरणातील गंमतीजंमती आहेत. नाट्यमंदिरे आहेत. नाटकांच्या प्रयोगांच्या तारखा सांभाळताना झालेली गडबड, गोंधळ आहे. कौटुंबिक जीवनातील होरपळ आणि कलेची विलक्षण ओढ यांच्या रसायनातून श्री. दत्ता भट यांचे जीवन घडले आहे असे या आत्मकथांवरून वाटते.

श्री. दत्ता भट यांच्या चित्रमयशैलीमुळे एखाद्या चित्रपटासारखे हे पुस्तक डोळ्यांसमोरून सहज सरकत जाते. किती व्यक्ती-प्रसंग दिसतात. रात्रीच्या दाट अंधारातले स्कूलग्राउंड, तेथे काडेपेटीच्या उजेडात दिसलेला मिशाळ चेहरा. सगळा भयाण प्रसंग साक्षात दिसतो आहे असा भास होतो. 'चलो भागो यहाँसे' हे शब्द, चक्क ऐकू आल्यासारखे वाटतात. या चित्तथरारक प्रसंगासारखे इतर साधे साधे प्रसंग, साधी साधी माणसे श्री. भटांनी आपल्या शब्दांतून सहज दृग्गोचर केली आहेत. त्यात नाशिक आणि आसपासचा भाग जिवंत झाला आहे. ऑर्डिनान्स डेपो, त्या डेपोतले कँटिन, दुधाचे कॅन्स, रेल्वेकँटिन या सगळ्यांतून वावरणारा, धडपडणारा एक तरुण मुलगा आपल्याला दिसतो. गांजेकस मामा, अडाणी मामा, रगल आणि व्यवहारी लेबरऑफिसर साळी अशी किती तरी माणसे त्यांच्या सर्व व्यक्तिवैशिष्ट्यांसह अगदी थोडक्या शब्दांतून साकार झाली आहेत. ही गोष्ट अतिशय कठीण आहे; पण श्री. भटांना ती साध्य झाली आहे. दागिन्यांनी सजलेली अडाणी प्रेमळ भाभी मामाच्या घरात वावरताना आपल्याला सहज दिसते. वाड्यातली उसाट बाई, तिच्यावर नजर ठेवून असलेले साळीसाहेब, त्या बाईला न सोडणारा तरुण, त्या बाईच्या खोलीची खिडकी, तो सगळा वाडाच छायाचित्रासारखा स्पष्टपणे डोळ्यांसमोर येतो. या व्यक्तीच केवळ नाहीत तर श्री. भटांच्या शैलीतून घोडासुद्धा जिवंत होतो. आपल्या मालकावर प्रेम करणारा मोती घोडा दिसतो. त्या घोड्यावर हट्टाने स्वार झालेला उर्मट इंग्रज माणूस दिसतो. केवळ एकदोन प्रसंगात आलेल्या या इंग्रज माणसावरून तत्कालिन ब्रिटिश राजवट, सर्वसामान्य ब्रिटिश माणसाची जेतेपणाची मगरूरी सहज जाणवते. छायाचित्रीकरणाच्या वेळी शॉट संपल्यावर आपल्या प्रिय व्यक्तीबरोबर गप्पा मारत जिलबी खाणाऱ्या शांताबाई हुबळीकर दिसतात. रुग्णालयात पेशंट म्हणून दाखल झालेले दत्ता भट दिसतात. त्यांच्याभोवती वावरणारे तरुण हृदयविकारतज्ज्ञ डॉक्टर दिसतात. पेसमेकर लावण्याच्या प्रक्रियेचा अनुभव जाणवतो. नाशिकस्टेशनवरच्या भोजनाच्या एका लहानशा भेटीत राजेंद्रप्रसादांचे व्यक्तिमत्त्व साकार होते. शिर्के सरकार आणि कंत्राटदार अगदी ठसठशीत दिसतात.

इतक्या प्रत्ययकारी शैलीतून श्री. विश्राम बेडेकरांचे व्यक्तिमत्त्व मात्र स्पष्ट दिसत नाहीत. स्वतःला गुरुस्थानी असलेल्या श्री. बेडेकरांच्या सहवासातले अनेक प्रसंग श्री. भट सांगतात; पण ते केवळ प्रसंग-निवेदनच वाटते. त्यातून व्यक्तिमत्त्व साकार होत नाही. अनेक प्रसंगी श्री. भट आपल्या अडचणी, हलाखीची परिस्थिती, दिवस दिवस भाग पडलेला उपास आपल्या गुरूला का सांगत नाहीत असा प्रश्न पडतो.

### जबरदस्त इच्छाशक्ती

आपल्या जीवनप्रवासात श्री. भट वेळोवेळी त्रस्त झालेले, रक्तबंबाळ झालेले दिसतात; पण कोणाबद्दल कटु उद्गार, द्वेषमूलक संताप या आत्मचरित्रात आढळत नाही. याचे कारण काय असावे? दोन तत्त्वे. स्वतःच्या भोळसटपणाने दागिने गमावल्यावर आईने जे त्रिकालाबाधित सत्य सांगितले त्याच प्रकाशात त्यांनी वाटचाल केलेली दिसते. 'जगात मरेपर्यंत शेवटचं असं काहीच नसतं. एक संधी गेली, एकदा हरलो, तरी डगमगायचं नाही. प्रयत्न करीत राह्यचं– एक ना एक दिवस आपलं साध्य आपल्या हाती येतंच. पुढं आयुष्यभर अनेकदा पराभूत व्हावं लागलं, माघार घ्यावी लागली; पण आईचा हा मोलाचा संदेश दीपस्तंभासारखा पुढं चलण्याचंच आवाहन करीत राहिला–' श्री. भट या तत्त्वाप्रमाणे जिद्दीने पुढे पुढे चालत राहिले असे दिसते. त्यांनी

अनेक नोकऱ्या धरल्या आणि सोडल्या. वेळोवेळी ते शंकित झाले. स्वतःचा मार्ग शोधताना गोंधळले वेळोवेळी चित्रपटसृष्टीत शिरून पुन्हा बाहेर आले. धंदा सुरू केला. नोकरी धरली; पण आतरिक ओढीने पुन्हा चित्रपटाकडे धावत गेले. पैसा, नावलौकिक म्हणण्यासारखे सुरुवातीला कित्येक वर्षं काहीच मिळालं नाही तरी या सृष्टीची ओढ सुटली नाही. मित्राशी बरीच चर्चा झाल्यावर एका रात्री त्यानी निर्णय घेतला—'रानडुकरासारखं या एकाच दिशेनं मरेपर्यंत धावलं पाहिजे' आणि त्याप्रमाणे नतर ते जिद्दीने धावत राहिले. आईचा उपदेश आणि हा निर्णय ही दोन सूत्रे हातात धरूनच त्यानी जन्मभर वाटचाल केली. यामुळंच त्याच्या कष्टमय प्रवासाला एक धुंदी आहे. एक गोडवा आहे. जीवनावर प्रेम करायला लावणारा आशावाद आहे. किंबहुना असे दिसते की, जोपर्यंत हा प्रवास कष्टमय होता, एक मृगजळ त्यांना दिसत होते त्यापाठीमागे ते धावत होते तोपर्यंतचे सर्व चित्र ते फार रंगून जाऊन लिहितात. इंडोनेशियाला चित्रपट काढण्याचे स्वप्न पहाणारे बोरिवलीचे काळे, त्याचे घर, भटांचे त्या ठिकाणी जाणे किती प्रत्ययकारी झाले आहे! परंतु एकदा नट म्हणून प्रस्थापित झाल्यानंतर, मृगजळ जलमय झाल्यानतर श्री. भटांनी अनेक नाटके, दौरे याबद्दल जे लिहिले आहे ते बरेचसे तपशिलात्मक वाटते. 'यशाहुनीही प्रयत्न सुदर' या माधव ज्युलियनाच्या काव्यपंक्तीचीच त्यामुळे आठवण होते.

श्री. दत्ता भट याच्या आजाराची पार्श्वभूमी लक्षात घेता चारशेचौतीस पृष्ठाचे हे आत्मचरित्रलेखन म्हणजे एक चमत्कार वाटतो. हृदयविकाराचे झटके येऊन प्रकृती खालावलेली. सुमारे एक वर्ष स्मृती गेली. नेहमीचे जवळचे सहकारी, नात्यातली माणसेसुद्धा या काळात ओळखू येत नव्हती इतकी स्मृती गेलेली. एक हात काम देत नव्हता. (फ्रोजन शोल्डर) नॉर्डिलच्या गोळ्या आणि इन्फारेज शेक यांच्या सहाय्याने आणि देवाच्या कृपेने या आजारातून ते सहीसलामत सुटले; परंतु नाटक—चित्रपटाची कामे मिळतात. त्या निराश मनःस्थितीत विलेपार्ल्यातल्या भोवताच्या मित्रमंडळीनी मोठाच धीर दिला. साठीच्या वाढदिवसाला घरी येऊन अभीष्ट चिंतन केले. त्या रात्री श्री. भटाचे मनाचे मन आजवर केलेल्या वाटचालीचा मागोवा घेऊ लागले. त्यातून पुढे या आत्मचरित्राचा जन्म झाला.

इतक्या दीर्घ विस्मृतिकालानतर श्री. भटांनी चितारलेली ही स्मृतिचित्रे पाहिली की वाटते या माणसाची इच्छाशक्ती जबरदस्त आहे. वृत्ती कमालीची जीवनोत्सुक आहे. मन तरुण आहे. या आत्मचरित्रात वैफल्यग्रस्त पराभूत जीवनाला संजीवनी देण्याचे सामर्थ्य आहे!

— विनया खडपेकर

झाले मृगजळ आता जलमय
लेखक : श्री. दत्ता भट
आरती प्रकाशन
पृष्ठसख्या : ४३४
मूल्य : रु. ७५

---

# समर्पिता

---

सामान्य वाचकाला प्रसिद्धीच्या झोतात असणाऱ्या—विशेषतः नाटक—सिनेमाच्या क्षेत्रातील व्यक्तीच्या खाजगी जीवनाविषयी नेहमीच उत्सुकता असते. रगभूमीवर आणि पडद्यावर आपण पाहिलेली माणसे पडद्याच्या मागे कशी असतात, त्याच सांसारिक जीवन कस असतं याविषयी प्रवादही असू शकतात. म्हणूनच अलीकडे प्रसिद्ध झालेली 'चदेरी दुनियेत' हे लीला चिटणीस याचे किंवा 'मी दुर्गा खोटे' हे दुर्गा खोटे याचे आत्मचरित्र ही पुस्तके खूप चर्चिली गेली. मराठीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री श्रीमती इंदिरा चिटणीस याच्या मृत्यूनतर त्याचे पती प्रा. अधटराव यानी इदिराबाईंच्या आठवणीचे सकलन करून 'समर्पिता' हे पुस्तक निर्मिले आहे.

लीला चिटणीस किंवा दुर्गा खोटे यांच्याप्रमाणे इंदिराबाईंना हिंदी सिनेमाचे माध्यम मिळाले नसले तरीही मराठी चित्रसृष्टीत मात्र त्यांनी नाव कमावले आहे. अनेक चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका गाजल्या आहेत. आपल्या चित्रसृष्टीचे एक वैशिष्ट्य म्हणजे एखाद्या कलाकारावर विशिष्ट प्रकारच्या भूमिकाचा शिक्का पडणं! इंदिरा चिटणीस या अशाच खाष्ट सासू होत्या—अगदी 'स्टम्पड्'! अनेक मराठी चित्रपटांमधून सुनेला छळणारी, उपाशी ठेवणारी, सशय घेऊन मारहाण करणारी आणि जिवंत अभिनयानं प्रेक्षकांना खवळवणारी टिपिकल सासू इंदिराबाईंनी रंगवली आहे!

ठोकाचं चित्र रगविण, त्यात भडक रग भरणं हे पुन्हा आपल्या चित्रसृष्टीचं आणखी एक वैशिष्ट्यच. त्यामुळ इंदिराबाईंचं विशिष्ट रंगातलं व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर आहे; पण खाजगी जीवनातही त्या तशाच खाष्ट, कडक होत्या का की वेगळ्या होत्या? 'समर्पिता' या त्यांच्या आठवणीच्या संग्रहातून इदिराबाईंचं पडद्याआडचं व्यक्तिमत्त्व चित्रित झालंय.

'समर्पिता' हे इंदिराबाईंचे सलग चरित्र नाही. त्या निरनिराळ्या व्यक्तीनी लिहिलेल्या स्फुट आठवणी आहेत. त्यांचे संपादन श्री. बापू वाटवे यांनी केले आहे. आलेल्या सर्व आठवणी घेण्याच्या आग्रहामुळे संपादनाचे काम अवघड तर झाले आहेच; पण पुनरावृत्ती, परस्परविरोधी वर्णने आणि विधाने यांचा दोषही राहून गेला आहे.

इंदिरा चिटणीस यांचा पूर्वी प्रसिद्ध झालेला एक लेख, त्यांच्या पतीचा आणि कन्येचा (डॉ. वैजयंती वापट) लेख खूपच बोलके आहेत. गृहिणी, पत्नी, माता आणि कलाकार म्हणून इदिराबाईंची विविध रूपे त्यातून चित्रित झाली आहेत.

इदिराबाईंनी सहज जाता—जाता जुनी रंगभूमी आणि आताची रगभूमी, जुनी चित्रसृष्टी आणि आताची चित्रसृष्टी याची तुलना करून आज या दोन्ही गोष्टी कशा बिघडत चालल्यात ते सांगितलंय. लहान—मोठ्या कलाकाराची त्यानी रेखाटलेली शब्दचित्रेही बोलकी आहेत. कलाकार केवळ गुणी असूनच भागत नाही तर त्याला नशिबाची साथ मिळावी लागते, मनाचा कणखरपणाही असावा लागतो; नाही तर शांता आपटे, हंसा वाडकर याच्यासारखी गत होते असं त्या सांगतात. इंदिराबाईंनी डोळ्यांनी पाहिलेल्या त्या घटना आहेत, म्हणूनच अर्थपूर्ण आहेत.

इंदिराबाईंची कन्या डॉ. मीना ही एक हुषार, यशस्वी डॉक्टर, आईवडलांची एकुलती एक मुलगी. तशी घरात लाडकी असणारच; पण इंदिराबाईंनी तिचे वेडे लाड केले नाहीत. तिचं कल्याण पाहूनच डोळसपणाने तिच्याशी वर्तन केले. तिच्या अभ्यासासाठी स्वत: कष्ट घेतले. तिच्या आजारपणात मवाळ होणारी आई तिनं परधर्मीयाशी मैत्री केलेली पाहून कठोर झाली आहे. मुलीच्या अश्रूंनी ती विरघळलेली नाही. मायलेकीत दुरावा निर्माण झाला. लेकीचं लग्नही अपेशी ठरलं, पण या साऱ्या प्रवासात आयुष्याच्या अखेरीला इंदिराबाईंशी लेकीचं सूत जुळलंय. आयुष्यभर संसारासाठी, लेकीसाठी झगडलेल्या इंदिराबाईंना शेवटी आर्थिक स्थैर्य लाभलं असलं तरी सांसारिक यशाचं समाधान मात्र लाभलेलं नाही, याची विलक्षण खंत डॉ. मीना यांच्या लेखातून व्यक्त होते.

प्रा. अधटराव यांच्या लेखात नाटक–सिनेमासाठी दौरे करत असतानाही संसाराची, मुलीची ओढ असणाऱ्या संसारदक्ष इंदिराबाईंचे चित्र रेखाटले आहे. त्यांचा प्रेमविवाह आहे. माहेरून पळून आलेल्या या मुलीला पतीमुळेच कलाकार म्हणून यशस्वी होता आले याची जाण इंदिराबाईंनाही होती. अधटरावांना पत्नीचा रास्त अभिमान आहे.

पडद्यावर खाष्ट सासू रंगविणारी ही अभिनेत्री पडद्यामागे कशी होती हे शरद तळवलकर, चित्तरंजन कोल्हटकर, उषाकिरण, बापू वाटवे, चंद्रकांत, सूर्यकांत, वसंत शिंदे, जयश्री गडकर यांच्या लेखातून समजते. आपल्याबरोबर काम करणाऱ्या प्रत्येक कलाकाराशी त्या मोकळेपणाने वागत. त्यांच्या जेवणाची, प्रकृतीची नुसती चौकशी करूनच न थांबता त्यांना स्वतः जेवायला घालत म्हणूनच त्यांचं कुणाशी आईचं, कुणाशी बहिणीचं तर कुणाशी वहिनीचं नातं जुळलं.

अपुरं शिक्षण, नाट्य–चित्रसृष्टीत जायला घरच्या लोकांचा विरोध बरोबर घेऊन ऐन विशीत घर सोडलेल्या या अभिनेत्रीला सुशिक्षित विचारी पतीची मिळालेली साथ फार महत्त्वाची आहे.

चंदेरी दुनियेत राहूनही इंदिराबाई व्यसनांपासून, गैरवर्तणुकीपासून दूर राहिल्या त्या स्वत:च्या परखड स्वभावामुळेच. म्हणूनच भालजींनी त्यांना 'वाघीण' म्हटलय! स्वसंरक्षणासाठी वाघीण असणारी ही स्त्री इतरांसाठी मात्र प्रेमळ आहे, चेष्टेखोर आहे, हसणारी आणि हसविणारी आहे. वरवर रागावणारी, मनापासून हृदयधारी ही स्त्री अंतर्यामी मात्र दुःखी होती. सांसारिक अपयशाचं, मुलीच्या दुःखाचं ओझं सतत वागवत होती हे जाणवल्याखेरीज राहात नाही.

संपादनातील त्रुटी मान्य करूनही इंदिराबाईंचे व्यक्तिचित्र उभे करण्यात पुस्तक यशस्वी झाले आहे असंच म्हणावं लागेल.

—सौ. शशिकला उपाध्ये

समर्पिता
संपादन – बापू वाटवे
प्रकाशक– दा. तु. अधटराव.
पृष्ठे : १७६, किं. : २० रु.

## मुलांची जडणघडण करणारी पुस्तिकावजा दैनंदिनी

आजकाल बाजारात कृषि-दैनंदिनीपासून ते गृहिणी-दैनंदिनीपर्यंतच्या समाजातील विविध नागरिकांना आपल्या व्यवसायाच्या जीवनाच्या क्षेत्रात मार्गदर्शन करणाऱ्या अनेक प्रकारच्या दैनंदिन्या उपलब्ध आहेत. या दैनंदिन्यांमध्ये नित्याच्या व्यवहारात त्या त्या क्षेत्रात आवश्यक असणारी माहिती ग्रथित करण्याचा प्रयत्न केलेला असतो. शिक्षणक्षेत्रातील मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी यांना उपयुक्त ठरणाऱ्या दैनंदिनीचा अभाव मात्र जाणवत होता. विशेषत शालेय वर्ष हे जूनमध्ये सुरू होत असल्यामुळे अनेकदा या क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांना अडचण जाणवत होती. पुण्याच्या 'राजहंस प्रकाशना'ने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष ८४–८५ ची दैनंदिनी प्रकाशित करून विद्यार्थ्यांपुरती ही अडचण दूर केली आहे, याबद्दल प्रकाशकाचे प्रथमत: आभार मानणे आवश्यक आहे.

शिक्षणक्षेत्रातील नामवंत व्यक्तींनी, बालसाहित्य–लेखकांनी शैक्षणिकदृष्ट्या काळजीपूर्वक रचना करून ही दैनंदिनी समृद्ध केली आहे. त्यात डॉ. प्र. ल. गावडे यांच्यासारख्या अनेक मुख्याध्यापकांनी व कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्यासारख्या प्रथितयश लेखकांनी विद्यार्थ्यांना निवडक साहित्य व मार्गदर्शन उपलब्ध करून दिले आहे. डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांच्यासारख्या तज्ज्ञांनी सौ शलाका मोमण यांच्या साहाय्याने या दैनंदिनीची रचना केली आहे. मानसशास्त्र लक्षात घेऊन अटार्क्टिकावरील भारतीय वैज्ञानिकांच्या कार्याचा स्वत: डॉ. दाभोळकर यांनी रेखाटलेला गौरवपूर्ण आलेख वैज्ञानिक विषयावरील मुलांसाठी लिहावयाच्या लेखाचा वस्तुपाठच आहे. पाडगावकरांनी निवडलेल्या कविता काव्याच्या दृष्टीने उत्कृष्ट असल्या तरी त्यात बालगीतांचा वयोमानाप्रमाणे समावेश करता आला असता. शाळांतून म्हटल्या जाणाऱ्या तालबद्ध संस्कारक्षम बालगीतांचे मराठी साहित्यात आता आगळे स्थान आहे. ही दैनंदिनी तयार करताना इ. ५ वी ते १२ वीपर्यंतच वयोगट संपादकांनी नजरेसमोर ठेवलेला दिसतो, त्यामुळे यातील छोटे छोटे वैज्ञानिक प्रयोग, कोडी, सुविचार, विनोदही विद्यार्थ्यांना उपयुक्त व मनोरंजक ठरणारे आहेत. विशेषत: सुट्टीच्या कालावधीसाठी पुरविलेले प्रेरणात्मक कृतीचे साहित्य विद्यार्थ्यांना आनंद देऊन जाईल. अभ्यास कसा करावा, वाचनाची उद्दिष्टे सांगणारे लेखही विद्यार्थीमित्रांना सहज आपले अध्ययन आनंददायी व उपयुक्त करण्यास मदत करतील. हस्ताक्षरावरील लेख हा या दैनंदिनीतील सुखद धक्का!

राजहंस विद्यार्थी दैनंदिनी हा इतर दैनंदिन्यांप्रमाणे माहितीचा संग्रह नसून मुलांच्या चारित्र्याचो हसत–खेळत जडणघडण करणारी पुस्तिका आहे. त्यामुळे त्यात अनेक चित्रे, आकृत्या यांची रेलचेल आहे. कदाचित त्यामुळेच तिची किंमत स्वस्तात देऊनही गरीब, मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांसाठी थोडी जास्त वाटते. विशेषत: खेड्यातल्या, झोपडपट्टीतल्या पालकांना आपल्या पाल्याला ही दैनंदिनी, तिचे मोल आणि मूल्य मोठे असूनही हाती देणे थोडे अवघड ठरू शकेल; परंतु किमान प्रत्येक शाळेने आपल्या विद्या-

लयात या दैनंदिनीच्या काही प्रती उपलब्ध केल्यास शिक्षक व विद्यार्थ्यांना ती व्यक्तिगत व सामुदायिक उपयोगासाठी मार्गदर्शक ठरेल.

या दैनंदिनीत सुट्टीच्या दिवसांची दिलेली माहिती उपयुक्त आहे ; परंतु त्यात सर्व शासकीय सुट्ट्यांचे एखादे जंत्रीवजा पृष्ठ समाविष्ट करणे प्रकाशकांना पुढल्या वर्षी सहज शक्य व्हावे. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने ते आवश्यक वाटते. उपयुक्ततेच्या दृष्टीने या दैनंदिनीत घटक चाचण्यांना, परीक्षांना, विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या गुणांची नोंद करणारे एक पृष्ठ नोंदीसाठी ठेवता आले असते तर उपयुक्त झाले असते. आत्मपरीक्षणाच्या नोंदीसाठीही विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणारा एखादा तक्ता दैनंदिनीत समाविष्ट करता येईल. वर्षात लिहिलेले गृहपाठ, निबंध, प्रयोग यांचा महिनेवार तक्ताही विद्यार्थ्यांना उपयोगी ठरेल. अर्थात या त्रुटी सहज भरून काढता येतील.

या दैनंदिनीचे उत्कृष्ट मुद्रण ही एक अत्यंत महत्त्वाची देखणी बाब आहे. दैनंदिनीसाठी वापरलेला कागदही चांगल्या प्रतीचा आहे. त्यामुळे स्पर्शानंदही मुलांना मिळेल. नाही तर अनेक माहितीवजा दैनंदिन्यांचा कागद हा इतका 'सुंदर' असतो की, त्यावर फक्त बॉलपेनच्याच नोंदी करता येतात. या दैनंदिनीच्या निमित्ताने प्रकाशकांना, शिक्षणतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांसाठी दैनंदिनी प्रकाशित करण्याची प्रेरणा मिळाली तर उपयुक्त ठरेल. अशा तऱ्हेच्या दैनंदिनीच्या प्रकाशनास शासनाने अनुदान दिले तर दैनंदिनीची किंमतही कमी होऊन विद्यार्थ्यांना ती खरेदी करणे सुलभ होईल. ( जाहिराती मिळवून ती कमी करता येईल; पण दैनंदिनी अवजड होईल. ) प्रासंगिक उपयुक्ततेच्या दृष्टीने काही पृष्ठे वाढविण्यात आली तर दुधात साखर !

—रतनलाल भंडारी

मुख्याध्यापक

लोकमान्य टिळक विद्यालय, दाभोळ

# गारांचा पाऊस

शोभा भागवत

## प्रेम होतं म्हणूनच

ही कुणाची कविता आहे माहीत नाही. मला आवडली म्हणून लिहून ठेवली. पुन्हा पुन्हा वाचून आवडली म्हणून ती मराठी केली. मूळ इंग्लिशमध्ये आहे.

कधी तरी माझी मुलं मोठी होतील.

आई अशी का वागते हे त्यांना समजू शकेल, तेव्हा मी त्यांना सांगीन—

तू कुठे जातोस, कुणाबरोबर जातोस, केव्हा घरी येणार असे प्रश्न विचारून मी तुला जो त्रास दिला तो माझं तुझ्यावर प्रेम होतं म्हणूनच.

तुझ्या मित्राची योग्यता अनुभवातून तुलाच कळून यावी म्हणून मी गप्प बसले ती तुझ्यावर प्रेम होतं म्हणूनच.

तू तुझी खोली साफ करताना मी तुझ्याबरोबर दोन तास उभी होते. हे काम मी एकटी १५ मिनिटांत करू शकले असते; पण केलं नाही तुझ्यावर प्रेम होतं म्हणून. तू त्या चोरलेल्या चॉकलेटचा एक चावा घेतलेला असतानाही मी तुला दुकानात ते परत करायला पाठवलं ते तुझ्यावर प्रेम होतं म्हणूनच.

तुझ्या उद्धटपणाला आणि वाईट वागण्याला मी कधी क्षमा केली नाही ती तुझ्यावर प्रेम होतं म्हणूनच.

तुला चांगलं चालता यावं म्हणून धडपडलास, पडलास, अयशस्वी ठरलास तरी मी तुला सावरलं नाही ते तुझ्यावर प्रेम होतं म्हणूनच.

बाकीच्या आया त्यांच्या मुलांशी कशा वागतात ते मी कधी पहायला गेले नाही ते तुझ्यावर प्रेम होतं म्हणूनच.

तू तुझ्या गुण—दोषांसकट जसा आहेस तसाच मला आवडलास. मी तुला 'घडवलं' नाही ते तुझ्यावर प्रेम होतं म्हणूनच.

या सगळ्यात सत्त्वपरीक्षा केव्हा होती ? तू माझ्यावर रागावशील, माझा तिरस्कार करशील हे माहीत असूनही निग्रहानं काही गोष्टींना नाही म्हटलं— तेही तुझ्यावर प्रेम होतं म्हणूनच.

किती शहाणी आई आहे ही ! मुलं वाढत असताना काही गोष्टी करताना उगाचच ताण निर्माण होतात. मुलं रागावतात, रुसतात, कधी आपल्याही मनात शंका येतात, आपण हे करतो आहोत ते बरोबर आहे की नाही ? याचा मुलावर काही वाईट परिणाम तर होणार नाही ?

पण आपण जे करतो आहोत ते कशासाठी हे आपल्या मनात पक्कं असलं आणि समंजसपणे ते मुलांना समजावून देता आलं तर अशा शंका कमी निर्माण होतील.

ओढाताणीचे प्रसंग किती तरी असतात.

घरात काही तरी खास खाऊ आणलेला असतो आणि मूल तो फस्त करून टाकतं. ह्या प्रसंगात मुलानं सगळा खाऊ संपवला याचं मला दुःख नसतं. खाऊ काय परत आणता येतो पण खाऊ खाण्याच्या निमित्तानं घरातल्या इतरांना खाऊ मिळालाय् का हा विचार त्याच्या मनात यायला हवा. माझ्या वाटणीचा जेवढा खाऊ असेल तेवढाच मी खाईन इतरांचा बळकावणार नाही, हा न्याय त्याला समजायला हवा. इतर कुणी सगळा खाऊ खाऊन टाकला तर मला काय वाटेल हा विचार त्याला कळायला हवा आणि खाऊच्या पलीकडे जाऊन चार माणसांबरोबर आपण रहातो तेव्हा आपली कुठलीही कृती त्यांची पर्वा, विचार न करता होता कामा नये हे मूल्य त्याच्या मनात खोलवर जाऊन बसायला हवं असतं. नुसता खाऊ संपवला म्हणून रागानं मारलेला धपाटा हे सगळं करू शकत नाही. तसं पाहिलं तर लहानपणातला असा प्रत्येक प्रसंग हे शिकण्याचं निमित्तच असतं आणि मूल जेव्हा प्रत्यक्ष त्या प्रसंगातून जातं तेव्हा त्याची शिकण्याची अगदी योग्य वेळ तीच असते. अशा प्रत्येक प्रसंगाचा काही शिकण्यासाठी कसा उपयोग करून घ्यायचा ते पालकांनी

समजून घ्यायला हवं.

हे शिकणं शाळेत होतंच असं नाही. पाठ्यपुस्तकात अशा गुणांबद्दलच्या गोष्टी असतात त्यांचा थोडाफार परिणाम मुलांवर होत असतो; पण मुलाचं सगळं घडणं काही त्यावर विसंबून ठेवता येत नाही.

ह्या लहान लहान गोष्टी मुलांना रागावून, भाषणं देऊन, शिक्षा करून शिकवाव्या लागत नाहीत. आपला एखादा अभिप्राय, एखादा कटाक्षही हे सगळं शिकवून जाऊ शकतो. उलट चर्चा जेवढी जाहीर, जास्त तेवढा परिणाम कमी होतो.

मुलाच्या चुकीबद्दल चारचौघांदेखत त्या चारचौघांनी ऐकावं अशा आविर्भावात बोलणं खरं तर अगदी अभद्र आहे; पण आपण अनेकदा ते करतो.

तुमच्या मुलानं किंवा मुलीनं काही तरी चुकीचं केलंय. तुम्हाला राग आलाय. अशा वेळी त्याला किंवा तिला एकटधाला गाठून, मुद्दाम वेगळं बसून, घरात अशक्य असेल तर बाहेर जाऊन, बागेत बसून त्या चुकीबद्दल बोलून पहा. न रागावता शांतपणे तुम्ही जेव्हा असं मुलाशी बोलाल तेव्हा त्याच्या डोळ्यात तुमच्याविषयी आदर दिसेल, आश्चर्य दिसेल. विश्वास दिसेल. त्याला स्वतःवरच्या जबाबदारीची जाणीव होईल आणि तुम्ही त्याला दिलेल्या सन्मानाला त्याच्या मनात अनेक शाखा फुटतील. मुलाच्या चुकीबद्दल जाहीर पंचनामा न करता असं दोघांनीच बसून–बोलून जो परिणाम होतो तो व्यक्तीची प्रतिष्ठा वाढवणारा असतो. स्वाभिमान आणि आत्मविश्वास वाढवणारा असतो.

आमच्या शेजारी मुलांशी अगदी वाईट वागणारे एक गृहस्थ रहायचे पूर्वी. ते म्हणायचे, 'घरात फार माणसं आहेत. चल संज्या, तुला पर्वतीवर नेतो आणि सरळ करून आणतो !' ते मुलांचे गालगुच्चे घ्यायचे जोरात, चिमटे काढायचे आणि अगदी अपमानास्पद बोलायचे. त्या गृहस्थांची मुलं आज मोठी झाली आणि हे सगळं तसंच्या तसं नाही; पण अपमान करून, दुर्लक्ष करून, तिरस्कार करून परत करतायत.

म्हणूनच आपण जे वागतो आहोत ते तसं का वागतो आहोत, त्याचा परिणाम काय अपेक्षित आहे आणि काय होईल याचा विचार कायम मनात हवा.

पालकांच्या मनात आपल्याबद्दल अपार माया आहे, आपल्याबद्दल आदर आहे, आपलं भलं व्हावं असं आहे याची खात्री पटली की, केव्हा परत येशील विचारलं तरी मूल रागावणार नाही, चोरलेलं चॉकलेट परत करायला लावलं तरी रुसणार नाही आणि कदाचित तात्पुरतं रागावलं–रुसलं तरी लगेच विसरेलही.

पण असं सुयोग्य वागणं आपल्याला कसं जमेल ? आपण स्वतःशी त्या कवितेतल्या आईइतके प्रामाणिक आणि जागृत असू तेव्हाच ! ☐

# रंगभूमी

## अरुण सरनाईक–रंगमहिफिल अर्धीच राहिली !

वि. भा. देशपांडे

अरुण गेला ! फार वाईट पद्धतीने गेला ! एखाद्याच्या वैऱ्यावरही असा मृत्युप्रसंग येऊ नये इतक्या दुःखद रीतीने तो गेला ! नुसता एकटाच गेला नाही तर पत्नी अनिता आणि मुलगा संजय यांच्यासह गेला ! सारेच तर्कापलीकडचे घडले. माणूस ठरवतो एक आणि नियती ठरवते दुसरच. अरुण कोल्हापुराहून पुण्याला निघाला होता तो नव्या चित्रपटाचा आरंभ करण्यासाठी. 'पंढरीची वारी' हा चित्रपट रमाकांत कवठेकर दिग्दर्शित करणार आहेत. आळंदीची वारी निघण्याचा दिवस. चित्रीकरण अधिक जिवंत व्हावे म्हणून खरा खटाटोप; पण या वारीत जाण्याचा अरुणचा योग नव्हता. परमेश्वराकडे त्याचे जाणे झाले ते वेगळ्याच मार्गाने ! सारेच अघटित !


अरुणला आपण सर्वजण गेली वीस–पंचवीस वर्षे रंगमंच–चित्रपट या माध्यमातून पाहात आलो आहोत. त्याला छानपैकी उमदे व्यक्तिमत्त्व होते. प्रथमदर्शनी लक्ष वेधून घ्यावे असे व्यक्तिमत्त्व होते. या व्यक्तिमत्त्वाला साजेलसे कलागुणही भरपूर प्रमाणात त्याच्याकडे होते. अभिनय तर होताच; पण उत्तम गायक आणि तबला–ढोलकी–वादक म्हणूनही त्याचा लौकिक होता. गायक–अभिनयाचे गुण जन्मजात त्याच्याकडे वारसाहक्काने यावेत तसे आले. अरुण हा शंकरराव सरनाईक यांचा एकुलता एक चिरंजीव. शंकररावांना बालगंधर्वांचा, त्यांच्या गायकीचा मनसोक्त सुखद सहवास घडला. स्वतः शंकररावांची यशवंत संगीत नाटक मंडळी होतीच. त्यामुळे अरुणच्या घरात जन्माआधीपासून नाटक–गाणे सहजपणाने वावरत होते. तो कधीकधी म्हणायचाही की, नाटक–चित्रपटाच्या धावपळीत गाणे वाढवायचे राहून गेले. ते गाणे त्याच्या गळ्यात किती आणि कसे होते ते काही नाटक–चित्रपटांतून आपण अनुभवले आहे. प्रत्यक्षात गाण्याचे कार्यक्रम किंवा संगीत नाटकातल्या भूमिका करण्यात त्याचा लौकिक नसला तरी त्याच्या गळ्यात गाणे आहे हे सहजपणाने जाणवयाचे. त्याला गाण्याची समज उपजत आहे हेही ध्यानी यायचे. याचा आणखी एक अर्थ असा होता की, त्याला लय–तालाची समज पक्की होती. त्याचा उपयोग अभिनयाच्या संदर्भात सतत होत गेला.

अरुणने अनेक नाटकांतून भूमिका केल्या,

अर्थात ती सगळीच नाटके एका पद्धतीची किंवा दर्जाची नव्हती; पण अरुणची त्यातली भूमिका मात्र अनेक कारणांसाठी ध्यानात राहायची. उदाहरणार्थ 'भटाला दिली ओसरी', 'गुड बाय डॉक्टर', 'तरुण तुर्क म्हातारे अर्क', 'अपराध मीच केला', 'रखेली', 'गोष्ट जन्मांतरीची', 'सोळाव वरीस धोक्याचं', 'असुनी नाथ मी अनाथ', 'मी कुमार', 'भानगडीशिवाय घर नाही', 'हा खेळ सावल्यांचा' आणि 'तुघलक' इत्यादी अनेक. त्याची बहुतेक सगळी नाटके मी पाहिलेली आहेत. त्यामध्ये 'रखेली' नाटकातला साहेब, 'हा खेळ सावल्यांचा'-मधला एस. के. आणि 'तुघलक'मधील तुघलक ह्या भूमिका विशेष स्मरणात राहिल्या. अरुणला ज्यांनी तुघलकच्या भूमिकेत पाहिले असेल त्यांना आठवत असेल की, त्या वेळी त्याच्या निवडीबद्दल खूपच चर्चा झाली होती. कारण त्याचा बाज खास व्यावसायिक नाटकातला आणि चित्रीकरणातला! त्यातही काही वेळेला धंदेवाईक नाटकांच्या दिशेला जाणारा असा होता. अशा नटाला इतकी आव्हानात्मक, प्रयोगात्मक नाटकातील भूमिका कशाला देता असा प्रश्न अनेकदा विचारला गेला. अरुण तुघलक करणार म्हटल्यावर त्यासंबंधी तर्ककुतर्क सुरू झाले; पण त्या सान्यांना त्याने आपल्या चोख अभिनयाने उत्तर दिले. तपशिलात त्या भूमिकेबद्दल खूप बोलता येईल; पण आठवते असे की, अरुण सरनाईकचे एक वेगळे अभिनयदर्शन आपल्याला घडले. या नटाकडे एवढी अभिनय-ताकद आहे याचा प्रत्यय आला. खरे तर तो प्रत्यय त्याआधीच्या नाटकात म्हणजे 'हा खेळ सावल्यांचा' या नाटकातील 'एस. के.' या भूमिकेने आलेला होता. शिरीष पै यांचे हे नाटक म्हणजे व्यवसायातला प्रयोग होता. त्याचे प्रत्यक्ष प्रयोग जरी कमी झाले तरी ते नाटक दीर्घस्मरणी ठरले. तसेच तुघलकच्या संदर्भात घडले. गिरीश कर्नाडांचे मूळ नाटक विजय तेंडुलकरांनी मराठीत आणले. दिग्दर्शक होते अरविंद देशपांडे, नेपथ्य होते दामू केंकरे यांचे आणि प्रकाशयोजनेसाठी तापस सेन यांना खास पाचारण करण्यात आले होते. आम्हा नाटकवाल्यांच्या दृष्टीने तो अपूर्वाईचा योग होता. त्या प्रयोगाच्या यशापयशाची भरपूर चर्चा झाली. तरीही तुघलक म्हटल्यावर पहिले नाव तोंडावर येते ते अरुण सरनाईकचेच! अरुणने 'तुघलक' स्वीकारले तेव्हा त्याने त्या वेळी दोन-अडीच महिने इतर नाटके-चित्रपट यांना विराम दिला होता. सारा वेळ, सारे लक्ष त्याने तुघलकच्या भूमिकेत केन्द्रित केले. त्या श्रमाचे श्रेय त्याला जरूर मिळाले. अरुण हा जितका व्यावसायिक नाटक-चित्रपटांत मग्न होता तितकाच तो आतून नवीनतेचे, प्रयोगशीलतेचे कौतुक करणारा, तसे आपल्याला करायला काही मिळावे अशा वृत्तीचा होता. तुघलकप्रमाणेच प्रयोगशील असणारे काहीसे वेगळ्या बाजाचे चि. त्र्यं. खानोलकरांचे 'रखेली' नाटक अरुणने स्वीकारून त्याचे शेकडो प्रयोग केले. खानोलकरांनी अनेक नाटके लिहिली. अगदी व्यवसायासाठीही लिहिली; पण त्यात त्यांना व्यावसायिक यश मिळाले ते फक्त 'रखेली' नाटकाला आणि त्या यशात अरुणचा वाटा महत्त्वाचा होता!

नवीनतेचे, प्रयोगशीलतेचे आकर्षण अरुणला किती होते त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'अशी पाखरे येती' हे नाटक! अनेकांना माहिती असेल नसेल; पण हे

---



## हसरं, देखणं, व्यक्तिमत्त्व

गुरुवारचे, सायंकाळचे ५ वाजलेले. बालगंधर्वात आम्ही नाटक सुरू होण्याची वाट बघत. पडदा बाजूला झाला आणि सर्व अभिनेते सेटवर एका ओळीत खाली माना घालून उभे राहिलेले. नाटकाला सुरुवात करण्याचा हा कुठला प्रकार असे एक क्षणभर वाटले; पण तेवढ्यात रमेश देवांनी शांततेचा भंग केला.

'एक दुःखद बातमी आहे.'

प्रेक्षागृहात ताणलेली शांतता. रमेश देवला बोलवत नव्हते. दोन-तीन क्षण तसेच गेले.

'माझा मित्र अरुण सरनाईक...'

हर एक प्रेक्षक ही बातमी ऐकून हळहळला.

अपघाताचा तपशील ऐकून तर काय बोलावे हे कळेना.

अरुण सरनाईक- एक उमदं व्यक्तिमत्त्व. पडद्यावरूनच परिचित झालेलं. ही व्यक्ति 'माणूस' म्हणून कशी आहे माहीत नव्हतं, नाही; पण त्याच्यातल्या अभिनेत्याची ओळख पुरेशी आहे.

मराठीतला एक देखणा, हरहुन्नरी नायक, गळ्यात ढोलकी असो, स्टेथास्कोप असो, मुख्यमंत्र्याची खुर्ची असो हा तितक्याच सहजतेनं आणि हसतमुखानं वावरणार. त्याच सहजतेनं तो रंगभूमीवर वावरला; पण महाराष्ट्रात कानाकोपऱ्यापर्यंतही तो पोचलाय त्याच्या विविध रंगी-ढंगी असंख्य भूमिकांमुळे!

'पप्पा सांगा कुणाचे' 'एक लाजरा नि साजरा मुखडा' अशी गीतंही त्यानं अशाच दिलखुलासपणे गायली.

अशा या अभिनेत्याला ज्या पद्धतीनं मृत्यु आला ते खरंच अतर्क्य! असं कुणाच्या बाबतीत होऊ नये असं आपण म्हणतो; ते बरेचदा असंच होत राहतं.

असं काही झालं की, सगळं क्षणकाल थांबल्यासारखं वाटतं; पण 'द शो मस्ट गो ऑन' असे शो चालतातच, चालतीलही. मित्राच्या मृत्यूचं दुःख गिळून रमेश देव आणि त्यांच्या संचानं जसा नाटकाचा प्रयोग नेहमीसारखा केला तसंच!...

—उज्ज्वला

---

नाटक जणू काय अरुण सरनाईकसाठी लिहिले गेले, इतके ते त्याचे होते. त्या नाटकातल्या प्रमुख व्यक्तिरेखेला तेंडुलकरांनी अरुण सरनाईक असेच नाव दिले आहे काही कारणाने ते नाटक त्याच्याकडून झाले नाही. त्या नाटकाचे पुढे अमाप कौतुक झाले त्यात अरुणचे भागधेय नव्हते; पण एका अर्थाने 'अशी पाखरे'च्या निमित्ताने अरुण मराठी नाटकात चिरस्मरणीय ठरला. असे भाग्य विरळा. भूमिकेवरून नटाला लौकिक मिळणे किंवा त्या नावाने ओळखणे हे घडलेले आहे. ( उदा. दिनकर कामण्णा ) पण नटाचे नाव भूमिकेला देऊन ते नाटक लोकप्रिय होणे हा योग फारच दुर्मिळ ! गप्पांच्या ओघांत कधी 'अशी पाखरे'चा विषय निघाला तर अरुण फक्त हसायचा; पण त्या हसण्यातली खोलवरची वेदना सूक्ष्मपणे पाहणाराला सहजपणाने जाणवायची !

अरुणचे रंगमंचीय व्यक्तिमत्त्व, खालच्या पट्टीत बोलण्याची पद्धत आणि अभिनयातली सहजता आदि गोष्टींमुळे तो कलाकार म्हणून सर्वप्रिय होता. मधल्या काही काळात त्याच्या भूमिका पाहताना त्रास व्हायचा. कारण व्यसनाधीनतेने त्याच्या वाणीतील शुद्धता, स्वच्छता कमी होत गेली; पण गेल्या वर्ष–दीड वर्षांत तो पुन्हा योग्य मार्गावर येत होता. वाटले होते की, आता त्याला चांगल्या भूमिका पुन्हा मिळू लागतील; पण तसे घडायचें नव्हते ! नियती वेगळेच ठरवीत होती !

अलीकडच्या काही वर्षांत जयराम हर्डीकर गेला, सतीष दुभाषी गेला, बबन प्रभू गेला, शंकर घाणेकर, गणेश सोळकी, दत्ता भट गेले. गद्य नटांमध्ये या कलाकाराचे स्वत चे एक स्थान होते. यातली अनेक मडळी अर्धी महिफिल सोडूनच गेली. त्यातल्या काहींना स्वत:पुरते ते आवडले असेल; पण अशी अर्धी महिफिल सोडून जाणे रंगभूमीला परवडणारे नाही. त्यांची याद सतत येत राहणार. आता अरुणही आपली रंगमहिफिल अशीच अर्धवट सोडून गेला. गद्य नटामधला एक गुणी नट निखळला, फार फार वाईट घडले. असे व्हायला नको होते !

□

चित्रपट

## मसाला आहेच पण मजाही

# अब आएगा मजा!

हिंदी सिनेसृष्टीचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे इथ एखाद्याचा 'टाइप' बनायला वेळ लागत नाही. असा एक 'टाइप' म्हणजे फारुख शेख. याला श्रीमतीची, स्मार्टपणाची ॲलर्जी असल्यासारख्या भूमिका मिळतात. हा आपला बिचारा कायम नादुरुस्त स्कूटरला धक्का मारत प्रेम करणार, ( रंगीबेरंगी, चष्मेबद्दूर, अब आएगा मजा इ. ) गैरसमजाचा बळी होणार; पण शेवट मात्र गोड !

'अब आएगा मजा' तला विजयही असाच. शिवाय फारुख शेखला 'सच्चाई'चं समर्थन करण्याचही एक काम असत. हा विजय एका जाहिरातकंपनीत नोकरीला असतो. त्याचं काम नक्को कोणत्या स्वरूपाचं आहे, हे मला तरी कळल नाही; पण काम कुठलही केल, किंबहुना काम केलंच नाही तरी काय फरक पडतो ? तर या विजयला जाहिरातक्षेत्रातला खोटेपणा पसंत नसतो; पण काय करणार? तो मजबूर असतो. शिवाय उशिरा उठण, स्कूटर बिघडून ऑफिसला उशीर होणं, या अडचणी उपस्थित होत असतातच. जाहिरातीच्या स्वरूपावर डिस्को धर्तीच एक गाणं यात घातलं आहे. जाहिरातीत कशाकशाची विक्री – स्त्रीची, तिच्या सौंदर्याची, इमान–वतन या सर्वांची केली जाते त्यावर आधारित हे गाणं आहे.

या विजयला एकदा एका बसस्टॉपवर नुपूर ( अनिता राज ) भेटते ही श्रीमंत ओम् से. ची एकुलती एक मुलगी. हा प्रथम दर्शनीच हिच्या प्रेमात पडतो; पण यांच्या प्रेमात सायडी ( रवी वास्वानी ) काटा बनून येतो. सायडी हा विजयच्या बॉसचा मुलगा. हा बॉस एका स्वामीच्या नादाला लागून त्याच्या चरस असलेल्या उदबत्तीचीही जाहिरात करत असतो. नुपूरकडची एक वश परंपरेने चालत आलेली मूर्ती या स्वामीला हवी असते त्यासाठी तो बॉसवर दडपण आणून सायडीचं लग्न नुपूरशी करून दे, असं सांगत असतो. इथंच सगळा पेचप्रसंग उत्पन्न होतो. त्यात परत विजयच्या एका मित्रामुळं विजय सारखा मुलींच्या मागे लागतो, असा नुपूरचा गैरसमज होतो; पण मित्राच्याच मदतीनं तो गैरसमज दूरही होतो.


चित्रपटातले मुख्य परिचित चेहरे मोजकेच-फारुख शेख, अनिता राज आणि रवी वास्वानी. बाकीच्या भूमिकातून नेहमीची हुनगल, मदनपुरी अशी माणस न चमकता विशेष परिचित नसलेले चेहरे दिसतात. चित्रपटात २–३ च गाणी आहेत. त्यातलं 'सोला बरस की कमसीन उमरियाँ' हे गाणं ऐकायला बरं वाटत फारुख शेखचं काम चांगलं आहे आणि अशा भूमिका वठवायला त्याला आता विशेष त्रासही पडत नाही. नुपूरच्या प्रेमात पडल्यावर उडचा मारण, फोनची आतुरतेन वाट बघणं असले प्रकार चित्रपट पाहताना आपली करमणूक करतात.

अनिता राज ही एक नवीन पिढीतील नायिका. ती दिसायला फार सुदर नाही; पण चांगली म्हणता येईल अशी. तिचा अभिनय अगदी सहज वाटतो; पण अभिनयाला तिला फारसा वाव नाही आहे. विनोद निर्माण करण्याचं काम रवी वास्वानीवर सोपवलं आहे. चष्मेबद्दूर, जाने भी दो यारो नंतर हा अभिनेता विशेष नावारूपाला आला. त्या दोन्ही चित्रपटात त्याच्या संवादाच्या लकबीतून किंवा एखाद्या प्रसंगातून विनोद निर्माण व्हायचा. 'अब आएगा मजा' त मात्र विनोदाचा शॉर्टकट वापरला आहे. या सायडीला–हे त्याच्या नावाचं अमेरिकन–अमेरिका रिटर्न्ड करून टाकलं आणि मग 'हम टुम से प्यार कर्ता हय' तशा तऱ्हेची लकब त्याला देऊन विनोदनिर्मितीचा प्रयत्न आहे अशा तऱ्हेच्या विनोदात अभिनेत्याचा अभिनय, हावभाव जास्त बेगडी आणि कृत्रिम वाटतात. तसंच इथं रवी वास्वानीच्या बाबतीत होतं.

चित्रपटाचे संवादही विनोदनिर्मितीच्या दृष्टीनं पूरक आहेत. इथला विनोद हा प्रासंगिकपेक्षा शाब्दिक जास्त आहे. विजय बावळट असला तरी तो फारसा पेचप्रसगात सापडलेला आढळत नाही. त्यामुळे 'मजा' निर्माण करण्याच मुख्य साधन संवादच. नतर आठवून-आठवून जरी हसायला आलं नाही तरी चित्रपट पाहताना मात्र आपण हसतोच !

मक्सद, शराबी, तोहफा असल्या चित्रपटांच्या गर्दीत असा एखादा चित्रपट बरा वाटतो !

—उज्ज्वला लेले



# मनःचक्षूचे सामर्थ्य

तुमच्या मनातील खाजगी रंगभूमीची आराधना करणे एक प्रकारे सोपे असते. कारण, आराधनेसाठी नाटकाचा विषय निवडणे, संवाद लिहिणे, इत्यादी पूर्वतयारी करण्यापासून ते थेट नाट्यप्रयोग आपल्या मनःपटलावर सादर करण्यापर्यंत सर्व कामे तुम्हाला एकट्यालाच करावयाची असतात. साहजिकच तुमच्या मनातील रंगभूमीवर सादर करावयाच्या या नाटकात अभिनयही तुम्हाला एकट्यालाच करायचा असतो !

□

लेखांक : तिसरा । लेखक : कि. मो. फडके

## रंगदेवतेची आराधना

मराठी माणसाला नाटकाचे वेडच आहे. त्यामुळे नव्या व जुन्या सर्व तऱ्हेच्या नाटकांचे प्रयोग मराठी रंगभूमीवर होत असतात आणि रंगदेवतेचे उपासक, विविध विषयांवर नाटके लिहिण्याची व ती रंगभूमीवर सादर करण्याची नवीनवी तंत्रे हाताळीत असतात. शिवाय रंगभूमीवरील प्रयोगांची मर्मज्ञपणे दखल घेणारे लेख व परिसंवाद, यांचेही रसिकांना नाट्यप्रयोगांइतकेच आकर्षण वाटत असते. अर्थात रंगभूमीवर जिवापाड प्रेम करणाऱ्या बहुसंख्य रसिकांना नाट्यविषयक घडामोडींत प्रेक्षकाची, श्रोत्याची किंवा वाचकाची भूमिका घेऊनच समाधान मानावे लागते आणि ते सहाजिकच आहे. कारण बहुसंख्य माणसे नाटके कशी लिहिणार, नाटकात भूमिका कशी करणार किंवा नाट्यप्रयोगांवर लेख कसे लिहिणार ?

परंतु इच्छा असेल तर कोणत्याही माणसाला रंगभूमीची सक्रियपणे सेवा करता येईल आणि तीही केवळ मनोरंजनासाठी नाही तर जीवनात यशस्वी होण्यासाठी ! विशेष म्हणजे यासाठी त्याला रजतपटाकडे धाव घेण्याची काहीच गरज नाही. उलट, त्याने फक्त त्याच्या मनःपटलाकडे धाव घेतली पाहिजे.

तुम्हाला आठवतच असेल की, रेखाला गिझर चालू ठेवून स्नान करण्याची जी भीती वाटत होती, त्या भीतीच्या मुळाशी तिच्या मनःपटलावर घडणारी एक शोकांतिका होती. त्या शोकांतिकेत तिची भूमिका एका असहाय व दुर्दैवी नायिकेची होती आणि एक प्रचंड स्फोट होऊन, गिझरचे अनेक तुकडे नायिकेच्या शरीरात घुसून, ती रक्तबंबाळ होऊन, बंद स्नानगृहात कोसळून पडते, असा त्या शोकांतिकेतील अखेरचा प्रवेश होता. रेखाला मी मुख्यतः जी मदत केली, त्यात दोन गोष्टींचा अंतर्भाव होता. पहिली गोष्ट म्हणजे मी तिला तिच्या मनःपटलावर घडणाऱ्या शोकांतिकेची स्पष्ट जाणीव करून दिली. दुसरी गोष्ट म्हणजे मी तिला तिच्या मनातील रंगभूमीवर एक वेगळे नाटक सादर करण्यास शिकविले.

एका विशिष्ट भीतीच्या बाबतीत रेखाने आपल्या मनःपटलावर एक वेगळे नाटक सादर करण्याचे तंत्र आत्मसात केले खरे; परंतु म्हणून काही रेखा त्या तंत्राचा उपयोग करण्यात अगदी तरबेज झाली अथवा तिला त्या तंत्राच्या सामर्थ्याची पूर्ण प्रचीती आली, असे म्हणता येणार नाही. याचे कारण असे की, मला भेटावयास येण्यामागचा तिचा हेतू मर्यादित स्वरूपाचा होता. त्यामुळे माझ्या मदतीचे स्वरूपही, तिला तिच्या मनातील रंगभूमीवर एक वेगळे नाटक करावयास शिकविण्यापुरतेच मर्यादित होते. तथापि मनातील रंगभूमीची सेवा करण्याचे हेतू व मार्ग, रेखाच्या उदाहरणावरून स्पष्ट झाले. त्याहून किती तरी बहुरंगी व बहुगुणी असतात, त्यांचा थोड्याशा विस्ताराने परिचय करून देणे, हे या प्रकरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

तुमच्या मनातील खाजगी रंगभूमीची आराधना करणे एक प्रकारे सोपे असते. कारण असे की या आराधनेसाठी नाटकाचा विषय निवडणे, संवाद लिहिणे इत्यादी पूर्वतयारी करण्यापासून ते थेट नाट्यप्रयोग आपल्या मनःपटलावर सादर करण्यापर्यंत सर्व कामे तुम्हाला एकट्यालाच करावयाची असतात. साहजिकच तुमच्या मनातील रंगभूमीवर सादर करावयाच्या या नाटकात अभिनयही तुम्हाला एकट्यालाच करावयाचा असतो. हा सर्व मामला म्हणजे एकखांबी तंबू किंवा एकपात्री प्रयोग असतो. इतके मनमुराद स्वातंत्र्य क्वचितच जगातील एखादी नाट्यसंस्था तुम्हाला बहाल करील !

परंतु या अनिर्बंध स्वातंत्र्याचा रेखाप्रमाणेच अनेक माणसे दुरु-

पयोग करून त्यांच्या मनातील रंगभूमीवर अशा काही शोकातिका सादर करीत असतात की, त्यामुळे प्रत्यक्ष जीवनात त्याच्या वाट्याला दु.ख व अपयशच अधिक येते आणि दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, प्रत्यक्ष जीवनात त्याच्या वाट्याला जे दु.ख व अपयश येत असते, त्याला त्यांच्याच मनातील खाजगी रंगभूमीवर घडणाऱ्या शोकांतिकाच किती प्रमाणात कारणीभूत होत असतात, याची रेखाप्रमाणेच त्याना कल्पनाही नसते.

## विमलाबाई काय करतील ?

स्वतःच्या मनातील रंगभूमीची निष्ठेने आराधना करण्यास सुरुवात केल्यावर एखादी व्यक्ती आपल्या स्वतःच्या वर्तनात मना-जोगा बदल कसा करून घेऊ शकते, याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे सुशीलाबाई. त्या चांगल्या पदवीधर असूनही त्याना त्यांच्या दोन्ही मुलाना शिस्त लावण्याचे काम फारच त्रासदायक वाटत असे. त्यांच्या मुलाने किंवा मुलीने कोणतेही बेशिस्त वर्तन केले की, त्यांच्या रागाचा पारा इतक्या चटकन चढू लागत असे की, त्यामुळे मुलाना काही समजावून सांगण्याऐवजी त्या मुलाशी भांडायचीच सुरुवात करीत असत. अशा भांडणामुळे मुलाच्या वागण्यात तर काही बदल होत नसेच; पण सुशीलाबाई मात्र आपण क्षुल्लक गोष्टीवरून इतक्या चटकन भडकतो हे बरोबर नाही, या विचाराने विषण्ण होत असत. आपल्या या शीघ्रकोपी स्वभावामुळे मुलांना काही शिस्त लागण्याऐवजी आपल्यालाच जास्त मनस्ताप होतो, याची त्यांना जाणीव होती; परंतु क्षणात उसळणाऱ्या आपल्या रागाला कसे आवरावे, हे त्याना उमगत नसे. शिवाय, त्यांच्या शेजारी राहणाऱ्या विमलाताई शांतपणे त्यांच्या मुलांशी बोलू शकतात व त्याना शिस्त लावू शकतात, म्हणून त्यांना मनातल्या मनात विमलाबाईंचा हेवाही वाटत असे.

स्वतःच्या मनात हव्या त्या प्रतिमा हुकमीपणे रेखाटण्याची कला आत्मसात केल्यावर, सुशीलाबाईंनी स्वतःचा मनस्ताप कमी करून आपल्या मुलाशी सुसंवाद कसा साधला हे पाहणे उद्बोधक ठरेल. त्यांनी प्रथम, विमलाबाई त्यांच्या मुलांनी बेशिस्त वर्तन केल्यावर नेमक्या कशा वागतात, याचे काळजीपूर्वक निरीक्षण केले. त्यामुळे त्यांच्या असे लक्षात आले की, बहुधा कोणत्याही प्रसंगी विमलाबाई आवाज चढवून, मोठमोठ्याने आपल्या मुलाना अद्वातद्वा बोलत नसत. तसेच, त्या आत्मविश्वास ढळू देत नसत किंवा त्या जे काही काम करीत असतील त्यात फार काळ खंड पडू न देता, त्या ते काम पुढे करू लागत असत.

नंतर सुशीलाबाईंनी अशी कल्पना केली की, त्यांच्या बारा वर्षांच्या रमेशने सकाळी दात घासून झाल्यावर टूथपेस्टच्या ट्यूबचे झाकण परत न लावता ट्यूब तशीच उघडी टाकली, तर अशा वेळी विमलाबाई काय करतील ? विमलाबाई आपल्या हातातील काम बाजूला ठेवून तोंडाचा पट्टा चालू करतील काय ? त्यांच्या बोलण्या-वरून, इतर हावभावांवरून व एकूण वागण्यावरून, त्यांचा आत्म-विश्वास ढळलेला आहे असे दिसून येईल काय ? सुशीलाबाईंच्या कल्पनेला एकदा असे पंख फुटल्यावर हळूहळू त्यांनी आपल्या मनः-पटलावर विमलाबाई रमेशशी कशा वागतील याचे चित्र तपशील-वारपणे रेखाटण्यात यश मिळविले.

आता सुशिलाबाईंच्या मनातील रंगभूमीवर एकपात्री नाट्यप्रयोग सुरू झाला. विमलाबाईंच्या वागण्याचा आदर्श पक्का करून सुशीला-बाईंनी आपण नेमक्या विमलाबाईंसारख्याच नेहमीच्या आवाजात, आत्मविश्वास ढळू न देता किंवा स्नानगृहातील बादलीत कपडे भिजविण्याचे आपले चालू असलेले काम एकदम बंद न करता, रमेशशी बोलत आहोत असा नाट्यप्रयोग आपल्या मनातील खाजगी रंगभूमीवर सादर केला. त्या नाट्यप्रयोगात रमेशशी सवाद करताना स्वतःची भाषा व स्वतःचा अभिनय अगदी आपल्या पक्क्या केलेल्या आदर्शानुसार वठवला जात होता, याची त्या खबरदारी घेत होत्या. म्हणजे दिग्दर्शनाचे व अभिनयाचे काम त्या स्वतःच करीत होत्या.

वरील नाट्यप्रयोग सुशीलाबाईंनी वारंवार आपल्या मनातील खाजगी रंगभूमीवर सादर केल्यावर थोड्याच दिवसात त्याना तीन परिणाम दिसून आले. पहिला परिणाम असा झाला की, त्यांच्या मुलाच्या बेशिस्त वर्तनामुळे त्यांचा राग उफाळून येणे बरेच कमी झाले आणि एखादी अप्रिय घटना घडली की, आपण डोक्यात राख घालून घेऊन उगीच जीभ सैल सोडीत नाही अथवा हातातले कामही बाजूला ठेवत नाही, याबद्दल त्यांना समाधान वाटले. दुसरा परिणाम असा झाला की, आपली आई उगीच ऊठसूट आपला राग-राग करीत नाही, हे लक्षात येऊन त्यांच्या मुलांच्या मनातील आई-बद्दलची अढी खूपच कमी झाली. तिसरा परिणाम असा झाला की, सुशीलाबाईचे मन शांत झाल्यामुळे त्यांना आपल्या मुलांशी सुसंवाद साधण्याचे, मुलांना त्यांच्या चुका समजावून सांगण्याचे नवेनवे मार्ग दिसू लागले. याचा अर्थ असा की, सुशीलाबाईंनी मन चक्षूच्या सहा-य्याने स्वतःचा राग कह्यात आणल्यामुळे, त्यांच्या मनात स्वतत्रपणे विचार करण्याची व मुलांना शिस्त लावण्यासाठी निरनिराळे उपाय करून पाहण्याची प्रेरणा जागृत झाली. या सर्व गोष्टींचा फायदा असा झाला की, सुशीलाबाई आपल्या मुलांना शिस्त लावण्याचे काम जास्त चातुर्याने करू लागल्या.

स्वतःच्या मनातील खाजगी रंगभूमीची आराधना करून, माण-साला आपल्या जीवनातील किती विविध प्रकारच्या समस्या चातुर्याने हाताळता येतात हे स्पष्ट करण्यासाठी आणखी काही उदाहरणांचा दाखला देणे उद्बोधक होईल.

नचिकेत एक पदवीधर इंजिनिअर आहे. त्याने मनःचक्षूच्या सामर्थ्याचा अभ्यास करावयास सुरुवात केली तेव्हा प्रथम त्याची प्रतिक्रिया काही फारशी अनुकूल झाली नव्हती. मनःचक्षूच्या साम-र्थ्याने माणसाला बऱ्याच प्रमाणात आपले भवितव्य घडविता येते, ही कल्पना त्याला फारशी पटली नव्हती. त्याचे म्हणणे असे होते की, एक तर या कल्पनेत नवीन असे काहीच नाही. कारण कळत अथवा न कळत त्याने पूर्वीही मानसचित्राचा उपयोग करून पाहि-लेला होता; परंतु त्याचा त्याला काहीच फायदा झालेला नव्हता. त्याच्याच शब्दात सांगावयाचे म्हणजे अगदी शाळेत असतानासुद्धा, सहलीला जाण्यासाठी किंवा सिनेमाला जाण्यासाठी तो आई-वडि-लांची परवानगी विचारण्याअगोदर मनातल्या मनात आईशी अथवा वडिलांशी कसे बोलावे, याची तयारी करीत असे. अर्थात त्यामुळे काही त्याला कधी आई-वडिलाची परवानगी मिळाली नव्हती. शेवटी आई-वडील त्यांच्या मर्जीनुसार वागत असत, ते काही

त्यांच्या लाडक्या नचिकेतच्या मनातील पूर्वतयारीनुसार किंवा प्रतिमांनुसार वागत नसत !

वास्तविक नचिकेतच्या वरील विचारसरणीत थोडी गफलत झालेली होती. पहिली गोष्ट अशी की, मानसचित्रांच्या कल्पनेत नवीन असे काहीच नाही, हे त्याचे म्हणणे काही अंशी खरे होते, तरी तो लहानपणापासून इतर माणसांप्रमाणेच कळत वा नकळत मानसिक प्रतिमांचा उपयोग करीत होता, हे म्हणणे तितकेसे रास्त नव्हते. कारण तो त्याच्या मनःचक्षूचा काही प्रमाणात उपयोग करीत होता तरी त्याचे प्रयत्न पद्धतशीर व निर्दोष नव्हते. दुसरी गोष्ट अशी की, मानसचित्रांच्या सहाय्याने दुसऱ्याचे वर्तन हुकमीपणे बदलता यावयास हवे, हा त्याचा हट्ट बालिश होता. तथापि नचिकेतच्या बाबतीत जमेची बाजू अशी होती की, तो मनःचक्षूच्या सामर्थ्याचा अभ्यास करावयास तयार होता. त्यामुळे हळूहळू त्याच्या मनातील गैरसमज दूर झाले व त्याने आपली प्रगती खूपच झपाट्याने करून घेतली.

नचिकेत मनःचक्षूच्या सामर्थ्याच्या अभ्यासाला लागला तेव्हा तो एखादी चांगली नोकरी मिळविण्याच्या खटपटीत होता तो एका कारखान्यात जी नोकरी करीत होता, त्या नोकरीहून एका अधिक चांगल्या नोकरीची जाहिरात वाचून, त्याने त्या नोकरीसाठी अर्ज केला होता. काही दिवसांनी त्याला मुलाखतीचे निमंत्रण आले. मुलाखतीला जाण्यापूर्वी त्याने आपल्या मनातील रंगभूमीवर कोणते प्रयोग करण्याचा सराव केला, त्यांची रूपरेषा खाली दिली आहे.

सामान्यतः अशा मुलाखतीचे निमंत्रण आले की, बहुतेक कोणतीही व्यक्ती मुलाखतीत होणाऱ्या संभाव्य प्रश्नोत्तरांची मनातल्या मनात उजळणी करते, हे खरे आहे; परंतु ही उजळणी नेहमी पद्धतशीरपणे व सुस्पष्टपणे केली जात असते असे नाही. नचिकेतने मात्र, मुलाखतीच्या प्रसंगासंबंधी सखोल विचार करून अनेक सुस्पष्ट व रेखीव प्रतिमांची मालिका आपल्या मनःपटलावर उभी केली. उदाहरणार्थ, तो मुलाखतीला आलेल्या इतर उमेदवारांबरोबर प्रतीक्षा–कक्षात बसून गप्पा मारीत आहे, काही वेळाने त्याचे नाव पुकारल्यावर तो उठून मुलाखतीच्या खोलीकडे जाऊ लागतो. खोलीत प्रवेश केल्यावर मुलाखत घेणाऱ्या अधिकाऱ्यांना नम्रपणे पण आत्मविश्वासपूर्वक अभिवादन करून त्यांच्यापैकी एकाने निर्दिष्ट केलेल्या खुर्चीवर बसतो. मग त्याला त्याच्या पूर्वानुभवाबद्दल प्रश्न विचारले जात आहेत आणि एकेका प्रश्नाला तो शांतचित्ताने नेमकी उत्तरे देत आहे इत्यादी अनेक विशिष्ट घटनांसंबंधीच्या प्रतिमा त्याने आपल्या मनःचक्षूच्या सामर्थ्याने पाहण्याचा सराव केला. या सरावाचा परिणाम असा झाला की, प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळी आपल्याकडून आपल्या मनातील प्रतिमांनुसार वर्तन होईल, याची शक्यता त्याने वाढीस लावली.

नचिकेतच्या पद्धतशीर प्रयत्नातील पुढील टप्पा विशेष काळजीपूर्वक समजावून घेण्यासारखा आहे. या टप्प्यावर नचिकेत कल्पनेच्या कुंचल्याने आपल्या मनःपटलावर अशी चित्रे रंगवीत होता की, मुलाखतीच्या वेळी त्याला विचारलेल्या सर्व प्रश्नांना त्याने उत्तम प्रकारे व अचूक उत्तरे दिल्यामुळे मुलाखत घेणारे अधिकारी त्याच्यावर खूष झाले आहेत व त्यामुळे त्याला आनंद तर वाटत आहेच; पण शिवाय ही नोकरी आपल्याला मिळणार असा आत्मविश्वासही वाटत आहे.



□

परंतु याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे या टप्प्यावर नचिकेत कल्पनेच्या कुंचल्याने आपल्या मनःपटलावर अशीही चित्रे रंगवीत होता की, जर त्याची काही उत्तरे चुकली अथवा त्याच्या काही उत्तरांमुळे मुलाखत घेणारे अधिकारी त्याच्यावर नाराज झाले आहेत असे त्यांच्या चेहऱ्यांवरून स्पष्ट दिसले, तर त्याला थोडी खंत वाटेल; पण तो एकदम निराश किंवा विषण्ण होणार नाही. उलट, त्याला ही नोकरी नाहीच मिळाली, तर तो दुसरी एखादी चांगली नोकरी मिळविण्याचा प्रयत्न जास्त ईर्षेने करावयास लागेल, अशीही प्रतिमा आपल्या मनःपटलावर रंगविण्यास नचिकेत विसरला नाही.

नोकरी मिळविण्यासाठी मुलाखत देणे, या प्रसंगासंबंधी नचिकेतने आपल्या मनातील रंगभूमीवर जो नाट्यप्रयोग परत परत सादर करण्याचा सराव केला, त्यावरून तीन गोष्टी स्पष्ट होतात. पहिली गोष्ट अशी की, मानसचित्रांच्या कल्पनेत नवीन असे काहीच नव्हते असे प्रथम त्याला वाटत होते तरी एखाद्या संभाव्य घटनेविषयी सखोल विचार करून स्पष्ट व रेखीव मानसचित्रांची निर्मिती कशी करावी, हे त्याला अभ्यासाअंती समजले होते. दुसरी गोष्ट अशी की, मनःचक्षूच्या सामर्थ्याने आपल्या इच्छेप्रमाणे दुसऱ्या माणसांना वर्तन करावयास भाग पाडता येते, असे कोणीच सुज्ञ मनुष्य म्हणत नाही हे त्याला पटले होते. तिसरी गोष्ट म्हणजे मनःचक्षूच्या सामर्थ्याने माणसाला मुख्यतः आपल्या स्वतःच्या भावनांवर व वर्तनावर नियंत्रण ठेवण्यास शिकता येते, हे त्याला उमगले होते आणि म्हणूनच; मुलाखतीच्या वेळी त्याने दिलेल्या काही उत्तरांमुळे मुलाखत घेणारे अधिकारी त्याच्यावर नाराज झाले व हवी असलेली नोकरी त्याला मिळाली नाही तर त्याला साहजिकच थोडी खंत वाटते; परंतु तो एकदम निराश किंवा विषण्ण होत नाही. उलट दुसरी एखादी चांगली नोकरी मिळविण्याचा प्रयत्न तो जास्त ईर्षेने करावयास

लागतो, अशा मानसचित्रांचाही समावेश त्याने आपल्या काल्पनिक नाटयप्रयोगात केलेला होता. याचा अर्थ असा की, मन:चक्षूच्या सामर्थ्याचा उपयोग करणे म्हणजे काही भाबडे स्वप्नरंजन नव्हे, हे त्याच्या पूर्णपणे लक्षात आले होते.

### नचिकेतचे उद्दिष्ट

वस्तुस्थितीचे भान न सोडता नचिकेतने मुलाखतीला जाण्यापूर्वी आपल्या मनातील खाजगी रंगभूमीवर जो नाटयप्रयोग सादर करण्याचा सराव केला होता, त्याचा प्रत्यक्ष मुलाखतीच्या प्रसंगावर काय परिणाम झाला ? पहिला परिणाम असा की, प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळी नचिचेतच्या बोलण्यातून व वागण्यातून त्याचा आत्मविश्वास व्यक्त झाला. दुसरा परिणाम असा झाला की, मुलाखत घेणाऱ्या अधिकाऱ्यांचा नचिकेतकडे पाहण्याचा दृष्टिकोण खूपच अनुकूल झाला व त्यामुळे त्यांनी नचिकेतची मुलाखत अधिक अनौपचारिकपणे व समजूतदारपणे घेतली. म्हणजे नचिकेतने मानसचित्राचा उपयोग करून आपल्या मनातील रंगभूमीवर जे अनेक एकपात्री प्रयोग वारवार सादर केले, त्यामुळे तो स्वत:च्या दृष्टिकोणावर व वर्तनावर ताबा ठेवण्यात तर यशस्वी झालाच; पण अप्रत्यक्षपणे मुलाखत घेणाऱ्या अधिकाऱ्याच्या दृष्टिकोणावर व वर्तनावर ताबा ठेवण्यातही तो काही अंशी यशस्वी झाला; परंतु म्हणून काही माणसाला आपल्या मन:चक्षूच्या सामर्थ्याने दुसऱ्या माणसांच्या दृष्टिकोणावर व वर्तनावर हुकमीपणे नियंत्रण करता येते, असे म्हणता येत नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

मुलाखत झाल्यानंतर काही दिवसांनी, नचिकेतला आनंदाची बातमी कळविणारे एक पत्र आले. हवी होती ती नोकरी त्याला मिळाली होती ! अर्थात एखादी नोकरी मिळणे अथवा न मिळणे अनेक गोष्टींवर अवलबून असते. त्यामुळे कदाचित असेही होऊ शकले असते की, नचिकेतला ती नोकरी मिळाली नसती; परंतु तरीसुद्धा नचिकेतला मन:चक्षूच्या सामर्थ्याचा प्रत्यय आला असता. कारण त्याने स्वत:च्या मनातील रंगभूमीवर असाही एक प्रयोग सादर केला होता की, मुलाखतीच्या वेळी त्याने दिलेल्या काही उत्तरामुळे मुलाखत घेणारे अधिकारी नाराज झाले होते व ती नोकरी आपल्याला मिळणार नाही असे त्याला वाटले होते, तरी त्याला फक्त थोडी खंत वाटली होती; परतु तो एकदम कमालीचा निराश व विषण्ण न होता परत दुसरी एखादी चागली नोकरी मिळविण्यासाठी जास्त ईर्षेने प्रयत्न करावयास लागला होता.

एकंदरीत असे म्हणता येईल की, नचिकतेने मन:चक्षूच्या सामर्थ्याचा उपयोग करून काही मुलाखत घेणाऱ्या अधिकाऱ्यांच्या खिशातून एक चांगली नोकरी उपटली नव्हती. एखादी चांगली नोकरी मिळविण्याचे आपले उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठी, आपण स्वत: काय केले पाहिजे हे शिकण्यासाठी त्याने मन:चक्षूच्या सामर्थ्याचा उपयोग करून घेतला होता आणि आपण आपले उद्दिष्ट नेमके कसे साध्य करून घ्यावे; याविषयी जाणीवपूर्वक आपल्या मनातील रंगभूमीवर काही प्रयोग सादर करण्याचा सराव केला, तर प्रत्यक्ष जीवनात आपले उद्दिष्ट सफल होण्याची शक्यता नक्कीच वाढते, हे त्याच्या मनावर ठसले गेले. नचिकेतचे उद्दिष्ट एक चांगली नोकरी मिळविणे हे होते; परतु त्याने आपले उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठी त्याच्या मनातील खाजगी रंगभूमीचा ज्या पद्धतीने उपयोग करून घेतला, त्या पद्धतीचा उपयोग करून तुम्हाला तुमची अनेक उद्दिष्टे साध्य करण्याची खटपट करता येईल.

हा पाहा शिरीष. त्याला त्याच्या महाविद्यालयातील वादविवादमंडळाच्या कार्यक्रमात फार रस वाटतो. त्या मंडळाच्या सर्व कार्यक्रमाना न चुकता तो हजर राहतो. त्याचे वाचनही चौफेर आहे. त्यामुळे आपणही वादविवादमडळाच्या कार्यक्रमात सक्रियपणे भाग घ्यावा असे त्याला नेहमी वाटत असे. एकदोन वेळा त्याने व्यासपीठावर जाऊन भाषण करण्याचा प्रयत्नही करून पाहिला होता; परतु त्याच्या असे लक्षात आले की, तो व्यासपीठावर उभा राहिला की, त्याची छाती धडधडू लागते, हातापायाना कंप सुटतो व घशाला कोरड पडते. श्रोत्यांनी तुडुब भरलेल्या सभागृहात न घाबरता आत्मविश्वासाने बोलण्याची कला आत्मसात करण्यासाठी त्याने सुशीलाबाई व नचिकेत यांनी अवलबिलेल्या पद्धतीचा उपयोग केला; परतु स्वत:च्या मनातील रंगभूमीची सेवा करताना, त्याने सुशीलाबाई व नचिकेत या दोघांवरही मात केली असेच म्हटले पाहिजे.

शिरीषला वाटले की, जर स्वत:च्या मनातील खाजगी रंगभूमीवर काल्पनिक नाटयप्रयोगच सादर करावयाचा तर निदान त्यात तरी आपल्या कल्पनेचे दारिद्रय दिसावयास नको ! म्हणून त्याने आपल्या मन:पटलावर प्रतिमा चितारण्यास सुरुवात केली. तेव्हा प्रथमच असे ठरवून टाकले की, तो भारतातील एक सर्वोत्कृष्ट वक्ता आहे. एकदा ही गरुडझेप घेतल्यावर त्याच्या कल्पनेला कशी चालना मिळाली, हे त्याने आपल्या मनातील रंगभूमीवर जे एकपात्री प्रयोग करण्यास सुरुवात केली, त्यांपैकी खालील एका प्रयोगावरून समजून येईल.

आंतर–महाविद्यालयीन वक्तृत्व–स्पर्धेत शिरीष भाग घेणार आहे, ही बातमी शहरातील सर्व महाविद्यालयांत वाऱ्यासारखी पसरली. त्यामुळे स्पर्धा सुरू होण्यापूर्वी चार तास सभागृहात श्रोते ठाण मांडून बसले होते. श्रोत्यानी इतकी गर्दी केली होती की, आता एकाही श्रोत्याला सभागृहात पाऊल टाकणे शक्य नव्हते. विद्यार्थी व विद्यार्थिनी बाकांवर तर दाटीदाटीने बसले होतेच; पण सभागृहाच्या खिडक्या व बाकांच्या रागामधील मोकळ्या जागासुद्धा श्रोत्यानी व्यापून टाकल्या होत्या. शिवाय, वेगवेगळ्या महाविद्यालयांतून आलेला श्रोतृसमुदाय सभागृहाच्या बाहेर ताटकळत उभा राहून, शिरीषचे भाषण कधी सुरू होते याची वाट पहात होता. अर्थात, शिरीषचे भाषण ऐकण्यासाठी अशी तुफान गर्दी जमणार, म्हणून सभागृहाच्या बाहेर ध्वनिवर्धकांची उत्तम सोय केलेलीच होती.

तीन स्पर्धकांची भाषणे सपल्यावर स्पर्धेच्या संचालकानी शिरीषचे नाव पुकारताच, सभागृहातील व सभागृहाच्या बाहेरील श्रोतृवृंदानी जवळजवळ दोन मिनिटे टाळ्यांचा कडकडाट केला. मग व्यासपीठावर उभा राहून, शिरीष आत्मविश्वासाने बोलू लागताच सर्वत्र शांतता पसरली. त्याने निश्चयी व बुलंद आवाजात उच्चारलेल्या पहिल्या तीन–चार वाक्यांनीच श्रोत्यांवर इतकी काही छाप पडली की, ते अगदी मंत्रमुग्ध होऊन गेले. त्याने विषयाची मांडणी उदाहरणे देऊन, मुद्देसूदपणे केल्यामुळे श्रोते विस्मयचकित होऊन भारावून गेले. अखेर शिरीषचे भाषण संपल्यावर श्रोत्यांनी त्याला अशी काही दाद दिली की, स्पर्धेच्या संचालकांना वाटू लागले की, पुढील

सर्व वक्त्यांची भाषणे बहुधा अगदी निष्प्रभ ठरणार ! ...

वरील प्रकारचे अनेक एकपात्री प्रयोग शिरीष स्वतःच्या मनातील रंगभूमीवर काही दिवस वारंवार सादर करीत होता. त्यामुळे कालांतराने गरुडझेप घेण्याच्या त्याच्या या प्रयत्नांना यश आले. श्रोत्यासमोर व्यासपीठावर उभे राहून बोलताना, त्याला पूर्वी जी भीती वाटत होती ती तर गेलीच; पण त्याचा आत्मविश्वास वाढल्यामुळे त्याची भाषण करण्याची शैलीही जास्त आकर्षक व परिणामकारक होऊ लागली.

शिरीषने आपले उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठी स्वतःच्या मनातील रंगभूमीवर जे एकपात्री प्रयोग सादर केले ते काही मामुली स्वरूपाचे नव्हते. उलट, कल्पनेच्या कुंचल्याला हात लावण्यापूर्वी त्याने मनाशी अशी खूणगाठ बांधली की, मी म्हणजे भारतातील एक सर्वोत्कृष्ट वक्ता आहे ! प्रथमच त्याने ही जी गरुडझेप घेतली होती, त्यामुळे त्याने आपल्या मनातील रंगभूमीवर नंतर भव्य नाट्यप्रयोग सादर केले, त्या प्रयोगांना एक विशेष चैतन्य प्राप्त झाले.

मन.चक्षूच्या सामर्थ्याचा उपयोग करताना माणूस प्रथमच अशी गरुडझेप घेईल, तर तो आपले उद्दिष्ट कसे साध्य करून घेऊ शकेल याचे आणखी एक उदाहरण पाहा. श्रीपादरावांचा आवडता छंद म्हणजे कॅरम खेळणे. कचेरीतून घरी आल्यावर ते बहुधा रोजच क्लबमध्ये जाऊन निदान दीड–दोन तास तरी कॅरम खेळण्यात रंगून जातात आणि क्लबमधील वार्षिक स्पर्धेतही ते मोठ्या हौसेने भाग घेतात.

परंतु गेल्या वर्षी त्यांची मोठी कुचंबणा झाली होती. त्यांनी आपल्या मुलीच्या विवाहानिमित्त कचेरीतून दोन महिने रजा घेतली. त्या दोन महिन्यात ते कधी क्लबमध्ये गेले नाहीत किंवा इतर कोठे कॅरम खेळले नाहीत. रजा संपल्यावर ते परत कामावर रुजू झाले तोच त्यांच्यावर कामानिमित्त सतत फिरतीवर जाण्याचा प्रसंग आला. पाच आठवड्यांनंतर त्यांच्या क्लबमध्ये कॅरमच्या वार्षिक स्पर्धा होणार होत्या आणि नेमक्या त्याच सर्व काळात ते सतत फिरतीवर राहणार होते. साहजिकच कॅरम खेळण्याचा सराव करणे त्यांना शक्य नव्हते. तेव्हा त्यांनी फिरतीवर असताना मनःचक्षूच्या सामर्थ्याचा कल्पकतेने उपयोग करून घेण्याचे ठरविले.

त्यांनी मनःचक्षूच्या सामर्थ्याचा उपयोग करण्यास प्रारंभ केला तो मुळी गरुडझेप घेऊनच ! याचा अर्थ असा की, त्यांनी मनाशी असे पक्के ठरविले की, ते एक आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कॅरमपटू आहेत ! ही गरुडझेप घेतल्यावर मग त्यांनी आपल्या मनातील खाजगी रंगभूमीवर अनेक एकपात्री प्रयोग सादर करण्यास सुरुवात केली. त्या सर्व प्रयोगांतील मध्यवर्ती कल्पना अशी होती की, त्यांचे कॅरम खेळण्यातील कौशल्य इतके नेत्रदीपक आहे की, कोणत्याही प्रतिस्पर्ध्याचा त्यांच्यापुढे टिकाव लागणे शक्यच नव्हते !

श्रीपादरावांनी आपल्या मनातील रंगभूमीवर असे प्रयोग सादर केले की, ते एका प्रतिस्पर्ध्याबरोबर कॅरम खेळत आहेत. त्यांच्या कौशल्यामुळे खेळ सुरू झाल्यावर केवळ काही मिनिटांनीच हे स्पष्ट होऊ लागते की, डाव श्रीपादराव जिंकणार ! मात्र प्रतिस्पर्ध्याबरोबर खेळताना ते स्वतः नेमके कसे खेळत होते, याचे तपशीलवार व सुस्पष्ट चित्रण आपल्या मनःपटलावर करावयास ते विसरले नाहीत. ते फिरतीवर असताना आपल्या मनातील रंगभूमीवर अशा तऱ्हेचे नाट्यप्रयोग परत–परत सादर करीत असत.

## खाजगी रंगभूमीची आराधना

अखेर श्रीपादराव फिरतीवरून परत आले तेव्हा त्यांच्या क्लबमधील कॅरमच्या स्पर्धा दोन दिवसांवर येऊन ठेपल्या होत्या–त्यामुळे श्रीपादरावांनी दोन दिवस प्रत्यक्ष कॅरम खेळण्याचा सराव केला व मग ते वार्षिक स्पर्धेच्या रिंगणात उतरले. त्यांचा खेळ उत्तम झाला आणि त्यांनी पहिले नाही; पण दुसरे बक्षिस पटकावले !

शिरीष व श्रीपादराव यांची उदाहरणे समजावून घेताना पुढील चार महत्त्वाचे मुद्दे लक्षात घ्यावयास हवेत.

१. शिरीष व श्रीपादराव यांनी त्यांच्या मनःपटलावर रंगविलेल्या प्रतिमा तपशिलाच्या दृष्टीने अतिशय सपन्न होत्या. किंबहुना त्यांच्या मनातील रंगभूमीवरील नाट्यप्रयोगाचे बारकावे अचूकपणे वर्णन करून सांगावयाचे म्हटले तर त्यासाठी एक पुस्तकच लिहावे लागेल.
२. वस्तुतः त्या दोघांनीही आपले उद्दिष्ट साध्य झाले नाही, तर कोणता दृष्टिकोण ठेवावयाचा व आपले उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठी पुढे काय करावयाचे यासंबंधी आपल्या मनातील रंगभूमीवर एकपात्री प्रयोग सादर करण्याचा सराव केला होता; परंतु त्या नाट्यप्रयोगांचे वर्णन येथे केलेले नाही. कारण नचिकेतच्या उदाहरणावरून हा मुद्दा स्पष्ट केलेलाच आहे.
३. भाषण करण्याचा किंवा कॅरम खेळण्याचा मनातल्या मनात सराव करणे याचा अर्थ प्रत्यक्षात त्या क्रिया करण्याची गरजच नाही असा अजिबात नाही. उलट, मनातल्या मनात केलेला सराव हा प्रत्यक्ष सराव करण्याच्या क्रियेला पूरक ठरतो.
४. मनःचक्षूच्या सामर्थ्याने कोणत्याही व्यक्तीला वक्तृत्वात, कॅरम खेळण्यात अथवा इतर कोणत्याही क्षेत्रात एकदम जगाला दिपवून टाकणारे अद्वितीय यश मिळविता येईल, असा निष्कर्ष या प्रकरणातील उदाहरणावरून काढणे योग्य होणार नाही; परंतु एखाद्या व्यक्तीला स्वत.मधील ज्ञात अथवा अज्ञात गुणांच्या आविष्काराला वाट मोकळी करून देण्यासाठी मनःचक्षूच्या सामर्थ्याचा निश्चित उपयोग करून घेता येईल, असा निष्कर्ष काढणे योग्य होईल.

वरील सर्व मुद्दे तुम्ही नीट समजावून घेतलेत की, तुम्हाला दुसऱ्या कोणाची मदत न घेता, तुमच्या मनातील खाजगी रंगभूमीची आराधना करता येईल. कारण बहुसंख्य माणसाप्रमाणे तुम्हीही आजपर्यंत मानसचित्रांचा कळत अथवा न कळत उपयोग केला असेल आणि मानसचित्रांच्या कल्पनेत विशेष नवीन असे काही नसले, तरी त्यांचा पद्धतशीरपणे उपयोग करणे म्हणजे काय, हे तुम्हाला आता समजले असेल. आपल्या मनातील खाजगी रंगभूमीची आराधना करावयास तुम्ही शिकलात की, तुमच्या जीवनातील अनेक समस्यांना सामोरे जाताना तुम्हाला ही आराधना कशी फलदायी ठरेल ते पुढील प्रकरणावरून स्पष्ट होईल. ( क्रमशः ) □

## अनवट : पृष्ठ ८ वरून

काय करणार ? राज्यपाल तर कुलपती ! मग रामारावजी सिंडिकेटमार्फत सुब्बाराजूंना आणले. आता कुलसचिव व कुलगुरु दोघेही रस्सीखेच करतील व विद्यापीठ जागीच राहील.

आपल्याकडे दुसरं काय आहे ? कुठं कुलसचिव कुलगुरूला हुसकावून लावतो, तर दुसरीकडे नको ही कुलसचिवाची ब्याद म्हणायची पाळी येते. नागपूर विद्यापीठाचे काळमेघ (दादासाहेब) यांचे तर काय तुफान विनोदी प्रकार होत होते! जाऊ द्या! आता पुणे विद्यापीठाकडेच बघावं झालं !

### □ अमृतसर गेले, आता ठाणं लंडनमध्ये

५ जून १९८४ रोजी भारतीय लष्कराने कारवाई करून सुवर्णमंदिर–परिसरातील हिंसक शिखांचे ठाणे उध्वस्त केले आणि लगेच ७ जूनला लंडनमध्ये डॉ. जगजितसिंग चौहान याने ( त्या इंडिया हाउसप्रमाणे ) 'खलिस्तान हाउस' सुरू केले. आता अतिरेकी व फुटीरवादी शिखांच्या कारवायाचे केंद्र लंडनला गेले. या वेळी भारतसरकारबरोबर चर्चा करण्याचा प्रश्नच येत नाही, असे चौहान याने सांगितले.

सुवर्णमंदिरात लष्कराच्या कारवाईत भिंडरांवाले मारला गेला. या माणसाला संत म्हणणे राजीव गांधीनाच मंजूर असेल. या वेळी चंद्रशेखर, स्वामीसारख्यांची काय प्रतिक्रिया व्यक्त करावी, अशी परिस्थिती झाली! निवडणुका जवळ आल्या म्हणून इंदिराबाईंनी कारवाई केली असे फार तर ते म्हणू शकतात.

वस्तुतः विरोधी पक्षही काय कमी सधिसाधू आहेत ? उरण पेटले पळाले तिकडे; भिवंडी बेचिराख–फोटो काढून घ्यायला तयार ! खुद्द अकालींच्या मागेच हे सर्वजण किती फरपटत गेले, त्याचीही याना शुद्ध नव्हती. पंचविसाव्या कलमाच्या धोंड्यावर आपटले तेव्हा त्याना थोडी जाग आली. आता दंडवतेंसकट सर्वचजण अकालींशी बोलणी सुरू करण्याच्या बाजूचे आहेत. निवडणुकीसाठी सर्वच बाजू कोणत्याही गोष्टीचा फायदा घेतात.-

पण 'अकाली दल' तरी पंजाबप्रश्नी बोलणी करण्यासाठी आता दखलपात्र गट राहाणार आहे का ? तोहडा–लोंगोवाल या मंडळींना अटक केली, त्याच वेळी शिखांचे प्रतिनिधित्व लंडनमधल्या शिखांच्या गटांकडे गेले आहे.

ब्रिटनमध्ये ढोबळपणे शिखांचे दोन गट. एक खलिस्तानवादी डॉ. जगजितसिंह चौहान यांच्या नेतृत्वाखाली 'अतिरेकी' तर दुसरा अकाली दल ( लोंगोवाल गट ). त्याचे अध्यक्ष ग्यानी अमोलक सिंग. त्यांचा खलिस्तानला विरोध आहे.

परंतु आता पंचाईत अशी की, भिंडरांवाला मारला गेल्याने व तोहडा–लोंगोवाल विनाप्रतिकार शरण आल्याने या अकाली दलाला ही टोकाची भूमिका घ्यावी लागत आहे. या वेळी कोणत्याही शिखनेत्याने मवाळ-शिष्टाईची भाषा केली तर त्याचा राजकीय (किंवा भौतिक ) अंत ठरलेलाच आहे !

ब्रिटनमधल्या शिख–संघटनांमध्ये आता मवाळ–अतिरेकी असा फरक राहिला नाही. ग्यानी अमोलक सिंह म्हणतात की, सुवर्णमंदिरातील कृतीने श्रीमती गांधींनी आपला मृत्युलेखच लिहिला आहे. भिंडरांवालेसमोर लोंगोवाल अगदीच 'हा' दिसतोय, म्हणून त्यांच्याशी निष्ठा व्यक्त करणेही अवघड !

खरे तर सुवर्णमंदिरातून अतिरेकी शिरल्यावरच लोंगोवाल यांनी तेथून बाहेर पडायला हवे होते. मोर्चा हाताबाहेर जातो असे वाटले, त्याच वेळी तो मागे घ्यायला हवा होता, असे या गटाचे म्हणणे होते. आता मात्र ( भारतातील अकालीदलाप्रमाणेच ) ब्रिटनमधील जहाल शिखांशी स्पर्धा टिकून राहण्यासाठी अकाली गटालाही तितकाच किंवा त्याहून अधिक लढाऊ पवित्रा घ्यावा लागेल असे दिसते. त्यांनी आपले निदर्शनाचे कार्यक्रम वगैरे जाहीरही केले आहेत. बॉबफेकीचे प्रकारही अपेक्षेप्रमाणेच झालेत.

खरी गंमत वाटते, भारतातील ( विशेषतः पंजाबबाहेरील ) शिखांच्या वर्तनाची. नादेडच्या हुजुरसाहेबसभेचे लड्डूसिंग स्वतंत्र मतवादी. त्यांनी अखिल भारतीय गुरुद्वारा कायद्याला विरोध केला म्हणून सुवर्णमंदिरातून भिंडरांवालांचे हस्तक त्याना मारण्यासाठी नादेड–हैदराबादकडे गेले अशी वदन्ता होती. तेच लड्डूसिंगजी 'भिंडरांवाला झिंदाबाद' म्हणत आहेत. इतर शहरांतही तोच प्रकार. या वेळी त्या येशूचे बोल आठवतात ... 'ते काय करत आहेत–त्यांनाही... ' इ.

या सर्व प्रकरणाविषयी भारतीय वृत्तपत्रात आलेल्या अग्रलेखापैकी सर्वोत्कृष्ट म्हणून 'टाइम्स ऑफ इंडियाच्या' अग्रलेखाचा उल्लेख करावा लागेल. इतर बाबतीत काहीही असले तरी, अकाली प्रश्नी 'टाइम्स' ने सातत्याने एकच भूमिका राखली आहे. त्यातील एक महत्त्वाचा मुद्दा : भिंडरांवाले व तत्सम लोकांनी शिखांच्या मनात खोट्या असुरक्षिततेची ( खोटी ) भावना निर्माण केली. त्यामुळे राजकीय–आर्थिक लढाईला जातीय–भावनिक स्वरूप आले.

कोणत्याही मूलतत्त्ववादी (फंडामेंटालिस्ट) राणा भीमदेवी गटाचे किंवा नेत्याचे डावपेच याच एक कलमी कार्यक्रमावर अवलंबून असतात. 'False Consciousness' या संकल्पनेचाच हा थोडा वेगळा पैलू आहे.

शिखांनी ( किंवा मुस्लिमानीही ) अशा प्रकारच्या धर्ममार्तंडांनी निर्माण केलेल्या 'मिथ्या जाणिवे' तून बाहेर पडून रोजच्या आर्थिक–सामाजिक बदलांना व समस्यांना सामोरे जायचे की नाही हा खरा प्रश्न आहे.

पाकिस्तानने या घटनांवर कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही हे विशेष. हा अतर्गत मामला असल्याचे त्यांच्या प्रवक्त्याने सांगितले.

### □ पाकिस्तानी अर्थव्यवस्था

पाकिस्तानने आपल्या या वर्षीच्या अंदाजपत्रकात सरक्षण–लष्करावरचा खर्च एकदर बजेटच्या ३० टक्क्यांवर वाढवला. वस्तुतः गेल्या सात वर्षांत कधी नव्हे ते पाकिस्तानी अर्थव्यवस्था कोलमडलेली आहे. शेतीउत्पादन पाकच्या इतिहासात या वर्षी (१९८३–८४) सर्वांत कमी आहे. चलनवाढीचा दर ९.६ टक्क्यांनी वाढला.

पाकिस्तानवर परकीय कर्जाचा बोजा १००० कोटी डॉलरवर गेला आहे. काही म्हणता काही बचत होत नाही. पाकिस्तानी नागरिकाचे ९२ टक्के उत्पन्न नित्योपयोगी खर्चात जाते !.

□

# नाट्यपंदरी



## □ मामा आणि मामा !


एक काळ असा होता की, नाटकमंडळचांतून लहान मुलांचा एक ताफाच्या ताफाच असे. कारण संगीत नाटकात नाच-गाण्याचे प्रस्थ होते. या देखण्या मुलांचा नाच-गाण्यासाठी उपयोग केला जाई. मग यातूनच पुढे चांगले स्त्रीपार्टी नट आपोआप निवडले जात आवाज फुटलेल्या काही मुलांची अवस्था मोठी दयनीय होई. म्हणूनच गडकऱ्यांनी आपल्या नाटकात नाच-गाण्याला थारा दिला नाही. ही अशी खूप मुले कंपनीत असल्याने, नाच–गाण्याबरोबरच त्यांना थोडे फार शालेय शिक्षण देण्याचीही गरज असे. त्यासाठी खास मास्तरांची ( आताचे–गुरुजी) नेमणूक होई. राम गणेश गडकरी यांची अशीच, मास्तर म्हणून किर्लोस्कर नाटक मंडळीत योजना झाली होती. म्हणूनच पुढे गडकऱ्यांचा उल्लेख गडकरीमास्तर किंवा नुसता मास्तर म्हणूनही होऊ लागला. नाटकांच्या संबंधात मास्तर म्हटले की, गडकरीच. नशीब की त्यांचा ‘ डोअरकीपर ’ म्हणून उल्लेख होत नाही. कारण मास्तर काही काळ ‘ किर्लोस्कर ’चे डोअरकीपरही होते. आपल्या नाटकांनी रसिकांचे लोंढेच्या लोंढे, नाटकगृहात खेचून आणणारा, दारात प्रेक्षकांची गर्दी सतत सांभाळणारा ( प्रेक्षकांच्या अभावी थिएटरचे दरवाजे बंद करण्याची पाळी येऊ न देणारा) थिएटर ओसंडून, भरून काढणारा, राम गणेश नावाचा महान डोअरकीपर होता ! रंगभूमी नेकीने सांभाळणारा ‘ गडकरी ’ होता. अवघ्या मराठी रंगभूमीचा द्वारपाल– नव्हे पालनदार होता !

गडकरी आठवले म्हणून मामा मागे पडले. हो, तर काय सांगत होतो, मामा नि मामा ! नाटकमंडळधातल्या मुलांना, कुणाशी कसे वागावे, अदबीने कसे बोलावे, हे वारंवार मालकमंडळी पढवीत. कंपनीतल्या मोठ्या माणसांना, आलेल्या पाहुण्यांना ‘ काका ’ हाक मारावी ‘ मामा ’ म्हणावे वगैरे. यातूनच पुढे नाटकमंडळचांतून मामांचे पेव फुटले. जनूमामा ( जनुभाऊ निमकर) कोल्हटकरमामा, सानेमामा,शितूतमामा, पेंडसेमामा, सगळीकडे मामाच मामा! या शिकविणीमुळे अनेकांचा नाटककंपनीत ‘ मामा ’ होई. एकदा शिमग्याच्या दिवसात पोस्त मागायला, ‘ स्वदेशहितचिंतक ’ नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी एक भंगी आला. मुले बाहेर खेळत होती. त्यातला एक चुणचुणीत मुलगा धावत धावत आत गेला नि जनुभाऊंना म्हणाला, ‘जनूमामा, जनूमामा,बाहेर भंगीमामा आलाय. त्याला पोस्त हवाय, झाला त्याचा मामा !

रंगभूमीच्या संदर्भात सर्व मामांत वरेरकरमामा, भा. वि. ऊर्फ मामा वरेरकर हे सर्वात अधिक प्रसिद्ध नाव ! ललितकलादर्शमध्ये तर मामांचे खूपच वर्चस्व होते. मामा ही केशवराव भोसल्यांची निवड होती. बापूंचे (बापूसाहेब पेंढारकर) ते दैवत होते. कवीच्या, नाटककाराच्या गादीवर मामांची स्थापना झाली होती. त्यांचे ‘ हाच मुलाचा बाप ’, ‘ संन्याशाचा संसार ’,‘ सत्तेचे गुलाम’ ही नाटके गाजत होती. त्याच्या प्रयोगांचा उल्लेख कंपनीत मोठा मजेशीर होई. स्टेजमॅनेजर जोशी यांना कुठल्या नाटकाचे किती प्रयोग झाले असे विचारले की ताडकन् सांगत, ‘ बाप ’ बारा. ‘ संसार ’ सोळा !

पूर्वी नाटककारांचा मुक्काम कंपनीतच असे. त्यामुळे त्यांच्या बोलण्या–चालण्याच्या तऱ्हा, लकबी बहुतेक नटवर्गाला पाठ होत. मग त्याच्या नकलासुद्धा होत. मामा वरेरकर बोलण्यात तसे निर्भीड, विनोदी नि थोडेसे फटकळ होते. पेंढारकरांनी त्यांची वसंत शांताराम देसाई यांच्याशी ओळख करून दिली. वसंतरावांनी तो प्रसंग सुरेख टिपला आहे. मामा म्हणाले, ‘ आताच हेडमास्तरच्या तावडीतून सुटलो! ’बापूंनी खुलासा केला,‘वसंतराव, head-master म्हणजे न्हावी हं ! विडीची राख टाकण्याच्या डबड्याला (ash–tray) मामा म्युनिसिपालटी म्हणत. विल्सन कॉलेजचा उल्लेख डब्ल्यू. सी. म्हणून करीत. आपल्या नावात आपण डबल एम. ए. आहोत. (MAMA –मामा) असे गमतीने सांगत !

एक गोष्ट खरी मामा लेखनावर जगले. ‘ सत्तेचे गुलाम ’ रंगभूमीवर आले नि मामांनी पोस्टाची नोकरी सोडली. मामांनी जवळजवळ चाळीस–बेचाळीस नाटके लिहिली. दुर्दैवाने आज मात्र त्यातले एकही नाटक रंगभूमीवर नाही ! कुंजविहारी, हाच मुलाचा बाप, संन्याशाचा संसार, सत्तेचे गुलाम, सोन्याचा कळस, अ-पूर्वबंगाल, अशी काही नाटके कालानुरूप खूप गाजली. मामांच्या लेखणीचा चौफेर संचार होता. नाटके, कादंबऱ्या, कथा, रहस्यकथा, अनुवाद असे त्यांनी विपुल लेखन केले. सारे मानसन्मान त्यांना प्राप्त झाले. नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद, संगीत नाटक अकादमीचा सन्मान, पद्मभूषणकिताब, अखिल भारतीय कीर्ति संपादन केलेले, नि दिल्लीत स्थायिक झालेले एकमेव मराठी नाटककार म्हणजे–मामा वरेरकर ! पण काय असेल ते असो, मामांचे नाव निघाले की आधी विषय निघतो तो त्यांची याप नि विडी !



# जानेवारी ते जून मधील दहा राजहंस प्रकाशने

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव
पुणे ४११ ०३०

## आपली मुलं

**शोभा भागवत** । वीस रुपये.

☐ आपली मुलं लहानाची मोठी होत असताना त्यांच्याकडे पाहण्याचा, त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व देण्याचा दृष्टिकोन देणारं पुस्तक.

## फिडेल, चे आणि क्रांती

**अरूण साधू** । आवृत्ती दुसरी । बावीस रुपये.

☐ जुलमी राजवटींच्या टाचांखाली दडपल्या–चिरडल्या गेलेल्या लॅटिन अमेरिकन समाजाला नवी स्वप्ने देऊ करणाऱ्या एका क्रांतिचा इतिहास.

## तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय !

**डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर** । वीस रुपये.

☐ विज्ञानातील अनेक आश्चर्यकारक नव्या गोष्टी, नवे प्रयोग तुम्हाला सोप्या भाषेत समजून–उलगडून दाखविणारे पुस्तक.

## विज्ञानेश्वरी

**डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर** । वीस रुपये.

☐ किचकट गणितांच्या आणि अवघड प्रमेयांच्या, दाट जंगलातून मूलभूत शास्त्रीय सिद्धांताच्या पाऊलवाटा शोधणारे– खास ललितशैलीतील पुस्तक.

## राजहंस विद्यार्थी दैनंदिनी

**सं. डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर** । पंधरा रुपये

☐ हसत-खेळत मुलांना विज्ञानयुगातील बिरबल बनवणारी –शाळेतील अभ्यासाला पूरक अशी दैनंदिनी.

## बलसागर

**श्री. ग. माजगावकर** । तीस रुपये.

☐ राष्ट्रवादी भूमिकेतून नव्या क्षितिजांचा घेतलेला शोध.

## डॉ. आयडा स्कडर

**सौ. बीणा गबाणकर** । बावीस रुपये.

☐ ग्रामीण भागात डॉक्टरी सेवा नेण्याचा प्रयत्न भारतात प्रथम डॉ. आयडांनी केला. त्यांच्या त्यागमय जीवनाची कहाणी.

## पूर्णिया

**अनिल अवचट** । आवृत्ती तिसरी । बारा रुपये.

☐ अलिप्तपणे तरी भेदकतेने घडवलेले बिहारच्या माणसाचे दर्शन.

## लेक वालेसा

**डॉ. श्रीकांत मुंदरगी** । बावीस रुपये

☐ लेक वालेसा आणि पोलिश जनता यांनी रशियन दडपशाहीविरुद्ध दिलेल्या लढ्याचे चित्रण–मराठीत प्रथमच.

## मला निसटलंच पाहिजे !

अनु. **श्रीकांत लागू** । वीस रुपये

☐ इतिहासाच्या त्या धामधुमीच्या काळात, एका हुकुमशहाच्या मगरमिठीतून, जिवावर उदार होऊन, मृत्यूला पाठीशी घेत, ते निसटले व भारताच्या सुरक्षित भूमीत उतरले. त्यांच्या अतुलनीय साहसाची कथा.